# कृष्णार्जुनयुद्ध

हें नाटक

नरसिंह चिंतामण केळकर बी. ए. एल्‌एल्. बी.

संपादक 'केसरी' आणि 'मराठा'

व

'आयर्लंदचा इतिहास,' 'सुभाषित आणि विनोद,' 'ग्यारीबाल्डीचें चरित्र,'
'तोतयाचें बंड,' 'चंद्रगुप्त,' 'अमात्यमाधव,' 'श्रीसंतभानुदास,'
'सरोजिनी,' 'नवरदेवाची जोडगोळी.'

या पुस्तकांचे कर्ते यांनीं लिहिलें

तें

शंकर नरहर जोशी यांनीं

८१८ सदाशिव पेठ, पुणें शहर येथें

'चित्रशाळा' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

( आवृत्ति पहिली )

सन १९१५

किंमत १२ आणे

हें पुस्तक १८६७ व १९१४ च्या आक्टाप्रमाणें नोंदिलें असून
सर्व हक्क कर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना

श्रीकृष्ण आणि अर्जुन यांची मैत्री जगविख्यातच आहे. पण श्रीकृष्ण आणि अर्जुन यांचाहि एक वेळ युद्ध होण्याचा प्रसंग आला होता, ही गोष्ट मात्र तितकी प्रसिद्ध नाहीं. कृष्णार्जुनयुद्धाचा हा कथाभाग भारतांत नमूद केलेला नसल्यामुळें त्यास प्रामाण्य कमी हें सिद्धच आहे. व्यासांचें स्फूर्तिदायक उदाहरण डोळ्यांपुढें असलेल्या एखाद्या उपपुराणाच्या लेखकानें तो रचिला असावा असें दिसतें. परंतु कथाभागाचें स्वारस्य व त्यांत केलेली भारतीय पात्रांची मनोरंजक योजना लक्षांत आणितां, त्यानें केलेलें हें व्यासांचें अनुकरण अगदींच फुकट गेलें असें मात्र म्हणतां येणार नाहीं. आपल्या इकडच्या मार्मिक व रसिक हरिदास-संप्रदायानें या कथाभागास पसंती देऊन आपल्या आवडत्या व मूर्धाभिषिक्त आख्यानांत त्याचा समावेश केला आहे, हें वरील सिद्धान्ताचें एक प्रत्यंतर असें मानण्यास हरकत नाहीं.

गतवर्षी 'चित्ताकर्षक नाटक मंडळी' च्या विनंतीवरून नवीन नाटक लिहिण्याचा विचार करीत असतां हा कथाभाग मला सुचला, व त्याचा आधार घेऊन मीं हें प्रस्तुतचें नाटक लिहिलें आहे. सोलापूर मुक्कामीं ता. २२।८।१४ रोजीं त्याचा प्रथम प्रयोग झाला; व मुंबईस या नाटकाचे गेले दोन महिने जे प्रयोग झाले, त्यांवरून या कथानकास दृश्य स्वरूप कोणीं दिलें तर तें लोकांस हवें होतें असें मानण्यास हरकत नाहीं. प्रस्तुतच्या कृतींत अनेक दोष राहिले आहेत. माझ्या जागीं विशेष कल्पक व चतुर असा एखादा अन्य नाटककार असता तर त्याचे हातून या कथानकाची मांडणी माझ्याहून सरस झाली असती हें मी जाणून आहें. परंतु लोकांना प्रिय असलेला असा एक कथाभाग मीं नाट्यरूपानें पुढें आणिला इतक्यापुरतें जरी माझ्या कृतीला कोणीं बरें म्हटलें तरी त्यांत माझें समाधान आहे.

प्रस्तुत नाटक रचतांना मूळ कथानकांतील सुभद्रेच्या पात्राचे जागीं द्रौपदीची योजना करण्यांत आली आहे. हा फरक मीं जाणूनबुजून केलेला आहे व त्याचें कारण असें कीं, नाटकाचें जें प्रमेय म्हणून दर्शविण्याचें मीं योजिलें आहे, त्याच्या दृष्टीनें सुभद्रेपेक्षां द्रौपदीचेंच पात्र अधिक उचित आहे असें मला वाटलें. सुभद्रा व कृष्ण हीं बहीणभावंडें खरीं; तथापि बंधु-भगिनी-प्रेमाच्या दृष्टीनें पहातां सख्या बहिणीपेक्षां ही लावालावीची बहीणच कृष्णास अधिक जवळ होती. सुभद्रेच्या जागीं द्रौपदीची योजना केल्यानें मूळ कथा-भागांत यत्किंचितहि फरक करावा न लागतां आलें तर कदाचित् स्वारस्य मात्र अधिक येईल असें वाटून हा फरक मीं केला आहे.

प्रस्तुत नाटकांतील कथानकाचा पडताळा पाहूं देण्याची संधि ह. भ. मुरूडकरबुवा व ह. भ. पाटणकरबुवा (तुळशीबागेंतील पुराणीक) यांनीं दिली: पुस्तकांत चित्रें घालण्यासाठीं चित्ताकर्षक नाटक मंडळीनें फोटो काढविले; छापण्याचें काम जलद करण्याचें चित्रशाळेनें पत्करिलें; व प्रुफें वगैरे तपासण्याच्या कामीं येथील धि प्रिंटिंग एजन्सीनें श्रम घेतले, याबद्दल त्या सर्वांचा मी आभारी आहें.

पुणें
ता. १।१।१९१९ } नरसिंह चिंतामण केळकर

# कृष्णार्जुनयुद्ध

## अंक पहिला

### प्रवेश पहिला

जा
क्र. नं...

स्थल—गंगाकाठचें एक वन.

[ सात्यकी व सुमंगल प्रवेश करितात. ]

सात्य०:—( आश्चर्यानें ) काय म्हटलंस सुमंगला ? महाराजांच्या वनविहाराची सर्व तयारी झाली ?

सुमं०:—(हात जोडून) सेनाधिराज ! काडीइतकंहि कांहीं उणं राहिलेलं नाहीं.

सात्य०:—मग मोठं आश्चर्यच आहे म्हणावयाचं !

सुमं०:—तें कसं महाराज ?

सात्य०:—कारण, गंगातीरावर वनविहार करण्याची इच्छा कृष्णमहाराजांना काल प्रात:कालीं झाली; त्यांनीं मला त्याविषयीं दोनप्रहरीं आज्ञा केली; आणि मीं ती तुला अगदीं सायंकाळीं कळविली. या गोष्टीला अवघे चार प्रहरहि लोटले नाहींत, तोंच तूं मला सांगायला येतोस कीं सर्व सिद्धता झाली म्हणून ?

सुमं०:—( हंसून ) पण हें सर्व इतक्या त्वरित कसं घडून आलं याचं कारण मला अद्यापि चरणापाशीं निवेदन करायचंच आहे !

सात्य०:—( उत्सुकतेनें ) सांग सांग बरं तें कारण ! तें लोकोत्तरच असलं पाहिजे. मला तें ऐकण्याचं फारच कौतुक वाटतं–( तोंड फिरवून ) पण छे: ! मी वेडा आहें कीं काय ? कार्याची पुरी चौकशी करण्याच्या

आधींच कारणाची चौकशी करीत बसलों ! सुमंगला, तुला माहीत आहेना कीं वनविहाराला एकट्या द्वारकाधीश श्रीकृष्णाची स्वारी येणार नाहीं ?

सुमं०:—होय. तें मला महाराजांनीं आपल्या मुखानंच सांगितलं !

सात्य०:—पण मीं तुला हें सांगितलं नव्हतं, कीं श्रीकृष्णाबरोबर निवडक यादव मंडळींहि येणार आहेत म्हणून ?

सुमं०:—आपण तसं स्पष्ट सांगितलं नाहीं; पण मीं तसा तर्क केला !

सात्य०:—पण श्रीकृष्णानीं आपला प्रियसखा जो अर्जुन त्यालाहि वन विहाराकरितां या ठिकाणीं पाचारण केलं हें स्वतः मलादेखील आज सकाळपर्यंत कळलं नाहीं, मग तुला कसं कळणार ? अर्जुनजीबरोबरहि पाचपन्नास तरुण राजन्य मंडळी असणार !

सुमं०:—सरकारस्वारी द्वारका सोडून मुद्दाम गंगातीराकडं आली, तेव्हां पार्थराजांची आणि त्यांची गांठ पडायची असा मीं तर्क केला; आणि महाराजांच्या कृपेनें तो खराहि ठरला !

सात्य०:—शाबास ! सुमंगला शाबास ! तुझ्यासारखे चतुर सेवक पदरीं असल्यावर कोणाला काय कमी पडणार ? (आठवण करून व किंचित् दचकून ) पण सुमंगला, छेः ! फार मोठी चूक झाली. महाराज मला आज्ञा करितांना सत्यभामादि यादवस्त्रिया आणि द्रौपदीप्रमुख कांहीं पांडवस्त्रियाहि येणार हें सांगायचं विसरले. तें त्यांच्या तोंडून मला आज सकाळीं ओझरतं कळलं. ( निराशेनें ) छेः ! सुमंगला तुझी सर्व तयारी व्यर्थ आहे !

सुमं०:—तें कां सरकार ?

सात्य०:— अरे ! पुरुषांच्या वनविहाराची तयारी करण्याचं मुळींच कठीण नाहीं. पण पुरुषांबरोबर स्त्रियाहि वनक्रीडेला यायच्या म्हटल्या म्हणजे त्यांची व्यवस्था कोण किती ठेवणार ? त्यांतून आमच्या सत्यभामाराणीसाहेबांशीं आहे प्रसंग. यत्किंचित् जर का कमी पडलं, तर सगळंच फुकट ! स्त्रियांची शिबिरं वेगळीं, स्नानाचे घाट वेगळे, विश्रांतिगृहं वेगळीं, लतानिकुंज वेगळे, सगळं कांहीं वेगळं आणि चांगलं पाहिजे. छेः ! सर्वसिद्धता झाली म्हणून तूं मला फुकट आशा लावतो आहेस झालं ! बोल बोल मीं सांगितलं यांपैकीं काय काय तयार आहे ! ( मान हलवून ) पण फिरून मीं तुला वेड्यासारखे

हे प्रश्न तरी कसे करतों ? कारण, यादवपांडवस्त्रिया येणार हेंच जर तुला ठाऊक नाहीं, तर तूं त्यांच्या स्वागताची तयारी कशी करणार ? चल चल मला पाहूं देच ! [ गडबडीनें जाऊं लागतो. ]

सुमं०:—महाराजांची चिंता व्यर्थ आहे. यादवपांडवस्त्रिया वनक्रीडेला येणार हें मलाहि या घटकेपर्यंत माहीत नव्हतं—

सात्य०:—मग झालं तर ! चिंता नको करूं तर काय करूं ?

सुमं०:—पण ज्यांनीं त्यांना आयत्या वेळीं निमंत्रण केलं,त्यांनींच त्यांच्या स्वागताची सर्व तयारी करण्याचं आपल्या अंगावर घेतल्यामुळं—

सात्य०:—त्या कोण ?

सुमं०:—गंगातीरानिवासी वनदेवता ?

सात्य०:—( आश्चर्यानें ) काय ? वनदेवता ! सुमंगला ! म्हणतोस तरी काय ?

सुमं०:—यांत एक अक्षरंहि खोटं नाहीं महाराज ! श्रीकृष्ण आणि पार्थराज हे आपापल्या स्त्रियांना न घेतां एकटे येणार असं वनदेवतांना कळ-तांच, त्यांनीं आपले प्रतिनिधी पाठवून, यादव-पांडव स्त्रियांनाहि येण्याचं निमंत्रण देऊन, त्यांना आणण्याकरितां विमानंहि रवाना केलीं. आणि इकडं रातोरात त्यांनीं वनक्रीडेची सर्व सिद्धता उत्कृष्ट करून ठेविली.

सात्य०:—अस्सं! एकूण स्वतः वनदेवतांनीं स्वागताची तयारी केली! मग त्यांत काय कमी पडणार ? अरे ! पण ही इकडं कोण येत आहे ?

सुमं०:—खरंच कीं ! एखादी जाईजुईच्या वेलीची जाळीच्या-जाळीच येत आहे असं वाटतं.

सात्य०:—आणि हे काजवे पहा तिच्या पल्लवांत कसे गजबजले आहेत ते, मानव तरुणींच्या केशकलापांतील हिऱ्यामोत्यांच्या दागिन्याप्रमाणं !

[ सुगंधा प्रवेश करिते. ]

सुगं०:—( जमिनीला हात लावून वंदन करिते ) द्वारकाधीश श्रीकृष्णाचे सेनापति सात्यकीमहाराज ते कोणते ?

[ सुमंगल सात्यकीकडे बोट दाखवितो; सुगंधा सात्यकीस फिरून वंदन करिते. ]

सात्य०:—अरे ! ही तर चालती बोलती लतिकाच आहे. बाळे ! तूं कोण ? आणि तुझं सात्यकीकडं काय काम आहे ?

सुगं०:—वनदेवी महाराणी कनकश्री यांनीं महाराजांना त्रिवार प्रणाम सांगून अशी विनंति केली आहे कीं, श्रीकृष्ण, पार्थराज आणि यादवपांडव-स्त्रिया यांच्या स्वागताकरितां आम्ही सर्व वनदेवींनीं मिळून जी यथामति यथाशक्ति तयारी केली अहे, ती महाराजांनीं सर्व एकवार पाहून घ्यावी. म्हणजे त्यांत कांहीं कमजास्ती दिसून आलं तर अजुनहि नीट करितां येईल.

सात्य०:—अरे व: ! कशी पोक्त माणसासारखी चुरचुर बोलते ही लतिका कुमारी !

सुमं०:—महाराज ! वनदेवतांचा हा निवळ सुविनीतपणा आहे. बाकी सर्व तयारी मीं स्वत: डोळ्यांनीं पाहिली आहे. त्यांत काडीइतकंहि न्यून नाहीं. द्वारकेच्या किंवा इंद्रप्रस्थाच्या क्रीडोद्यानांतहि अशी तयारी क्वचित नाहीं.

सात्य०:—स्वत: वनदेवतांनीं गोष्ट मनावर घेतली मग काय कमी ! ( सुगंधेकडे पाहून ) बाळे ! जा, आपल्या महाराणीला आमचा प्रणाम सांग ; आणि त्यांना विंनति कर कीं, मीं आतां इतक्यांतच येऊन भेटतों.

[ सुगंधा जाते. ]

सुमंगला, धन्य धन्य वनदेवता. त्यांना आज कृष्णार्जुनांच्या स्वागताचा लाभ घडणार ! आणि त्यांतल्यात्यांत हेंहि एक बरंच झालं—

सुमं०:—तें काय महाराज ?

सात्य०:—तें असं कीं, सत्यभामाराणीसाहेबांची मर्जी जाण्याची आतां भीति म्हणून उरली नाहीं.

सुमं०:—ती कशी ?

सात्य०:—कारण, स्त्रियांच्या पाहुणचाराची व्यवस्था ठेवणाऱ्याहि स्त्रिया असल्या म्हणजे चूक रहातच नाहीं. (इतक्यांत शंखनाद होतो.) अरे ! पण हा शंखनाद कुठून होतो आहे ? यजमानांच्या स्वाऱ्या आल्याच वाटतं ! आतां वनदेवतांची तयारी उणी कीं पुरी हें पहायला वेळ तरी कुठें आहे ? असो, कांहींहि होवो !

सुमं०:—हा विमानांचाच आवाज. माझ्या ओळखीचा आहे.

सात्य०:—या पहा, सर्व स्वाऱ्या पायउतारा झाल्या सुद्धां. चल चल. पाऊल उचल. [ जातात. पडदा उघडतो. ]

[ इतक्यांत एका बाजूनें श्रीकृष्ण-सत्यभामा व त्यांच्या मागून यादवानुचर, आणि दुसऱ्या बाजूनें अर्जुन-द्रौपदी, आणि त्यांच्या मागून पांडवानुचर प्रवेश करितात; तोंच वृक्षवेलींमागें लपून बसलेल्या वनदेवता स्वागतपर पद्य म्हणतात; आकाशांत संचरणाऱ्या वनदेवता पुष्पवृष्टि करितात; आणि दोनतीन बालवनदेवता नृत्य करीत पुढें येतात. कांहीं वेळ झाल्यावर नृत्यगायन व पुष्पवृष्टि थांबते, आणि वनदेवता अदृश्य होतात. श्रीकृष्ण अर्जुनाकडे जाऊन त्याला आलिंगन देतो, व द्रौपदी सत्यभामेकडे जाऊन तिला आलिंगन देते, आणि उजव्या बाजूस कृष्ण, डाव्या बाजूस अर्जुन, व मध्यें दोघी स्त्रिया बसतात. ]

कृष्ण:—सात्यके, युद्धकलेप्रमाणं इतर कलाहि तुम्हांला चांगल्याच अवगत असलेल्या दिसतात !

सात्य०:—त्या कशा काय महाराज ?

कृष्ण:—एरवीं अवघ्या चार प्रहरांत क्रीडोद्यानाचा हा उत्कृष्ट थाट तुम्हांला कसा संपादन करितां आला असता !

अर्जु०:—खरंच देवा, हें क्रीडोद्यान पाहून मी दिपून गेलोंच होतों; पण तें एका रात्रींत निर्माण झालं हें ऐकुन तर माझं आश्चर्य अंतःकरणांत मावेनासं झालं आहे !

द्रौप०:—मयसभेची शोभाहि अशीच अपूर्व होती. पण ती निर्माण करण्याला कांहीं इतका थोडा वेळ पुरला नाहीं खचित !

सत्य०:—सेनाधिराज सात्यकि हें यादवांच्या संग्रहांतलं सर्वोत्कृष्ट रत्न आहे असं त्रिभुवन म्हणतं तें उगीच कां ?

सात्य०:—( हात जोडून ) व्यर्थ स्तुतीच्या भाराखालीं गुदमरून जाण्यापूर्वी, तोंडातून शब्द निघेतोंपर्यंत, मला बोलून तरी घेऊं दे. महाराज, महाराणीसाहेब, क्रीडोद्यान चांगलं सजलं खरं; पण त्याचं श्रेय मला नाहीं !

कृष्णः—तर कुणाला ?

सात्य०ः—वनदेवी कनकश्री यांना.

द्रौप०ः—आम्हांला विमान पाठविलें तें त्यांनींच !

सत्य०ः—तरी मीं म्हटलं कीं पहिल्यानं मला बरोबर न्यायचा इकडचा बेत नव्हता. आणि मग पाहतें तों आयत्या वेळीं आपलं विमान दारांत उभं !

अर्जु०ः—स्वतः वनदेवतांनीं वन शृंगारायचा बेत केला मग शृंगाराला काय कमी ?

कृष्णः—पण देवी कनकश्री कुठं आहे ? यजमानिणीशिवाय पाहुण्यांना शोभा कशी येणार ? [ कनकश्री प्रवेश करिते. ]

[ द्रौपदी सत्यभामेच्या कानांत कुजबुजते; दोघीहि उठून खालीं उतरतात व कनकश्रीपाशीं जातात; आणि दोघीजणी तिचा एकेक हात धरून तिला आपल्याबरोबर आणून सर्वांच्यामध्यें उच्चासनावर बसवितात. ]

कृष्णः—( द्रौपदीस ) ताई, आतां मात्र आम्हां सर्वांना शोभा आली खरी.

अर्जु०ः—मी तरी हेंच म्हणत होतों कीं, आम्ही सर्व पाहुणे जमलों खरे; पण पाहुणचार करणरांचा पत्ता कसा नाहीं ?

द्रौप०ः—( कनकश्रीस ) देवी, हा सर्व वनश्रृंगार पाहून माझ्या तर डोळ्याचं पारणं फिटलं.

कन०ः—आपणा सर्वांचे पाय या वनभूमीला लागले यामुळं मी मात्र आज धन्य झालें खरी.

कृष्णः—पण या वनभूमींतून आम्हीं पूर्वी अनेक वेळां संचार केला आहे.

अर्जु०ः—युद्ध सुरू असतां एक वेळ कांहीं कारणानें मीहि या वनभूमींतून गेलेलों आहे.

कन०ः—होय. पण महाराज, त्या वेळीं आपला सत्कार करण्याकरितां थांबण्याची विनंति आम्हीं कशी करावी ? युद्ध-संग्रामामुळं उग्रता पावलेल्या आपल्या मुखाकडं आम्हांला नुसतं पहावतहि नव्हतं. मग भाषण करण्याला आपणापुढं येण्याचं धैर्य आम्हांला कसं होणार ?

सत्य०:--आणि तुम्हीं पुढं येऊन थांबण्याची विनंति केली असती तरी युद्ध सोडून पाहुणचार घेण्याला तेव्हां कुणाला थांबतां आलं असतं !

द्रौप०:—पण आतां तरी तुमच्या मनासारखं झालं ना ?

कन०:—हें मी तोंडानं काय बोलून दाखवूं ? माझ्या या वनभूमीतल्या सर्व प्रजाजनांना आपल्या आगमनानं आनंदी आनंद झाला आहे !

कृष्ण:—तो आनंद मला वृक्षलतांनीं केलेल्या पुष्पवृष्टींतच दिसून आला.

अर्जु०:—खऱ्या आनंदाशिवाय वनभूमीच्या या अष्टदिशा इतक्या प्रसन्न व उल्लासित दिसल्याच नसत्या.

कन०:—युद्ध लवकर संपावं आणि श्रमपरिहाराकरितां उभयतां महाराजांना चार दिवस या क्रीडावनांत बोलवावं, असं युद्धाच्या पहिल्या दिवसापासून माझ्या मनांत येत होतं.

सात्य०:—युद्धाच्या श्रमामुळंच अशा विश्रांतीला विशेष गोडी येते खरी.

कन०:—तेव्हां माझी आतां इतकीच प्रार्थना आहे कीं, चार दिवस मला आणि माझ्या प्रजाजनांना अखंड दर्शनलाभ देऊन सेवा घ्यावी.

कृष्ण०:—पार्था, याहून आणखी प्रिय तें काय असणार ?

अर्जु०:—आणि मी झालं तरी तेंच म्हणणार होतों.

कन०:—देवी सत्यभामा आणि देवी द्रौपदी यांनाहि माझी तीच विनंति आहे.

सत्य०:—इकडं विनंति केल्यावर आम्हांला ती वेगळी विनंति करायला कशाला हवी ?

द्रौप०:—युद्धाचे श्रम ज्यांना पडले त्यांना विश्रांति आणि करमणूक हवी खरी. आम्हां बायकांना कसले युद्धाचे श्रम ?

कृष्ण:—पण ताई, प्रियमित्र पार्थाला जसे शरीरानं युद्धाचे श्रम झाले तसेच तुला मनानं ! म्हणून तुलाहि झाली तरी विश्रांतीची गरज कमी आहे असं नाहीं.

द्रौप०:—तें कसंहि असो. पण या गंगेच्या तीरावर विहार करायला जायचं असं मला कळल्याबरोबर माझं मन अगदी उत्कंठित झालं, आणि मला बोलावणं येण्याच्या आधींच मीं येण्याचा आग्रह धरला.

अर्जु०:—( हंसून ) वः ! आग्रह धरायला मी जसा कांहीं एकटाच येणार होतों. तशी कल्पना माझ्या मनांत तरी ?

कन०:—माझं दैव मोठं खरं. एरवी मीं जो हेतु मनांत धरला तोच पुरा करण्यासारखी इच्छा आपणा सर्वांच्या मनांत त्याच वेळीं कशी यावी ?

कृष्ण:—असो; सर्वांचंच भाग्य थोर म्हटलं पाहिजे. कारण, थोड्या दिवसापूर्वी जेव्हां युद्धाची धुमश्चक्री माजून राहिली तेव्हां, असा हा शांततेचा दिवस उगवेल, आणि आपण सर्व एकत्र जमून गंगातीरावर क्रीडा करण्याला निष्काळजी मनानं जमूं असं माझ्या स्वप्नांतहि आलं नसतं !

[पडद्यांतून—'स्वप्नांत येत नाहींत अशाहि गोष्टी अनुभवला येतात.']

अर्जु०:—( इकडेतिकडे पाहून ) हें कोण बोललं आकाशांतून बोलल्यासारखं ?

द्रौप०:—कोण कायसंसं बोललं खरं !

सत्य०:—कोणी राक्षसबिक्षस नसतीलना आसपास ?

सात्य०:—( तरवारीला हात घालून ) छे: राणीसाहेब ! तशी भीति कांहींच नाहीं या ठिकाणीं.

कृष्ण:—( हंसून ) अरे, तुम्ही सर्व अगदींच फसलां ! तुम्ही हा आवाज ओळखला नाहीं तर

अर्जु०:—आवाज ओळखीचा आहे असं वाटतं खरं. पण अगदीं अमक्याचा असं नाहीं सांगवत !

कृष्ण:—(हंसून) तुम्हांला अजून ओळख पटली नाहीं, तर मग चालू द्या तर्क, पाहूं तरी !

सात्य०:—हा एखादा जळत्या अग्नीच्या गोळ्यासारखा कोण दिसतो?

सत्य:—हा सूर्य तर इकडच्या भेटीला येत नाहीं ?

द्रौप०:—छे: छे: ! सूर्यनारायण खचित नव्हे. तो कोणी तरी तेजस्वी ऋषि किंवा मुनि असावा.

सत्य०:—पण ऋषींचा आणि मुनींचा संचार आकाशांत कसा होणार?

कृष्ण:—( हंसून ) खूप मौज आहे. चालू देत तर्कावर तर्क !

द्रौप०:—तें मी काय सांगूं ? पण त्याच्या मस्तकावर डाव्या बाजूला

वळवून बांधलेला जटाभार तर मला स्वच्छ दिसतो आहे ! आणि तें पहा, त्यानं खांद्यावर हरिणाजिन कसं लपेटून घेतलं आहे तें ! मीं तो ऋषि किंवा मुनि म्हटलं तेंच खरं ठरणार !

सत्य०:—खरंच देवी द्रौपदी ! त्याच्या डाव्या हातांत दंडकमंडलू-सारखं कायसंस दिसतं खरं.

सात्य०:—आणि खाकेंत अर्धं झांकलेलं आणि अर्धं उघडं असं तें काय बरं ? खचित ती वीणाच असावी.

कृष्णः—आतां तुम्ही ओळखण्याच्या बेताला आलां खरे. आणखी थोडी कल्पना चालवा—

अर्जु०:—अरे ! ही तर नारदमुनींची स्वारी दिसते !

कृष्णः—पार्था, तूं मात्र बरोबर ओळखलंस. भक्तराज नारदच येतो आहे !

सात्य०:—काय नारदमुनी ? ( स्वगत ) ही ब्याद इकडं कुणीकडं आली या वेळेस ?　　( नारद स्वर्गांतून उतरून प्रवेश करितो. )

[ द्रौपदी अर्जुनाच्या बाजूला व सत्यभामा कृष्णाच्या बाजूला जाऊन उभी राहते. कनकश्री पुढें येऊन कोंपऱ्यांत उभी राहते. ]

कृष्णः—ये ये, नारदा. अगदीं वेळेवर आलास.

अर्जु०:—( वंदन करून ) मुनिवर्यांच्या दर्शनानं मी कृतार्थ झालों.

नार०:—कृष्णा मी येईन; पण द्रौपदी व सत्यभामा आपआपल्या जागीं फिरून येऊन बसतील तर ! नाहीं तर हा पहा मी चाललों आल्या पावलीं माघारा.

अर्जु०:—तें काय म्हणून ?

नार०:—काय म्हणून ? प्रेमाचीं नवरा-बायको अशीं सुखानं एका-शेजारीं एक बसलीं असतां, एकदम आंत येऊन त्यांची बैठक मोडणाराला शिव्याशापाशिवाय काय मिळणार ? मला नको बुवा ते शिव्याशाप ! द्रौपदी-सत्यभामे, तुम्ही आपआपल्या पूर्वीच्या जागेवर येऊन बसलां तर मी इथं राहीन नाहीं तर हा पहा चाललों ! दांपत्यसुखाचा भंग केल्याचा शाप ब्रह्मचाऱ्याला फार बाधतो !

सात्य०:—( हंसून ) मुनिवर्य आज्ञा करितात तसं झालं तर आम्हां अनुचरवर्गालाहि फार आनंद होईल.

सत्य०:—(हंसून ) वन्सं, चला बाई जाऊन बसूं कशा त्या! आमच्यामुळं कुणी आलेलं परत जायला नको आणि कुणाच्या आनंदाचा भंगहि व्हायला नको. !

[ दोघीजणी नारदापुढें जाऊन त्याला नमस्कार करितात, तो त्यांना आशीर्वाद देतो, व त्या आपआपल्या पूर्वीच्या जागेवर जाऊन बसतात. ]

नार०:—अरे पण ही मधली जागा रिकामीशी दिसते ? इथं कोण बसलं होतं ?

कृष्ण:—देवी कनकश्री.

नार०:—अस्सं ! वनदेवी कनकश्री ! मग तिनंहि आपल्या पूर्वीच्या जागेवरच येऊन बसलं पाहिजे. पाहुणचाराच्या समारंभांत व्यत्यय आला म्हणजे पाहुण्यापेक्षां यजमानालाच अधिक खेद होतो !

कृष्ण:—देवी कनकश्री, तूंहि येऊन बैस आपल्या भगिनींशेजारीं. नारदमुनींना निसटून जायचं असलं मनांतनं, तर त्यांना आपण कशाला निमित्त पुरवा ?

[ कनकश्री पुढें येऊन नारदाकरितां आसन मांडते व त्याला नमस्कार करिते. नारदानें तिला आशीर्वाद दिल्यावर ती पूर्वीच्या ठिकाणीं जाऊन बसते, व नारद आसनावर बसतो. ]

सात्य०:—आतां मात्र हा देखावा उत्तम दिसतो खरा ! असा देखावा पूर्वी कधीं कोणी पाहिला नसेल आणि पुढंहि कुणाला पाहायला मिळणार नाहीं.

नार०:—हा देखावा अपूर्व आहे असं मीं सुद्धां म्हणतों. पण माझं कारण मात्र वेगळं आहे.

कृष्ण:—तें काय ?

नार०:—नको बुवा उगाच. खरं बोलण्याची आहे मला संवय. मी खरं बोलायला गेलों अन् त्याचा तुम्हांला राग आला तर ?

कृष्ण:—म्हणजे ही एखाद्या कलहनाटकाची प्रस्तावना वाटतं !

नार०:—कृष्णा, कलहनाटक कपटापेक्षां पुष्कळ बरं !

कृष्णः—म्हणजे ? मला टोला द्यायचा आहे वाटतं मनांतनं.

नार०:—टोला घेणार भेटला तर देण्यांत मौज; नाहीं तर काय ? समुद्रावर वादळ झालं तर एखादी तरी नांव पाण्यांत बुडून मौज पहायला सांपडेल. तोच पर्वताच्या डोक्यावर वारा हवा तितका घोंटाळला तरी त्याचा काय उपयोग ?

कृष्णः—पण नारदा, हा देखावा अपूर्व कसा तें सांगायचं राहिलंच आहे अद्यापि !

नार०:—अपूर्व असा कीं, युद्धांत सर्वांनाच सारखे श्रम झाले; पण या गुप्त विहारस्थळीं मजा मारायला आपला आवडता पांडव तेवढा घेऊन श्रीकृष्णा तुम्ही तयार. पांचहि पांडवांवर माझं सारखं प्रेम, असं चारचौघांत बोलायला कांहीं कमी नाहीं. पण खरं मित्रप्रेम दाखवायची वेळ ही अशी आली, म्हणजे पार्थ आणि पार्थसखा दोघेच दोघे पाहून घ्यावे; तिसरा म्हणून तिथं मिळायचा नाहीं.

द्रौप०:—पण नारदा, श्रीकृष्णाचं सर्वांनाच निमंत्रण होतं हें मला माहीत आहे. इतरांना दुसरीकडं जायचं होतं म्हणून आले नाहींत.

नार०:—बरोबर आहे. देवी द्रौपदी, तूं श्रीकृष्णाची बाजू सांवरून धरणारच. त्यानं तुझी पाठ अनेक वेळां राखली. तेव्हां तूंहि त्याची पाठ एखादे वेळीं राखलीस तर त्यांत कांहीं मोठंसं आश्चर्य नाहीं. पण निमंत्रणानिमंत्रणांत फरक, न बोलतांहि करतां येतो. बाकीच्यांना जसं बोलावणं तसं त्यांचं येणं ! पण द्रौपदी, तुला बरं ग येतां आलं असं बाकीच्यांना टाकून ! पण तूं न येऊन कसं होणार ! जसे खऱ्या प्रेमाचे स्नेही तशींच खऱ्या प्रेमाचीं बहीणभावंडें, सर्वांना झुकांडी देऊन जुळायचींच एका ठिकाणीं आयत्या वेळीं.

कृष्णः—बरं बुवा, अर्जुन आणि द्रौपदी येण्याचं हें कारण झालं. तसंच ( सत्यभामेकडे वळून ) हिला आणण्याचंहि कारण असेल एखादं, नारदा, तुझ्या संग्रहीं !

नार०:—हां, नाहीं. तसलं मात्र खाचित नाहीं ! सत्यभामादेवीला बरो-

वर आणली म्हणून तुमचं खरं प्रेम तिच्यावरहि आहे असं मीं म्हणावं, असा तुमचा विचार दिसतो. पण छे ! देवा, मी असा फसायचा नाहीं. अर्जुनद्रौपदींना आणलीत खऱ्या प्रेमाकरितां, आणि सत्यभामेला आणलीत खरं प्रेम दिसावं म्हणून ! देवी सत्यभामा बिचारी सरळ मनाची, भोळी आहे. तिला फसवायची युक्ति, कृष्णा, तुम्हांला चांगलीच माहीत आहे. पारिजातकाच्या भांडणापासून मला त्याचा चांगला अनुभव आहे.

सत्य०:—( हंसून ) तो कसा काय बाई !

नार०:—तो असा कीं इतके भांडणतंटे करून आणि इंद्राशीं लढून स्वर्गातून पारिजातकवृक्ष आणला तो केवळ तुझ्या प्रेमाकरितां, असं देवी सत्यभामेला, श्रीकृष्णा, तुम्हीं वरकरणी दाखविलं मात्र—

कृष्ण:—कां बरं ? पारिजातक वृक्ष मीं सत्यभामेच्याच मंदिरांत लावला, कीं दुसऱ्या कुणाच्या ?

नार०:—वा: मौज तर त्यांतच आहे. वृक्ष लावला देवी सत्यभामेच्या मंदिरांत, पण त्याच्या फुलांचा सडा मात्र रुक्मिणीच्या अंगणांत. ही युक्ति साधेल का दुसऱ्या कोणाला ? असलं बेमालूम कपट साधायला त्याचा बाळपणापासूनच अभ्यास लागतो !

[ सर्व हंसतात. ]

कृष्ण:—अस्सं ! या वनविहारप्रसंगावरून आतां आमच्या एकंदर जन्मवृत्तांताचाच पाढा वाचण्याकडं आपली स्वारी वळणार वाटतं ?

नार०:—हो ! काय हरकत ! श्रीकृष्णा, तुमचे गुणानुवाद वर्णन करणं याशिवाय आम्हां मुमुक्षुजनांना दुसरा कोणता व्यवसाय आवडणार ?

कृष्ण:—( हंसून ) आणि या गुणांत कपटबुद्धीचाच मुख्यत: समावेश होतो म्हणायचा ?

नार०:—यांत काय संशय ? द्वारकाधीशा, जशी माझी कलहप्रियता तशीच तुमची कपटप्रियता—

कृष्ण:—दोन्हींत साम्य कसें काय आहे बुवा ?

नार०:—दोहोंपासून जगाचें कल्याण होतं हेंच.

अर्जु०:—पण नारदा, आपल्या कलहप्रियतेनं जगाचं कल्याण कसं का

झालं हें कळलं नाहीं ! बाकी दुर्गुणी मनुष्याला आपले अवगुण लपवायला परोपकारासारखं दुसरं उज्ज्वल आच्छादन कुठून मिळणार म्हणा !

नार०:—का पार्था, तुझी स्मरणशक्ति मला फारच कोती दिसते ! जेव्हां सुभद्राविवाहापूर्वी तूं जिवावर उदार होऊन रानभर भटकत होतास तेव्हां त्रिदंडी संन्यासाची दीक्षा देऊन मीं तुला द्वारकेच्या राजवाड्यांत नेऊन घातला, आणि कृष्ण–बळरामाचं भांडण लावलं. त्यामुळं तर, महाराज, सुभद्रा आपल्या हातीं लागली! आहे का आठवण? तो कलह कांहीं फुकट नाहीं गेला म्हटलं.

सत्य०:—पण अशा एखाद्या उदाहरणावरनं कशी होईल असल्या मोठ्या अपराधाची संपादणी ?

नार०:—देवी, उदाहरणांना काय कमी ? पारिजातकाचं भांडण मीं लावून दिलं, अशी माझी या जगभर अपकीर्ति करून घेतली. पण इंद्राचा गर्वपरिहार करवून मीं कुणाचा हेतु साधून दिला, हें श्रीकृष्णानंच सांगावं! तसंच दरएक अवतार होण्याची आणि राक्षसांचा नाश होण्याची वेळ जवळ आली म्हणजे देव-दैत्यांची कलागत लावून द्यायला ढकला नारदाला पुढं ! बरा सांपडला आपला नारद मुरदाड दुतोंडा आणि चहाडखोर म्हणवून घ्यायला ! सगळे शूर देव मिळून दैत्यांचा पुढं काय समाचार घेतील तो घेवोत; पण त्यांच्या तोंडीं प्रथम द्यायला बरा आपला नारद मिळाला जेव्हां तेव्हां ! कपटपटूंच कपट सिद्धीला जायचं, तर कलहपटूंची जोडी त्यांना अवश्य लागते. साधकांवांचून सिद्धांचं कसं होणार ?

कृष्ण:—तें सगळं खरं—पण, नारदा, इतर कलहांची गोष्ट राहूं दे ना ! आज या ठिकाणीं येऊन कलह लावण्यांत तर नव्हताना कांहीं परोपकार साधायचा ?

नार०:—( स्वगत ) तें आतांच कसं कळणार तुम्हाला ? (उघड) छेः ! कसला परोपकार ? आज मी इथं कलह लावायला आलों असं वाटतं कीं काय तुम्हांला ? भलतंच ! असे असे कसोटीला लागलेल्या प्रेमाचे मित्र, लोकोत्तर प्रेमाची नवरा-बायको या ठिकाणीं जुळलेलीं आहेत. मी त्यांच्यांत कलह कसा लावणार ? माझी बुद्धि आपली गरीब बायाबापड्यांमध्यें नाहीं

तर भोळ्याबेड्या राक्षसांमध्यें चालणार ! इथं सगळे एकमेकांच्या तळहाताचे फोड जुळले आहेत, ते मी कसे फोडणार ? बरं, मी जातों तर आतां; चालू द्या तुमच्या प्रेमसंवर्धनाचं काम अव्याहत !

[ उठून जाऊं लागतो. ]

कृष्णः—नारदा! आमच्या प्रेमसंवर्धनाचं काम सुरू आहेच. पण तूं आपली कलहप्रियता सोडून देईनास ? म्हणजे प्रेमसंवर्धनाच्या कामांत आणखी थोडी भर पडेल !

नार०:—काय ! मी कलह लावतों ? कोण ही माझी निंदा ! किंवा निदान शब्दांचा अर्थ तरी फिरला असला पाहिजे. कारण, मी जे व्यक्तिसंबंध वडवून आणतों, त्याला जर कलह हेंच नांव दिलं पाहिजे असं जगानं ठरविलं, तर म्हणेन कीं मी माझी कलहबुद्धि कधींहि सोडणार नाहीं !

अर्जु०:—तें कां ?

नार०:—नित्य उठल्या बसल्या शस्त्रास्त्रांशीं गांठ घालणाऱ्या क्षत्रियानं तरी असं विचारूं नये ! अर्जुना, मला वाटतं तुला रोज कलहापायीं एकादा वीर मारल्याशिवाय सकाळचा उपहार करवत नसेल. दुपारच्या जेवणापूर्वीं आणखी कित्येक वीर मरत असतील ! आणि उरलेल्या मोठ्या दिनार्धांत तर काय वाटतील तितके ! कायरे ? ' माझी भूक तूं भागविशील तेव्हांच तुझी भूक मी भागवीन ' असा, मृत्यूनं तुला शाप तर दिला नाहीं ? निदान तुम्हां दोघां वीरामध्यें तसा करार तरी असावा !

अर्जु०:—वीरांच्या हातून वीर मरत असतील; पण युद्ध हें त्यांचं कर्म म्हणून !

नार०:—घातपातांचं समर्थन जर असलं गोड नांव देऊन करितां आलं, तर कलहाचं तरी कां करितां येऊं नये ? ऐक, कलह हेंच वेदान्तिकांचं द्वैत ! कलह हा निसर्गसिद्ध आहे ! कलह हा परमात्म्याला फार प्रिय असतो ! ' बहु स्यां प्रजायेय ' अशी इच्छा जेव्हां त्याला झाली तेव्हांच आद्य कलहाचं प्रवर्तन झालं ! कलहानं संसृतीचं वैचित्र्य वाढतं ! कलहानं प्रकृतिगुणांचा विकास होतो ! कलहानं सात्विक स्पर्धा सुरू होते ! कलहानं राजस आकांक्षांचं संवर्धन होतं, कलहानं तामस गुणांना प्रवृत्तिक्षेत्र मिळून

त्यांचा नाश होतो ! कलहानं मित्रप्रेमाची परीक्षा होते ! कलहानं पति-पत्नीप्रेमाला रंग चढतो—

अर्जु०:—मला वाटतं नारदा, यापेक्षां कलह हा मला स्वतःला प्रिय आहे, येवढं एकच वाक्य आपण बोललां तरी पुरें होईल !

नार०:—काय, अर्जुना, तसं म्हणतोस ? तथास्तु ! पण माझं कलह-प्रेमच कशाला ? इथं तुम्ही सगळे अस्सल अस्सल प्रेमकंद जुळलां आहां, त्या तुमच्या प्रेमाला तरी आत्मप्रेमावांचून दुसरं खरं अधिष्ठान कोणचं आहे सांगा पाहूं ?

कृष्ण०:—तें कसं काय बुवा ? सांग तरी !

नार०:—सांगूंच ? ऐका तर. ' न वा अरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवति आत्मनस्तु प्रेमाय पतिः प्रियो भवति. ' ही देवी द्रौपदी आणि हा अर्जुन ! कुणाला वाटेल कीं इचं याच्यावरचं प्रेम अर्जुनाक-रितांच असेल; पण खोटी गोष्ट !

सत्य०:—मग काय ? वन्संचं अर्जुनभावोजींवर प्रेमच नाहीं तर ?

नार०:—आहे, पण तें अर्जुनाकरितां नव्हे ! तिला स्वतःला त्या प्रेमाचं सुख वाटतं म्हणून ! आणि तें सुख तरी कां वाटतं ? तर तिला स्वतः प्रिय असं जें युद्ध तें करून तिचा अपमान ज्यांनीं ज्यांनीं केला त्यांचा त्यांचा सूड अर्जुनानं उगवला म्हणून ! नाहींतर काम्यक वनांत वनवास भोगीत असतांना ती धर्माला कसं टाकून बोलली हें तिचं तिलाच माहीत आहे !

कृष्णः—( हंसून ) हं ! हें झालं एक उदाहरण !

नार०:—म्हणजे मीं दुसरं एखादं उदाहरण द्यावं वाटतं ! आणि ही नव्हे वाटतं कलहबुद्धि ! बरं बाबा देतों. माझ्या स्पष्टवक्तेपणामुळं तुम्हांला जो काय राग यायचा तो एकदांच येऊन जाऊं दे. मग उदा-हरणं देण्यांत उगीच पक्षपात तरी कशाला करूं ? आतां पतिपत्नीप्रेमाचं दुसरं उदाहरण ! ही देवी सत्यभामा. पारिजातकाच्या फुलांपेक्षां अधिक सुगंधी असं जगांत दुसरं कांहीं मिळालंच नसतं कांहीं ! पण जोंपर्यंत पारिजातकाचं झाड मंदिरांत येऊन लागलं नाहीं, तोंपर्यंत कृष्ण हा नवरा

आणि देवी सत्यभामा ही त्याची बायको असं कुणी तरी म्हटलं असतं का ? शत्रूला शत्रू तरी कमी त्रास देतात. शेवटीं दारांतल्या पारिजातकाची कळी उमलली तेव्हां सत्यभामेच्या तोंडाची कळी उमलली ! ' न वा अरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवति आत्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति. ' बोला आहे कीं नाहीं खरं तें !

कृष्णः—( सत्यभामेकडे पाहून ) ऐकलं का आपल्या प्रेमाचं वर्णन नारदानं केलं तें ?

नार०:—आतां हीं बहीणभावंडं राहिलीं! त्यांचं तर काय सांगायचं? मुळीं बोलूनचालून लावालावीचं नातं ! त्यांत कसला येणार प्रेमाचा जिव्हाळा ! वेळ पडली तेव्हां तेव्हां धांवून आला, राबला, कामं केलींन् संकटं निवारलींन्, मिळून काय आपलं बरं केलन् म्हणून द्रौपदीचं कृष्णावर प्रेम ! एरवीं उगीच कोण कोणावर प्रेम करितो ? 'न वा अरे भ्रातुः कामाय भ्राता प्रियो भवति आत्मनस्तु कामाय भ्राता प्रियो भवति ' !

द्रौप०:—बरं बाई आमचं बायकांचं प्रेम असो आपलं आप्पलपोटे-पणाचं ! आम्ही बायका तशाच ! पण नारदा आतां एका जोडीचं तेवढं वर्णन राहिलं. ( अर्जुनाकडे पाहून ) इकडं आणि इकडचं कृष्णावर प्रेम कशाकरतां आहे तेवढं एकदां सांगा ! म्हणजे आम्ही सगळीं एकाच पंक्तीला बसलों आहों हें वर्णन अक्षरशः खरं तरी होईल !

सत्य०:—होय वन्सं, म्हणजे मग कुणीं कुणास नांवं तरी ठेवायला नकोत

नार०:—देवी द्रौपदी, येवढा मात्र प्रश्न तूं जरा बिकट केलास खरा. आतां अर्जुनाचं कृष्णावर प्रेम कां आहे याचं उत्तर इतकं सोपं आहे, कीं तें मीं न देतांहि तुमच्या लक्षांत येईल ! अग काय सांगावं ! कृष्णाच्या उपकारांना कांहीं सीमा का आहे ?

अर्जु०:—( कृतज्ञतेनें ) होय, नारदा, येवढं मात्र तुम्ही सत्य बोललां.

नार०:—अर्जुना, माझा सत्यवक्तेपणा वाखाणण्याची जरा घाई केली-सरे ! कारण, पुढं मी काय बोलणार हें आहे का तुला ठाऊक ?

अर्जु०:—तें काय ?

नार०:—तें असं. कृष्णाकरितां जर तुझं त्याच्यावर खरं प्रेम, तर

तीर्थयात्रेंत भटकतांना, कृष्णानं सुभद्रा दुर्योधनाला द्यायचा बेत केला आहे हे शब्द मीं तोंडानं उच्चारले मात्र–अर्जुना ! ते खरे कीं खोटे याचा विचार-सुद्धां तूं केला नाहींस; आणि या कृष्णाला तूं माझ्यादेखत लाख शिव्या वाहि-ल्यास त्या काय कृष्णप्रेमाकरितां वाटतं ? म्हणून उपनिषदांचंच वचन खरं. मी शब्दांत थोडा फरक करून म्हणतों, ' न वा अरे मित्रस्य कामाय मित्रं प्रियं भवति, आत्मनस्तु कामाय मित्रं प्रियं भवति ! '

कृष्ण:—(हंसून) आतां आली आमची पाळी ! नारदा ! निंदेचा गोड घास म्हणून मला सर्वांच्या मागं ठेवलंस वाटतं !

नार०:—श्रीकृष्णा, तुझ्या प्रेमाला मात्र मला अजून कांहीं म्हणतां येत नाहीं. कारण, अर्जुनानं तुझ्यावर कांहीं उपकार केले असं म्हणवत नाहीं. केले असलेस तर तूंच त्याच्यावर केलेस. पण म्हटलं कृष्णार्जुनचरित्र कांहीं अद्यापि संपलं नाहीं ! तेव्हां कृष्णा, तुझं तरी प्रेम–म्हणजे तुझं आत्मप्रेम–कसोटीला लागायची वेळ आली तर तूं काय करशील हें कसं कुणीं सांगावं ?

कृष्ण:—म्हणजे माझ्या प्रेमाचा आंबा, नारदा, तुम्हीं अढीला लावलेला आहे. पिकतो कां कुजतो हें अजून पहायचंच आहे !

द्रौप०:—(हंसून) असो ! तूर्त तरी कृष्णविजयच आहे म्हणायचा !

[ पडद्यांत वनदेवी वाद्यें वाजवून गाणें गाऊं लागतात. ]

वन०:—( प्र० क० ) वनप्रवेश करायची सर्व सिद्धता आहे.

कन०:—सर्वांनीं आतां चलावं ! नारदा, आपणही !

नार०:—छे छे ! जा तुम्ही सर्व. मला आधीं गंगेवर गेलं पाहिजे.

[ एका बाजूनें नारद व एका बाजूनें इतर सर्व जातात. ]

---

## प्रवेश दुसरा.

स्थळ—गंगानदीच्या कांठचें यक्षद्वीप

[ दोघे ऋषिकुमार स्नानाच्या व पूजे-अर्चेच्या तयारीनें चालले आहेत. ]

१ ऋ० कु०:—अरे ! इकडे कुणीकडे चाललास ?

२ ऋ० कु०:—इकडंच जायचं. इकडं कुणीकडं म्हणजे ?!

१ ऋ० कु०:—म्हणजे ब्रह्मघाटाची वाट सोडून ?

२ ऋ० कु०:—तुला काय त्याचं ? तूं आपला निमूटपणं माझ्या मागून चल !

१ ऋ० कु०:—वा! आज अगदीं गुरुजींसारखीच आज्ञा करतो आहेस!

२ ऋ०कु०:—गुरुजींच्या पादुका माझ्या हातांत आहेत ना? झालं तर! तुझा तात्पुरता गुरूच मी! चल माझ्या मागून.

१ ऋ० कु०:—मोठा भाग्याचा खरा तूं. कारण, इतक्या अल्पवयांत गुरुपद लाभून वरती माझ्यासारखा ब्रह्मनिष्ठ तपोनिधि शिष्यहि तुला मिळाला. (स्वर बदलून) पण थट्टा राहूं दे. खरंच सांग ना, रोजची वाट सोडून इकडं कुठं निघालास वेड्यासारखा ? आणि मीहि आपला वेड्यासारखा तुझ्या मागनं चाललों आहें.

२ ऋ० कु०:—हें बघ, तूं वेडा नाहींस आणि मीहि वेडा नाहीं. आज ब्रह्मघाटाकडं स्नानाला जायचं नाहीं.

१ ऋ० कु०:—तर मग कुणीकडं ?

२ ऋ० कु०:—आज यक्षद्वीपाकडं स्नानाला जायचं, अशी गुरुमहाराजांची आज्ञा झाली आहे. आणि म्हणूनच चाललों आहे रोजची वाट सोडून. समजलास आतां तरी ?

१ ऋ० कु०:—काय ? यक्षद्वीपाकडं ? (भिऊन) अरे बापरे! (त्रासून) पण तिकडं काय म्हणून ?

२ ऋ० कु०:—सांगतों नीट ऐक. गुरुजी काल मला म्हणाले, उद्यां अर्धोदय पर्व आहे, तेव्हां तपोवनांतले झाडून सारे तापसी लोक एकाच वेळीं ब्रह्मघाटावर स्नानाला जाणार ! शिवाय कुशग्रामाहून आलेले नागरिक लोकहि सर्व तिथंच लोटणार! इतक्या गर्दीत गायत्रीपुरश्चरण व्हावं तितकं स्वस्थपणानं होणार नाहीं. यक्षद्वीपावर एकांतवास चांगला मिळतो. म्हणून स्नानाला तिकडं जायचं. आपण इकडून निघालों आहों; गुरुजी दुसऱ्या वाटेनं गंगातीरावर जाऊन कदाचित् पोंचलेसुद्धां असतील. चल आटप. पाऊल उचल.

१ ऋ० कु०:—( भीतीनें थरकांप होऊन ) यक्षद्वीपाकडं जायची आपली नाहीं बोवा छाती होत ! भीति वाटते !

२ ऋ० कु०:—भीति ? ती काय म्हणून ?

१ ऋ० कु०:—वः ! तुला जसं कांहीं माहीत नसल्यासारखाच विचारतोस मला !

२ ऋ० कु०:—खरंच नाहीं लक्षांत आलं. सांग पाहूं तूंच !

१ ऋ० कु०:—आधीं एक तर तिथल्या भयंकर डोहांतनं इत्तीएवढालीं प्रचंड कासवं आणि सिंहासारख्या बलाढ्य सुसरी आहेत. मागं तपोवनांतल्या त्या तपस्व्याला धरून एका सुसरीनं आपल्या घरांत नेलं हें नाहीं वाटतं तुझ्या ध्यानांत ?

२ ऋ० कु०:—होय. पण तो तपस्वी आपल्या योगबलानं त्या सुसरीचं घर पाहून तिच्याच पाठीवर बसून पाण्याच्या वर आला हें तूं विसरलास वाटतं?

१ ऋ०कु०:—होय. पण बाबा सगळ्यानांच कुठं असतं असलं योगसामर्थ्य ! भर दोनप्रहरीं या यक्षद्वीपावर आलं तरी भीति वाटायची. मग अशा पहाटेच्या वेळीं—? मला वाटतं गुरुजी आपल्या धैर्याची परीक्षाच पहाताहेत ! अशा पहाटे—आणि या यक्षद्वीपावर !

२ ऋ० कु०:—पण पहाटे झालं म्हणून कोणरे इथं बसला आहे खायला तुला किंवा मला ?

१ ऋ० कु०:—आपल्या यज्ञदत्ताची आणि यक्षाची गांठ या यक्षद्वीपावर पडली ती गेल्या अमावास्येच्या पहाटेच ! आणि पुढं काय प्रकार झाला तो तुला आहेच माहीत.

२ ऋ० कु०:—मी असल्या भितऱ्या भागूबाईच्या गोष्टीत मन घालीत नसतों. मला नाहीं माहीत काय झालं तें ! तूंच सांग पाहूं ?

१ ऋ० कु०:—असं झालं कीं, ( भयानें इकडेतिकडे पाहून ) गंगेच्या वाळवटांत जों त्याचं पाऊल पडलं तोंच वर आकाशांत गंभीर असा एक आवाज घुमूं लागला—घुं—घुं करून.

२ ऋ० कु०:—(थट्टेनें) कसं म्हटलंस—घुंः ( वेडावून ) वरं कसला होता तो आवाज ?

१ ऋ० कु०:—कसला कुणाला ठाऊक? आणि कांहीं वेळानं पाहतों तों—

२ ऋ० कु०:—(दचकून) पण ऐक हां. नीट कान दे पाहूं!—थांब जरा, बोलूं नको!—

१ ऋ० कु०:—कां बरं?

२ ऋ० कु०:—( वरखालीं पाहून ) ऐक तुला कसलासा आवाज ऐकूं येत नाहीं?

१ ऋ० कु०:—होयरे होय. मला वाटतं या शेजारच्या झाडावरनं भुंगे उठले असावे आपल्या हालचालीनं जागे होऊन.

२ ऋ० कु०:—छेः रे! सूर्योदयाशिवाय भुंगे झाडावरून उठतात वाटतं कुठं?

१ ऋ० कु०:—नाहीं तर एखाद्या पोळ्यावरनं मधमाशा उठल्या असतील! घे घे तें हरिणाजीन अंगावर नीट पांघरून—अस्सं—म्हणजे चावायच्या नाहींत.

२ ऋ० कु०:—छेः रे! दहा पोळ्यांवरून साऱ्या मधमाशा एकदम उठल्या, तरी हा असा खोल आणि गंभीर आवाज खचित व्हायचा नाहीं कधीं!

१ ऋ० कु०:—मग हें काय असावं बरं?

२ ऋ० कु०:—पहा वर पहा, उंच अंतरावरुन तो आवाज हळुहळूं खालीं आमच्याकडेच येतो आहे असं नाहीं वाटत तुला?

१ ऋ० कु०:—अरे होय कीं! आतां कसं करावं बरं? मला तर भीतिच वाटते बुवा.

२ ऋ० कु०:—अरे आलं रे आलं! धांव धांव! डोक्यावर आदळणार बघ काय आहे तें.

१ ऋ० कु०:—डोकं फुटणार! धांव धांव!

[ ते दोघेहि इकडेतिकडे सैरावैरा धांवतात. इतक्यांत वरून एक विमान उतरतें व त्यांतून एक गंधर्व व त्याची स्त्री खालीं उतरतात. ]

गंध०:—(दरडावून) काय रे ए मानवांच्या कार्ट्यांनो! कोण तुम्ही? बोला लौकर!

गं० स्त्री:—शर्थ झाली बाई या मानवांच्या कार्ट्यांची. आमच्या स्वतःच्या द्वीपावर जरा थोडासा एकान्त मिळेल म्हणून इकडं आलों, तर हे आपले कोडगे निलाजरे आहेतच इथं अगदीं ठेवल्यासारखे.

गंध०:—( पुढें होऊन ओरडून ) काय रे ए! बोलतां कीं नाहीं कोण तें बऱ्या बोलानं ?

१ ऋ० कु०:—( भीत भीत ) आम्ही—ऋषिकुमार—आहोंत.

गं०:—ऋषिकुमार ? बरं असाल. पण इकडं कुठं चाललां या वेळीं ?

२ ऋ० कु०:—स्नानाला चाललों गंगेवर !

गंध०:—गंगेवर स्नानाला जायला उजाडलं का ?

गंध० स्त्री:—आश्रमांतलीं कार्टीं ! त्यांना दिवस-रात्र कांहीं आहे का! सारे आठी प्रहर त्यांना सारखे. पाण्यांत जेव्हां तेव्हां बुडी मारायची कावळ्यासारखी, आणि राखाडी फासायची अंगभर उठल्या-सुटल्या. त्यांना काय ? उठले कीं चालले नदीवर !

गंध०:—काय रे ! गंगेवर स्नानाला जायला उजाडलं का ? [तडाखे देतो.]

१ ऋ० कु०:—अजून थोडी रात्र आहे खरी !

गंध०:—मग !

२ ऋ० कु०:—पण आज अर्धोदय पर्व आहे म्हणून चाललों आहों जरा पहाटे इतकंच.

गंध०:—अस्सं ! पण रोज तुम्ही याच घांटावर स्नानाला येतां का ?

१ ऋ० कु०:—नाहीं, ब्रह्मघांटावर जातों.

गंध०:—मग बोला, आजच या घाटावर कां आलां ? रात्र संपून अरुणोदय होईपर्यंत या यक्षद्वीपावर आम्हां यक्षगंधर्वांचं स्वामित्व असतं, मनुष्याचा संचार आम्ही होऊं देत नाहीं, हें माहीत आहे कीं नाहीं तुम्हांला ?

२ ऋ० कु०:—(गोंधळून) नाहीं- हें कांहीं आम्हांला माहीत नाहीं—

गं० स्त्री:—माहीत नसायला काय झालं ? या मानवांच्या कार्ट्यांना मुळीं खोडच खोटं बोलायची !

१ ऋ० कु०:—( काकुळतीनें ) नाहीं हो आम्हांला खरंच माहीत नाहीं हे कांहीं.

गंध०:—पण माहीत नसलं म्हणून काय झालं ? अज्ञानानं कांहीं अपराध नाहींसा होत नाहीं !

२ ऋ० कु०:—हो आमची ती चूक झाली खरी.

१ ऋ० कु०:—हो तसं हवं तर म्हणावं.

गं० स्त्री:—पहा पहा. हा दुसरा मुलगा चूकसुद्धां कबूल करीत नाहीं.

गंध०:—(दरडावून) काय रे ! चूक कबूल करतोस कीं देऊं तडाखे ?

१ ऋ० कु०:—( भीतीनें ) नको नको. तडाखे काय म्हणून ? मी एकदां कां पण शंभर वेळां चूक कबूल करितों, मग तरी झालं ना ?

गंध०:—पण नुसती चूक कबूल करून कसं भागणार ? या अपराधाबद्दल तुम्हांला शासनहि कां करूं नये सांगा.

गं० स्त्री:—पण मी म्हणतें, तीं काय गरीब ऋषींचीं पोरं. जाऊं दे, त्यांना शासन कसलं करायचं ?

गंध०:—( तिरस्कारानं हंसून ) गरीब ऋषींचीं पोरं ! तींच तर अलीकडे आम्हां यक्षगंधर्वांचा सांपडेल तिथं पावलोंपावलीं अपमान करीत असतात. स्वतः अपमान करतातच, आणि दुसऱ्यालाहि अपमान करायला शिकवितात. तीं गरीब म्हणून त्यांची कींव करणं बरोबर नाहीं. तीं गरीब आहेत म्हणूनच उन्मत्त आहेत. एकवेळ श्रीमंतांकडून झालेला अपमान मला सोसवेल; पण गरीबांकडून झालेला अपमान माझ्या मनाला दुप्पट झोंबतो. तें कांहीं नाहीं त्यांना शासन केलंच पाहिजे. [मारावयास धांवतो.]

गं० स्त्री:—नको नको. त्यांना मारूं नये. त्यांच्या पाठी कसल्या मेल्या ? दगड ते ! आपल्या कोमल हातांना लागेल उगीच !

गंध०:—यक्षद्वीपावर सूर्योदयापूर्वी संचार केल्याबद्दल यांना शासन हें झालंच पाहिजे. नाहीतर आमचा दरारा राहणार नाहीं. पण प्रिये ! तुझं कोवळं मन मारामारी पाहून दुखावेल म्हणून मीं त्यांना कांहीं वेगळंच शासन करतों म्हणजे झालं !

गं० स्त्री:—( आश्चर्यानें ) तें कोणतं बाई !

गंध०:—पहा कोणतं तें. ( १ ल्या ऋषिकुमारास ) काय रे ए ब्राह्मणाच्या पोरा ! तुझ्या त्या वेताच्या करंड्यांत काय आहे सांग पाहूं ?

१ ऋ० कु०:—कांहीं नाहीं. गंगादेवीची पूजा करण्याकरितां गंध आणि पंचामृत घेतलं आहे थोडंसं यक्षमहाराज !

गंध०:—अस्सं ! ठीक आहे. तुझ्या त्या गंगादेवीचं राज्य सूर्योदयानंतर. तोंपर्यंत माझंच राज्य या यक्षद्वीपावर असतं हें तुला शिकावेलंच पाहिजे. या क्षणीं या द्वीपाची राणी ही माझी प्रियाच आहे. म्हणून कर, गंगेच्या पूजेला आणलेल्या साहित्यानं इची पूजा कर पाहूं. ( ऋषिकुमार तोंड वाईट करितो. ) कां ? लाज कशाची वाटते ?

गं० स्त्री:—हें कां विचारायला का पाहिजे ? हीं ऋषींचीं कार्टीं ! तोंडांतनं शब्दहि न काढतां नुसत्या तोंडाच्या चर्येनंहि आमचा अपमान करतील ! नको मेले ते त्यांच्या मनांतले विचार कळायलासुद्धां नको !

गंध०:—तुझी ती गंगा स्वर्गातून खालीं आली तशीचही माझी प्रियादेखील, क्षणभर भूलोकाला शोभा आणण्याकरितां स्वर्गातून खालीं येत असते. तिचंहि नित्य वास्तव्य देवांजवळच असतं. काय तूं इची पूजा नाहीं करीत! ठीक आहे.त्या गंगेचं नसतं स्तोम माजविणारांना यक्षगंधर्वस्त्रियांचं महत्त्व काय असतं हें शिकविलंच पाहिजे. चल वहा, तें सर्व पूजासाहित्य या देवीला वहा.

[ १ ला ऋषिकुमार तोंड वाईट करकरून गंधर्वस्त्रीला पूजासाहित्य वाहतो. पूजा चालू असतां गंधर्व व त्याची स्त्री एकमेकांकडं पाहून खिदीखिदी हांसून थट्टा करितात. ]

गंध०:—झालं ?

१ ऋ० कु०:—( उसासा टाकून ) झालं !

गंध०:—( २ ऱ्या ऋषिकुमाराला ) आतां तूं रे. तुझ्या खांकेंत काय दडवून ठेवलं आहेस, बोल लवकर.

२ ऋ० कु०:—कांहीं नाहीं—विशेष कांहीं नाहीं—( गंधर्व दटावतो ) तो कमलपत्राचा पुडा आहे.

गंध०:—आणि पुड्यांत काय आहे ?

२ ऋ० कु०:—पुष्पमाळा आहेत.

गंध०:—फार चांगलं. काढ त्या सर्व पुष्पमाळा आणि वहा त्या

माझ्या प्रियेला. हें बघ, पुष्पमाळा गळ्यांत घाल, पण त्या घालतांना जर कां तुझ्या त्या गलिच्छ हातांचा तिला यत्किंचित् हि स्पर्श झाला तर संभाळ, जागच्या जागीं तुझा प्राण घेईन.

[ २ रा ऋषिकुमार तोंड वाईट करीत पुष्पमाळा गंधर्वस्त्रीच्या गळ्यांत घालतो, व हें होत असतां गंधर्व व गंधर्वस्त्री खिदीखिदी हंसून त्याची थट्टा करितात. ]

गंध०:—अस्सं. यक्षद्वीपाच्या देवीची पूजा तर झालीच.आतां नैवेद्य. काय रे, या देवीच्या नैवेद्याला तुमच्याजवळ काय काय आहे बोला पाहूं. ( दोघेहि उत्तर न देतां गप्प बसतात. ) बोलतां कीं नाहीं ?

[ मारावयास धांवतो. ]

१ ऋ०कु०:-माझ्या पूजापात्रांत पंचामृत थोडंसं उरलं आहे-देतों हवं तर.

गंध०:—काय यक्षगंधर्वांच्या देवीला साध्या पंचामृताचा नैवेद्य ? मूर्ख अरसिक बेटे ! काय रे पंचामृतांतल्या पांच हि अमृतांचं जें खरं सार—सर्वस्व—तें तुमच्याजवळ आहे का ?

१ ऋ० कु० तें कोणतें ?

गंध०:—अरे मूर्खा, मद्य ! ( गंधर्व व गंधर्वस्त्री हंसतात. )

२ ऋ० कु०:—काय आमच्याजवळ मद्य ? तें कुठून येणार ? आम्ही ब्राह्मणऋषिकुमार आहों.

गंध०:—काय लेकाच्याचा दिमाख पहा ! ब्राह्मणांजवळ कुठचं मद्य ? कायरे, तुमचा बाप तो शुक्राचार्य, राक्षस—गुरु, ब्राह्मण आहे कीं चांडाळ आहे ? तो मद्य घेतों हें कधीं ऐकलं आहेत का तुम्हीं ? तो पितो तें मद्य कीं—तो शक्तिदेवीला कसला नैवेद्य दाखवितो ?

१ ऋ० कु०:—आमच्याजवळ पूजासाहित्यांत तो पदार्थ नाहीं येवढी मात्र गोष्ट खरी. दुसऱ्याची नसती उठाठेव आम्हांला कशाला हवी ?

गंध०:—पूजासाहित्यांत मद्य नाहीं ? मदिरा नाहीं ? भिकारडीं रे भिकारडीं हीं ब्राह्मणांचीं पोरं ! अशा रिकाम्या हातानं कशाला आलां या आमच्या यक्षद्वीपावर ? चला चालते व्हा—नाहीं तर—

[ लाथ मारायला उगारून धांवतो. ]



गंधर्व:—यक्षद्वीपाच्या देवीची पूजा तर झालीच. [ पृ० २४.

गं० स्त्री:—त्यांना लाथ मारूं नये.

गंध०:—कां बरं ? काय हरकत ?

गं० स्त्री:—आपण गंधर्व, ते मानव, त्यांना लाथ मारल्यानं आपल्या पायांना त्यांचा विटाळ नाहीं का होणार !

गंध०:—हो खरंच. मी तें विसरलोंच होतों. गंधर्वांच्या पायाची लाथ जर यांना मिळाली, तर त्यांना शिक्षा व्हायची ती बाजूलाच रून उलट त्यांचा सन्मान केला असंच होईल. ( आकाशांत आवाज ) पण ऐक प्रिये, ऐक. हें काय वाजतं बरं ?

गं० स्त्री:—खरंच मलाहि ऐकूं आलं पण—

गंध०:—अरे होय कीं, ही गंधर्वराज चित्ररथमहाराजांच्या सेनापतीची घंटा. तिचाच हा आवाज.

गं० स्त्री:—( खेदानं ) स्वर्गाकडं परत फिरायची वेळ झाली तर !

गंध०:—खरंच प्रिये, या यक्षद्वीपाच्या सुंदर लतानिकुंजांत आणखी कांहीं वेळ घालवावा अशी तुझ्याप्रमाणं माझीहि इच्छा होती; पण या सूर्याला—या आमच्या वैऱ्याला—आमचं क्रीडासुख कसं पहावणार ? शिवाय सूर्योदयापूर्वी ज्या घटका दोन घटका या यक्षद्वीपावर एकान्ताच्या मिळाल्या असत्या, त्या हि या मानवांच्या कार्ट्यांमुळं फुकट गेल्या ! काय करावं ?

गं० स्त्री:—घंटानाद फारच मोठ्यानं होऊं लागला !

गंध०:—होय ना ? चला चला तर. स्वर्गद्वार बंद होण्याच्या आधीं गंधर्वाधिपाच्या अनुचर मंडळींच्या विमानांत आपलंहि विमान नेऊन मिसळलं पाहिजे; नाहीं तर सर्व दिवसभर वटवाघळाप्रमाणं उलटं टांगून घेण्याची शिक्षा व्हायची !

गं० स्त्री:—पण स्वतः चित्ररथमहाराज अद्यापि गंगेवर विमानांतून हिंडतच आहेत ना ?

गंध०:—त्यांचं ठीक आहे. त्यांची क्रीडा तर या अरुणोदयाच्या वेळीं ऐन भरांत आली असेल. ते सूर्योदयानंतर वर आले तरी त्यांच्याकरितां स्वर्गद्वार उघडलं जातं. आम्हां अनुचरवर्गाला कोण देणार इतकी सवलत ! आपला पडला सेवाधर्म—करायचं काय ! चला झालं ! (जातां जातां)

ए ब्राह्मणांच्या पोरानों, आजच्या अपराधाची तुम्हांला क्षमा केली आहे. पण जर कां फिरून सूर्योदय होण्यापूर्वी या यक्षद्वीपांत तुम्ही पाऊल टाकाल तर संभाळा, हाडंच मोडीन ! आणि जर चुकून कधींकाळीं आलांच तर आजच्यासारखं पूजासाहित्य गंध, पंचामृत, पुष्पांच्या माळा या अशाच आणा. आणि मद्य मात्र आणायला विसरूं नका. तें जर कां विसरलां तर मग प्राणच घेईन, सोडणार नाहीं.

[ गंधर्व व त्याची स्त्री विमानांत बसून वर जातात. ]

१ ऋ० कु०:—धिक्कार धिक्कार आम्हां ऋषिकुमारांना !

२ ऋ० कु०:—आतां कसलं गंगास्नान आणि कसलं संध्यावंदन !

१ ऋ० कु०:—अरेरे ! प्रत्यक्ष गंगामातेला अर्पण करण्याचा चंदनलेप या भ्रष्ट हातांनीं त्या वारयोषितेच्या पायाला मीं लावला ! माझे हात जळाले कां नाहींत !

२ ऋ० कु०:—आणि गंगादेवीला वाहायच्या पुष्पमाळा या पण्यांगनेच्या गळ्यांत मीं घातल्या ! माझे हात तुटून पडते तरी बरं झालं असतं !

१ ऋ० कु०:—तरी मीं सांगत होतों, कीं पहाटेच्या वेळीं या यक्ष-द्वीपाकडं जाऊंया नको म्हणून ! तेव्हां तुला केवढं धैर्य आलं होतं—

२ ऋ० कु०:—मीं झालों तरी स्वतःच्या हौसेनं थोडाच आलों इकडं. गुरुजींनीं सांगितलं म्हणून.

१ ऋ० कु०:—तूं आधीं तसं सांगतास तर गुरुजींच्याबरोबरच गेलों असतों. भलत्या वाटेनं तरी यायला नको होतं—

२ ऋ० कु०:—मला तरी काय माहीत यक्षगंधर्वांच्या ऐकलेल्या गोष्टी कधीं खऱ्या होतात म्हणून? [तिसरा एक ऋषिकुमार प्रवेश करतो.]

३ ऋ० कु०:—अरे,गुरुजी तर पलीकडं स्नान करून गंगाप्रवाहामध्यें ओल्या वस्त्रानिशीं उभे आहेत, आणि तुम्ही इथं काय करतां अजून ?

१ ऋ० कु०:—( तोंड वाईट करून ) मित्रा, काय सांगूं तुला ?

२ ऋ० कु०:—हें तोंड आतां गुरुजींना दाखवावं तरी कसं ?

१ ऋ० कु०:—या डोहांत उडी मारून प्राण द्यावा असं मला तरी वाटतं.

२ ऋ० कु०:—नाहीं तर पलीकडे पेटणाऱ्या त्या चितेच्या ज्वाळेंत तरी जाऊन पडावं.

३ ऋ० कु०:—अरे पण प्राणत्याग करण्यापर्यंत मजल यायला असं झालं काय तें तरी सांगशील कीं नाहीं ?—

१ ऋ० कु०:—(जमिनीकडं बोट दाखवून) तें पहा खालीं म्हणजे कळेल !

३ ऋ० कु०:—अजून अरुणोदय नीट न झाल्यामुळं पुरतं दिसत नाहीं; पण (हातानं चांचपून पाहून) हीं हरिणाजिनं, हे वेतांचे करंडे इथंच कसे विसकटून पडले आहेत ?

१ ऋ० कु०:—तेंच तर दुःख वाटतं. आतां गुरुजींना काय सांगावं ?

३ ऋ० कु०:—पण असं झालं तरी काय ?

१ ऋ० कु०:—मस्तीला आलेल्या गंधर्वांचा प्रताप ! दुसरं काय ?

३ ऋ० कु०:—गंधर्वांनीं का येऊन तुम्हांला त्रास दिला ? अस्सं! हें गुरुजींना सांगितलंच पाहिजे. तेच त्याचा परिहार करितील. पण ते आले कुठून काय हें सर्व सांगशील कीं नाहीं ?

२ ऋ० कु०:—चल वाटेनं सर्व सांगतों. गुरुजी वाट पहात असतील.

[जातात.]

---

## प्रवेश तिसरा.

स्थळ—गंगानदीचें तीर.

[ गालव व कौशिक नदीच्या पात्रांत उभे राहून संध्यावंदन करीत आहेत. वरती आकाशांत चित्ररथ गंधर्व विमानांत बसून स्वस्त्रीशीं क्रीडा करीत आहे. ]

गाल०:—कौशिका, मनाचा धर्म मनालाच माहीत. पण गंगेच्या प्रवाहांत मी उभा असलों म्हणजे दशदिशा पवित्रपणानं भरून गेल्या आहेत असं मला वाटूं लागतं.

**चित्र०:**—प्रिये मालती, ही गंगा फार मत्सर करणारी आहे. तुझ्यासमवेत मी चांदण्यांत क्रीडा करीत असतां मला ही आमचं एकच प्रतिबिंब दाखविते. सर्व पात्रामध्यें अनंत प्रतिबिंब दाखवील तर माझ्या क्रीडेचा आनंद अगणित होणार नाहीं काय ? दशदिशाभर जिकडं पहावं तिकडं माझ्यातुझ्याप्रमाणं विलासी स्त्रीपुरुष क्रीडा करीत असलेले दिसावे असं मला वाटतं. पण गंगेच्या कृपणपणामुळं तें घडून येत नाहीं.

**गाल०:**—कौशिका, ही गंगा म्हणजे स्वर्नदी. पण तें उत्तम स्थान सोडून ती मृत्युलोकावर अवतरली. केवढी ही तिची परोपकारबुद्धि !

**कौशि०:**—गंगेचा अवतारच पापी प्राण्यांचा उद्धार करण्याकरितां आहे. पण पापमय त्रैलोक्यांत ती आमच्या वांटणीला आली हें आमचं मोठं भाग्य खरं.

**चित्र०:**—प्रिये मालती, ही गंगा जशी मत्सरी आहे तशीच ती पापी हि आहे.मला वाटतं हिच्यासारखी जारिणी स्त्री त्रैलोक्यांतहि मिळणार नाहीं.

**माल०:**—कशी मिळणार ? खुद्द शंकरासारख्या प्रेमळ पतीनं डोक्यावर धरली, तरी तिथून खालीं उडी घेऊन मृत्युलोकांत एका यःकश्चित मानवाबरोबर क्रीडा करण्यांत तिला धन्यता वाटली !

**गाल०:**—धन्य तो भगीरथ, कीं ज्यानं पुण्याचा हा अखंड मूर्तिमंत ठेवा आम्हांला मिळवून दिला.

**कौशि०:**—भगीरथाची तपश्चर्या तशीच होती. अशा तपश्चर्येशिवाय अशा गोष्टी कशा घडून येणार ?

**चित्र०:**—प्रिये, तूं बरोबर बोललीस. आणि स्वैराचारिणीनं भूलोकावर यायला निमित्त केलंन भगीरथाचं.

**माल०:**—पण असल्या निमित्तानं पाप थोडंच कमी होणार !

**गाल०:**—या भगीरथाला तपश्चर्येचं जसं फळ मिळालं तसं दुसऱ्या कोणाला क्वचितच मिळालं असेल.

**कौशि०:**—होय महाराज.नेहमीं तपश्चर्येनं फार तर मनुष्याचा आत्मोद्धार होतो. भगीरथाच्या तपश्चर्येनं नुसता त्याचाच काय, पण त्याच्या सर्व कुळाचा उद्धार झाला.

गाल०:—एवढंच नव्हे, तर सर्व मानववंशाचा उद्धार झाला असं कां नाहीं म्हणत ?

माल०:—महाराज, मला वाटतं, भगीरथ हा कोणी तरी बायकांना भुलवून घरांतून काढून नेण्याच्या विद्येंत पटाईत असा धूर्त असावा.

चित्र०:—होय प्रिये, मलाहि तसंच वाटतं. कारण, एरवीं पति-गृहांतून बाहेर पडून मंत्रविद्येनं भारल्याप्रमाणं ती त्याच्या पावलावर पाऊल टाकीत कशी जाईल ?

माल०:—बरं, स्वर्गलोकांतनं एका परपुरुषाच्या छंदानं ही कुलटा गंगा पृथ्वीवर आली. पण त्याला तरी तिनं सुख द्यायचं होतं जन्मभर ! त्याचा मनोरथ अपूर्ण ठेवून त्याला सोडून अखेर गेलीच कीं नाहीं ? आणि गंधर्वकुळांतल्या ऊर्वशीला मात्र लोक नांवं ठेवतात, कीं तिनं पुरूरव्याला वियोगदुःख दिलं म्हणून.

चित्र०:—होय प्रिये, तूं उदाहरण मात्र उत्तम दिलंस यांत शंका नाहीं. गंधर्वकुळाला नांवं ठेवायला मात्र लोकांच्या जिभा चुरचुरू चाल-तात. पण देवांच्या घरचीं छिद्रं त्यांना दिसत नाहींत.

गाल०:—कौशिका, गंगामातेची मानववंशावर किती प्रीति आहे हें भीष्माला प्रत्यक्ष पुत्रपद देऊन तिनं सिद्ध केलं यांत शंका नाहीं.

कौशि०:—खरंच आहे. पुत्रपद देण्यापेक्षां दुसऱ्या कोणत्या गोष्टीनं इतकं निःसीम प्रेम व्यक्त होणार ?

माल०:—पण महाराज, गंगेनं शंतनूला नुसतं वियोगदुःख दिलं असतं तरी मीं तिला इतकीं नांवं ठेवलीं नसतीं. म्हटलं असतं कीं किती केलं तरी शेवटीं स्वर्गसुखच अधिक वाटलं म्हणून गंगा दुसऱ्या नवऱ्याला सोडून पहिल्या नवऱ्याकडं निघून गेली. पण झाला मुलगा कीं दे नदींत टाकून, झाला मुलगा कीं दे नदींत टाकून, असं सात वेळां करून त्या बिचाऱ्या शंतनुला सात वेळां पुत्रशोक कीं हो घडविला ! हीं मुलं जगतीं तर तिच्या सुखविलासाच्या मार्गांत एक अडचण झाली असती, हेंच कीं नाहीं त्यांच्या नाशाचं कारण ? पण कोण ही राक्षसी विषयसुखाची लालसा ! आमच्या अप्सरांच्या आणि गंधर्वांच्या कुळांत सुखलंपट स्त्रिया पुष्कळ असतील. पण

त्याकरितां पुत्रहत्या करणाऱ्या स्त्रीचं असं उदाहरण एक तरी मिळेल काय !

चित्र०:—नाहीं मिळणार. आतां मेनकेनं आपल्या नुकत्याच जन्मलेल्या मुलीला म्हणजे शकुंतलेला—

माल०:—अरण्यांत सोडून दिलं हें खरं. पण मूल नुसतं अरण्यांत सोडून देणं आणि प्रत्यक्ष पाण्यांत बुडविणं यांत फरक नाहीं का ? शिवाय, मेनकेनं तरी काय करावं? विश्वामित्र आपल्या पोटच्या गोळ्याला संभाळीचना! मग काय तिनं आपल्याच अपकीर्तीचा गोळा उराशीं धरून स्वर्गलोकाला जावं ? मेनकेनं शकुंतलेला अरण्यांत सोडून जातांना पशुपक्ष्यांना तिचा संभाळ करायला सांगितलं होतं. असं नाहीं असं, कुणीकडून तरी शकुंतलेचं रक्षण झालंच कीं नाहीं ?

चित्र०:—होय प्रिये. शंतनु कांहीं आपल्या मुलांना संभाळायला तयार नव्हता असं नाहीं. उलट गंगा पोटच्या मुलांना मारते असं पाहून त्याला मरणप्राय दुःखच होत होतं.

गाल०:—कौशिका, गंगाकांटचं हें वाळवंट पाहून मला तर तो स्वर्गाचा राजमार्गसाच वाटतो. या मार्गावर ज्याचं एकदां पाऊल पडलं तो थेट मोक्षपदाला जाऊन भिडला असंच खुशाल समजावं.

कौशि०:—होय महाराज, गंगेनं मोक्षपदाला धाडलेल्या मनुष्यप्राण्यांची संख्या तिच्या वाळवंटांतल्या रजःकणांहूनहि अधिक भरेल !

चित्र०:—प्रिये, झाल्या त्या गोष्टी होऊन गेल्या. त्या तारुण्यांतल्या म्हणून गंगेला कोणी कदाचित् नांव ठेवणार नाहीं. पण अजूनहि तिचा विलासी स्वभाव कांहीं जात नाहीं. या वाळवंटाचं शुभ्र पातळ तीन युगाइतकं वय झालेल्या या पोक्त गंगेला शोभतं, असं कोणी तरी म्हणेल काय ?

माल०:—आणि अशा गंगेचीं स्तोत्रं करून पृथ्वीवर लोक गातात असं मीं ऐकलं तेव्हां हंसायलाच आलं !

चित्र०:—आणि तिच्या प्रवाहांत डोळे मिटून हात जोडून पृथ्वीवरचीं हीं भोळीं माणसं जेव्हां प्रहरन् प्रहर उभीं राहतात, तेव्हां तर मला हंसूं आवरतच नाहीं.

[ इतक्यांत नारद विमानावर उतरतो.]



कृष्ण:—ही पहा मी प्रतिज्ञा करितों. [ पृ० ४७.

**नार०:—**कां चित्ररथा, मी एकदम तुझ्या विमानांत आलों म्हणून तुझा विरस तर नाहींना झाला ?

**चित्र०:—**छे: ! नारदा, आमच्या या निर्भर विलासाला तुमच्यासारखा एखादा रसिक साक्षीदार हवाच होता. पण नारदा, खरंच सांगा हां. आपण त्रिभुवनभर हिंडतां. मी आणि ही माझी प्रिया असा जोडा तुम्हांला इतर कुठं तरी आढळतो का ?

**माल०:—**इश्श, हें काय भलतंच असं विचारायचं तें ?

**चित्र०:—**अग नारद कुणी परके का आहेत ?

**माल०:—**पण ते परके नसले म्हणून त्यांच्यापुढं झालं तरी असं गर्वयुक्त भाषण करणं शोभतं कां ?

**चित्र:—**अग तूं वेडी आहेस. ज्याच्या तोंडून स्वतःविषयीं उघड धन्य-वाद निघत नाहीं, त्याचं सुख उत्कर्षाच्या उच्च पायरीला पोंचलं असं मी मानणारच नाहीं. गर्वोक्तीच्या निंदेचं भय अंतःकरणांत राहील तर तितकी जागा प्रेमाशिवाय मोकळी राहिली असंच नाहीं कां होत ?

**नार०:—**चित्ररथा, तुझंच म्हणणं बरोबर आहे. ज्या आत्म्याला आपल्या सुखदुःखांचा उच्चार मोकळ्या मनानं करवत नाहीं तो कपटी, अशुद्ध असाच म्हटला पाहिजे. आतां तुझ्या प्रश्नाचं उत्तर सांगतों. मी त्रिभुवन हिंडतों खरा; पण तुझ्या आणि तुझ्या या स्त्रीसारखा उमदा प्रेमळ जोडा मला कोठेंहि आढळत नाहीं. स्वर्गलोकांत पहावं तर विलास-बुद्धि पुष्कळ, पण खरं प्रेम कमी !

**चित्र०:—**आणि पृथ्वीवर ?

**नार०:—**पृथ्वीवर प्रेमळपणा पुष्कळ आहे; पण स्वर्ग मिळण्याच्या आशेनें त्यांनीं त्याचा सगळा उपयोग भलत्या मार्गानं चालविला आहे.

**चित्र०:—**तो कसा ?

**नार०:—**हें विमान जरासं खालीं उतरवून पहा म्हणजे तुला आपो-आप दिसेल. ( विमान थोडें खालीं उतरतें. ) चित्ररथा, बोल आतां तुला काय दिसतं ? विमानाच्या बरोबर खालीं पहा.

चित्र०:—मला एक पांढरा कापसाचा बोळा दिसतो–नव्हे एक ऋषि दिसतो आहे.

माल०:—आणि त्याच्याजवळ मलाहि दुसरा एक ऋषि दिसतो आहे.

नार०:—आतां सांगा पाहूं ते दोघे काय करताहेत तें ?

चित्र०:—प्रिये, मदिरेचा थोडासा अंमल माझ्यावर झाल्यामुळं ते ऋषि काय करताहेत हें मला बरोबर दिसत नाहीं. सांग बरं तूं.

माल०:—ते दोघेहि हाताची ओंजळ करून उभे आहेत.

चित्र०:—मला पाहून भिक्षा मागताहेत वाटतं ?

माल०:—तसं नव्हे नदीचं पाणी घेऊन नदींत सोडताहेत.

चित्र०:—तें कशाकरितां ?

नार०:—( हंसून ) स्वर्गप्राप्तीकरितां !

चित्र०:—नदीचं पाणी घेऊन तें नदींत ओतल्यानं नदीला आपलं पाणी परत मिळेल; पण त्यानं ह्यांना स्वर्ग कसा मिळावा बुवा ?

नार०:—मग मी तुला जें मघाशीं सांगितलं, कीं पृथ्वीवरची माणसं भाबडीं असतात, त्यांना कांहीं कळत नाहीं म्हणून तें काय तर ! हें असंच,

चित्र०:—अशा मूर्खांची थोडी थट्टाच केली पाहिजे, प्रिये, तुझ्या तांबुलानं रंगलेल्या तोंडांत या कनकपात्रांतलं थोडंसं मद्य घे आणि त्याची चूळ थुंक बरं या ऋषींच्या ओंजळींत, (हंसून) म्हणजे खूप मजा होईल !

नार०:—( स्वगत ) आतां बरोबर जुळलं, मी सुचविणार होतों तीच गोष्ट याला आपोआप सुचली. वाईट गोष्टी न सुचवितांच सुचतात !

माल०:—नको महाराज–असं नका करूं. हे ऋषि मोठे रागीट असतात. त्यांच्या वाटेला कशाला जा आपण ?

नार०:—मला हि असंच वाटतं. त्या भाविक थेरड्यांच्या अर्घ्याच्या पाण्यांत तांबूलरस आणि मद्य पडेल तर कधीं कुणी पाहिली नाहीं व ऐकली नाहीं अशी मौज होईल खरी. पण नको. मालती म्हणते तसंच मला हि वाटतं, मस्करीची कुस्करी व्हायची एखादी. काय सांगावा वेळेचा गुण !

चित्र०:–(हंसून) बस्स! तें कांहीं नाहीं ! प्रिये, घे भरून या मद्याची चूळ.

माल०:—महाराज, असं करूं नये.

नार०:—चित्ररथा, जाऊं दे कीं मालतीचं ऐकेनास कां? बरं पण मला आतां गेलंच पाहिजे. या ऋषींच्याप्रमाणं मलाहि ब्रह्मकर्म करायचं आहे. (स्वगत) इथं आतां अधिक वेळ राहून उपयोगी नाहीं. (उघड) मालती, मी जातों. चित्ररथाला भलतंसलतं कांहीं करूं देऊं नकोस. संभाळ. [जातो.]

चित्र०:—प्रिये, नारद गेला?

माल०:—होय महाराज!

चित्र०:—बरं झालं! आयती पीडा गेली! आपणां दोघांमध्यें तिसरा यायला कुणीं सांगितलं होतं या भटक्या उनाडटप्पू तंबोरीवाल्याला? आण ती मद्याची सुरई इकडं.

माल०:—(उठून) कौशिका, आतां अर्धोदयपर्वाचा मध्यकाळ आला खचित. अहाहा! काय हें सूर्योदयापूर्वीच्या आकाशाचं वैभव!

कौशि०:—आणि त्याला या शांत प्रभातसमयाची जोड. मग त्याचं वर्णन काय करावं?

चित्र०:—ही पाहिलीस सूर्यबिंबाची पहिली कला पृथ्वी आणि आकाश यांची मिठी सोडवून त्यांच्यामध्यें घुसते आहे ती? हा सूर्य म्हणजे आम्हां सर्व यक्षगंधर्वादि रात्रिचरांचा शत्रु. म्हणून पहिली मद्याची चूळ त्याच्यावर थुंक.

माल०:—रात्र संपून प्रातःकाळचा समय आला म्हणजे माझ्या मनाला हुरहुर लागते. आतां परत फिरायचं नाहीं का?

चित्र०:—प्रिये, अशा अखेरच्या वेळीं सांपडलेला मदिराक्रीडेचा एक क्षण सर्व रात्रीच्या क्रीडेइतका सुखकारक वाटतो मला. थुंक, ती चूळ सूर्यावर थुंक. त्या उगवत्या सूर्याची लाली अधिक, कीं माझ्या सुरईतल्या दिव्य मद्याची लाली अधिक हें पाहूं दे्च मला.

माल०:—नको गडे, असं करायला सांगूं नये मला.

चित्र०:—हें मद्य माझ्या मुखांतून मिळालेलं नाहीं म्हणून तुला चूळ थुंकावीशी वाटत नाहीं, होय ना? ठीक आहे तर हें घ्या मी प्रथम आपल्या तोंडांत घेऊन मग तुला देतों.

माल०:—इश्श! हें काय? मीं असं का म्हटलं होतं? आपला आग्रहच असेल तर ही पहा थुंकतें चूळ. (थुंकते.) आतां तरी झालं आपल्या मनासारखं?

चित्र०:—झालं. आतां ही दुसरी चूळ! तो पहा वेडा भावडा ऋषि या अपवित्र नदीचं पाणी ओंजळींत घेऊन, त्याचं अर्घ्यप्रदान या सूर्याला केलं म्हणजे मोक्ष मिळेल अशा बुद्धीनं थंडींत कांकडत बसला आहे. थुंक ही चूळ त्याच्या ओंजळींत थुंक! [मद्य ओतून देतो.]

गाल०:—कौशिका, अहाहा! या ओंजळभर पाण्यांत जणुं काय सर्व जगांतलं पुण्य-सर्वस्व सांठविलं आहे असं मला वाटतं. हें स्वच्छ आकाश पहा कसं या ओंजळभर पाण्यांत लहानससं रूप धारण करून प्रतिबिंबित झालं आहे.

कौशि०:—बरोबरच आहे. प्रत्यक्ष गंगानदींत स्नान केल्यानं, जी शुचिर्भूतता कधींहि येणार नाहीं, ती आपल्या हस्तस्पर्शानं पुनीत झालेल्या या पाण्यांना मिळणार. मग आकाशच काय, पण सर्व ग्रहनक्षत्र देखील या ओंजळीच्या पाण्यांत स्नान करण्याची इच्छा धरितील यांत काय संशय?

गाल०:—सूर्यनारायणा, या शांत व पुण्यकारक अशा प्रातःकालीं अर्धोदयपर्वप्रसंगीं गंगोदकाचें अर्घ्य तुझ्या नांवाचा मंत्रोच्चार करून सोडतों तें ग्रहण कर. आणि तुझ्या उज्वळ किरणांचा प्रकाश ज्या ज्या स्थळीं पोंचतों, त्या त्या स्थळीं मूर्तिमंत पुण्यांशाचे रजःकण पसरून सर्व विश्व सात्विक तेजोमय आणि आनंदमय असं होऊं दे.

[डोळे मिटून स्तब्ध राहतो.]

चित्र०:—प्रिये थुंक, त्या ऋषीच्या हातांत मद्याची चूळ थुंक, म्हणजे आम्हीं स्वर्गीय गंधर्व नित्य जें मदिरामृत प्राशन करितों, त्याच्या सुगंधाची थोडीशी तरी कल्पना घाणेरड्या राखेंत लोळणाऱ्या या दाढीवाल्यांना येईल.

माल०:—नको महाराज, असला अत्याचार करूं नये म्हणतेंना! आपल्याला त्यांच्याशीं काय करायचं आहे? द्या तो प्याला इकडं, मीं तें पितें, आणि आपणालाहि थोडंसं ओतून देतें. आपणाला लवकर परत फिरायचं आहेना?



चित्ररथः—थुंक, ही चूळ त्याच्या ओंजळींत थुंक ! [ पृ० ३४.

चित्र०:—काय तूं नाहीं कबूल होत थूळ थुंकायला ? ठीक आहे. मीच थुंकतों तर.

[ मदिरेचा घोट घेऊन गालवाच्या ओंजळींत थूळ थुंकतो. ]

गाल०:—( डोळे उघडून ) कौशिका, अर्घ्यप्रदानाचं अभिमंत्रण करण्याला मीं नेत्र झांकले त्यापूर्वी ओंजळींतलं पाणी शुभ्र होतं, आणि आतां पहातों तों तें तांबुस कां बरं दिसतं.

कौशि०:— ठीकच आहे महाराज. प्रतिक्षणीं या बालरवीचं तांबुस तेज गगनाला अधिकाधिक रंगवीत आहे. त्याच्या प्रतिबिंबानं अर्घ्योदकाला लाली आली असेल.

गाल०:—अहाहा ! एकजीव झालेल्या आकाश आणि पृथ्वी यांच्या प्रेमाचा रक्तिमा पसरलेला पाहून या अर्घोदयपर्वाच्या उत्सवसमारंभांत अष्टदिक्पाळ गुलाल उधळीत आहेत असंच वाटतं. ( अर्घ्य नाकाशीं नेतो. ) पण कायरे कौशिका, या लाल रंगाबरोबर या अर्घ्यजळालावास कसा येऊं लागला ?

चित्र०:— ( हंसून ) प्रिये, पहा पहा तो भोळा ब्राह्मण तें अर्घ्योदक नाकाशीं नेऊन त्याचा कसा हुंगून हुंगून वास घेत आहे तो ! खचित माझ्या मदिरेच्या सुगंधानं हा मोहित झाल्यासारखा दिसतो. तरी माझ्या तोंडांतला तांबूल ओंजळींत पडलेला त्याला दिसला नसावा. नाहीं तर आपल्या नाकाबरोबर जिभेचीहि लालसा त्यानं पूर्ण केली असती !

कौशि०:—महाराज, आपणाला कसली शंका आली असली तर तो अर्घ्य विसर्जन करावा.

गाल०:—रंगामुळं मला कांहीं वाटलं नाहीं. पण सुगंधामुळं शंका आली ! असो. ठीक आहे. फिरून एक वेळ अघमर्षण करावं झालं !

[ फिरून ओंजळींत पाणी घेऊन ध्यानस्थ बसतो.]

चित्र०:—प्रिये, वाहवा ! शेवटीं गंगेला माझ्या मुखरसाचं अर्घ्यप्रदान मिळालं तर ! हा पहा तो थेरडा फिरून ओंजळ भरून बसला आहे. आता मात्र तूं थूळ थुंकली पाहिजेस ! चल घे मदिरेचा घोट. ( ती नको म्हणते. ) हें पहा, जर तूं हा घोट घेतला नाहींस तर कनकपात्रांतला घोट तुल

आवडत नाहीं, प्रत्यक्ष माझ्या मुखांतलाच पाहिजे असा तुझा हट्ट समजून तो मी पुरा करीन. आहे कबूल ? काय नाहीं घोट घेत ?

[ आपल्या तोंडांतलं मद्य तिच्या तोंडांत घालण्याचा प्रयत्न करितो. ]

मालः—हें काय बरं महाराज, या ऋषींची अशी मस्करी करणं बरं नाहीं. त्याचे परिणाम एखादे वेळीं फार वाईट होतात.

चित्र०:—बस्स झाला तुझा वेदान्त आणि उपदेश. कोणी ऋषि कितीहि तामसी असला म्हणून काय झालं ? आम्हां गंधर्वांना त्यांचा शाप बाधण्याची मुळींच भीति नाहीं. आम्हीं स्वर्गांत नित्य देवांसंनिध राहणारे ! त्यांच्याबरोबर अमृत पिणारे ! देवांना ललित-सुखानंद देण्याचं सर्वस्वीं आमच्या हातांत आहे. असं असतां पृथ्वीवरच्या या भिकारड्या दाढी-वाल्यांना मी भ्यालों म्हणजे शर्थच झाली आम्हां गंधर्वांच्या वैभवाची ! बस्स, तें कांहीं नाहीं. हा घोट पी, तुझ्या तोंडांतला तांबूलहि थोडासा त्यांत घे, आणि त्याची चूळ त्या ऋषीच्या टाक हातांत नाहींतर हें पहा माझ्या मुखांतलं मद्य तुझ्या मुखांत घालतों—

माल०:—नको नको महाराज, सूर्योदय झाला ना ! जवळच्या विमा-नांतनं कोणी आपणाकडं पाहील एखादा. आणावा इकडं पेला तो. मी करतें आपल्या म्हणण्यासारखं एक वेळ. पण लगेच विमान फिरवावं स्वर्गाकडं ! मला बाई भीति वाटते,

[ चूळ घेऊन थुंकते. ]

गाल०:—( डोळे उघडून पाहतो. ) कौशिका, आकाशांतला रक्तिमा मघाच निवळला. असं असून फिरून या अर्घ्योदकाला लाली कुठून आली ? ( ओंजळ नाकाशीं नेतो. ) फिरून सुगंध ! हा काय चमत्कार ?

कौशि०:—( वर पाहून ) महाराज, वर कोणी तरी विमानांत बसून संचार करीत आहे. त्याच्या हातांतून गुलाल किंवा पुष्पगंधाचा द्रव चुकून खालीं पडला असेल !

गाल०:—खरंच या अर्धोदयपर्वानिमित्त पृथ्वीवर आपण जसे पुण्यो-पचार करितों तसेच आकाशांतहि कोणी यक्षगंधर्व करीत असतील.

कौशि०:—तसं नव्हे महाराज, या विमानांत कोणी गंधर्व किंवा यक्ष

आपल्या स्त्रीसमवेत क्रीडा करीत असावा अशी शंका मला येते. पूजोपचारापेक्षां विलासाचे उपचारच त्यांचे चाललेले दिसतात !

गाल:०—अरेरे ! तर मग हें अर्घ्यप्रदान भ्रष्ट झालं ! असो. या पवित्र वेळीं कोपवश होतां कामा नये; फिरून अघमर्षणपूर्वक अर्घ्यप्रदान करावं. [ पाणी घेऊन डोळे मिटतो. ]

कौशि:०—महाराज, आपण अघमर्षण करा. तोंवर वरून काय आणि कसं पडतं हें मीं नीट पहातों.

चित्र:०—मौज आहे आणि काय ? माझं आणि तुझं उच्छिष्ट गंगेला फार आवडतं असंच दिसतं. एरवीं हा वेडा ब्राह्मण त्या उच्छिष्टानं भरलेले अर्घ्यांवर अर्घ्य गंगेंत सोडताना ! फिरून एक वेळ. हं ! काय तूं नाहीं चूळ टाकीत ? तुझ्याशीं हुजत घालायला कुणाला इतका वेळ आहे ? आण तो मदिरेचा पेला इकडं. उष्टं मद्य चाखण्याची गंगेची आवड मला पुरविलीच पाहिजे. किती झालं तरी ती आमच्या देवलोकचीच आहे. एवढा उपकार तिच्यावर मला केलाच पाहिजे ! [ चूळ घेऊन थुंकतो. ]

गाल०:—( डोळे उघडून ) काय फिरून अर्घ्योदक दूषित झालं ?

कौशि०:—( ओरडून ) महाराज ! महाराज ! तें वर पहा. आतां सर्व लक्षांत आलं !—अरेररे—

गाल०:—( नाकाजवळ अर्घ्य नेऊन ) ऊंः ! कौशिका, हा सुगंधसा प्रथम वाटला खरा, पण खरा सुगंध नव्हे. याला कसलीशी सूक्ष्म घाण येते आहे.

कौशि०:—( हातावर हात मारून ) काय सांगूं महाराज ! भ्रष्टाकार ! सर्व भ्रष्टाकार ! या उन्मत्त गंधर्वानं पेल्यांतून घोट घेऊन चूळ टाकलेली मीं स्पष्ट पाहिली. त्यांत काडीची शंका नाहीं.

गाल०:—तर मग खचित हा गंध मद्याचा असला पाहिजे.

कौशि०:—( गालवाच्या ओंजळींत पाहून ) शिवाय आपल्या ओंजळींत त्या नीचानं टाकलेला विड्याचा चोथाहि थोडासा दिसतो आहे !

[ वर विमानांत चित्ररथ मोठमोठ्यानें हंसतो. ]

कौशि०:—महाराज, पहा पहा हा बाष्कळ हास्यविनोद ! आमचं अर्घ्यप्रदान भ्रष्ट करून वरती आमचा उपहास करतो आहे.

चित्र०:—( मोठ्यानं ओरडून बोलत असतां मालती मधून मधून त्याला बोलूं नका म्हणून खुणा करते, व शेवटीं तोंडावर हातहि ठेवण्याचा प्रयत्न करिते. ) ठीक झालं. अरे मानवाच्या काड्यांनों, या जारिणी गंगेच्या पात्रांत स्नान केल्यानं आपण मोठं पुण्य जोडतों असं तुम्हांला वाटतं नाहीं का ? मूर्ख रे मूर्ख ! तुमच्यासारखे मूर्ख तुम्हीच ! असो; हा गंधर्वराज चित्ररथ आणि त्याची ही प्रियोत्तमा मालती यांच्या तोंडांतलं उष्टं मद्य आणि उष्टा तांबूल यांचा आस्वाद तरी एक वेळ घ्या, म्हणजे स्वर्गलोकचं खरं सुख काय असतं याची थोडीशी तरी कल्पना तुम्हांला येईल. आजचा आमच्या मद्यतांबूलाचा प्रसाद तुम्ही गंगेला वाहून टाकला. तो तुम्हां स्वतःला चाखण्याची इच्छा असली तर फिरून आजच्यासारखेच उद्यां पहाटे या गंगेवर या, म्हणजे तुमची मनकामना पूर्ण करीन ! प्रिये चल. विमानराज, चला. स्वर्गद्वार बंद होण्यापूर्वींच जातां आलं तर जाऊं या. नाहीं तर इंद्रमहाराजांच्या सेवेंत अंतर पडायचं !

[ विमान नाहींसें होतें. ]

गाल०:—ऐकलंस कौशिका, ऐकलंस हा गंधर्वाधम काय म्हणाला तें ?

कौशि०:—ऐकलं महाराज, आतां शंकाच राहिली नाहीं.

गाल०:—ब्राह्मणांच्या छळाचा कळस झाला !

कौशि०:—गंधर्वांच्या उन्मत्तपणाला आतां सीमाच उरली नाहीं.

गाल०:—अरेरे ! काय करूं ? ( आकाशाकडे पाहून ) चांडाळा, कामांधा, चित्ररथा उभा रहा, आणि आपल्या अत्याचाराचं उग्र प्रायश्चित्त घे. उभा रहा. असा भ्याडासारखा पळून कां जातोस ? ब्राह्मणांचा छळ करण्याची तुझी इच्छा मनापासून असेल, गंधर्वांच्या दिव्य शक्तीचा खरा अभिमान तूं बाळगीत असशील, इंद्रादि विषयलंपट देवतांच्या साह्याची जर तुला पुरी खात्री असेल तर उभा रहा, आणि मी हा शाप देतों तो ऐक.

[ शाप देण्याकरितां हातांत उदक घेतो- ]

कौशि०:—महाराज, तो गंधर्वाधम दिसेनासा झाला !

[ नारद घाईघाईनें प्रवेश करितो. ]

नार०:—आणि तो समोर उभा असता तरी काय झालं ? छेः छेः ! गालवमुनि शाप देऊन तामस गुणांचा अंगीकार करणार का काय ? अशी गोष्ट कधींहि होणार नाहीं. निदान होऊं तरी नये !

गाल०:—कोण तो नारदमुनि ? नारदा अगदीं वेळेवर आलास !

नार०:—तो कसा काय मुनिवर्य !

गाल०:—हे गंधर्व म्हणजे तुमच्या देवलोकचे पुंड. इंद्रादि देवतांची हीं आवडतीं प्रेमपात्रं. मीं इंद्राला सहस्त्र वेळां सांगून पाठविलं असेल कीं, देवेंद्रा, या गंधर्वांना तूं नीट धाकांत ठेव. त्यांच्यापासून आम्हां गरीब बिचाऱ्या मानवांना विनाकारण त्रास होतो म्हणून. पण आम्हां गरीब ब्राह्मणांचं कोण ऐकणार ? पण आजवर नुसत्या माझ्या कानावर यांच्या कागाळ्या येत होत्या, तो आज प्रत्यक्ष मला स्वतःलाच अनुभव आला. तेव्हां आतां नारदा, तुझ्या समक्षच या गंधर्वराजाला शाप देऊन भस्म करून तुझ्या पायांशीं पाडतों. पहा तरी माझं सामर्थ्य.

नार०:—गालवमुनींच्या सामर्थ्याविषयीं या त्रिभुवनांत कुणालाहि सांगावं लागत नाहीं; पण मुनिवर्य, काय प्रकार झाला तो सांगाल तरी !

कौशि०:—नारदमुने ! झाला तो प्रकार तोंडानं सांगायलाहि जीभ येत नाहीं.

नार०:—तुम्हांला तोंडानं सांगवतहि नाहीं असला प्रकार गंधर्वाधिप चित्ररथ यानं प्रत्यक्ष कृतीनं केला ? धन्य आहे त्याच्या धाष्टर्याची !

कौशि०:—होय नारदमुने ! अशा प्रकारचा उपमर्द आजवर ब्रह्मद्वेष्ट्या राक्षसांनींहि आमचा कधीं केला नाहीं. पण आतां पहावं तों खुद्द देवेंद्राच्या अनुचरगणांनीं तो उपमर्द करावा आणि आम्हीं पहावा अशी वेळ आली आहे.

नार०:—पण असं झालं तरी काय तें ऐकूं दे.

गाल०:—नारदा, सांगूं तरी काय ? आज अर्धोदयपर्वाच्या निमित्तानं मी अर्घ्यप्रदान करीत असतां थेट माझ्या डोक्यावर विमान आणून चित्ररथ आणि त्याची स्त्री यांनीं उष्टं मद्य आणि तांबूल माझ्या ओंजळीत एक वेळ नाहीं तीन वेळ टाकला—अरेरे ! काय करूं ?

नार०:—पण मद्याच्या धुंदींत तसा प्रकार कदाचित् त्यांच्या हातून झाला असेल !

गाल०:—नाहीं. नारदा, हा प्रकार सर्वस्वीं जाणूनबुजूनच झाला. आणि तो तसा झाल्याचं मला कळावं म्हणून विमान अदृश्य होण्यापूर्वी मला उद्देशून चित्ररथानं गर्जून भाषणहि केलं !

नार०:—अरेरे ! अर्घ्यप्रदानाच्या पाण्यांत उष्टा तांबूल आणि उष्टं मद्य !

[ अंगावर शहारा आला असें दाखवितो. ]

गाल०:—म्हणून म्हणतों नारदा पहा माझ्या शापाचा प्रभाव.

नार०:—काय आपण त्याला शाप देणार ? असली कल्पना तरी आपल्या मनांत कशी आली ?

कौशि०:—कां बरं ?

नार०:—असल्या क्षुल्लक कामावर जर तुमच्यासारख्या तपोधनांची पुण्याई खर्च होऊं लागली, तर मग जगाच्या उद्धाराची वाट काय ?

गाल०:—आधीं दुष्टांचं निर्दलन झालं पाहिजे; मग सुष्टांचं परिपालन व उद्धार होवो वा न होवो !

नार०:—पण दुष्टांचं निर्दलन परस्पर होण्यासारखं असतांना तुम्ही तें कां करणार ?

गाल०:—तर दुसरं कोण करणार ?

नार०:—तें काम क्षत्रियांचं आहे. आज कांहीं पृथ्वी निर्वीर झाली नाहीं, कीं क्षत्रियांचं काम ब्रह्मनिष्ठांनीं आपल्या हातीं घ्यावं !

गाल०:—क्षत्रियांनींच तें काम करावं खरं. पण चित्ररथासारखे दुरात्मे अद्यापि जिवंत आहेत, यावरून क्षत्रिय आपलं काम नीट बजावतात असं म्हणतां येईल का ?

नार०:—क्षत्रिय लोक आत्मस्फूर्तीनं आपलं काम न करतील तर त्यांना तें करायला आपण भाग पाडलं पाहिजे ! मला तर असं वाटतं, दुर्वृत्त अशा नराधमांना दंड करण्यांकरितां ब्रह्मनिष्ठांनीं आपलं तप खर्ची घालण्यापेक्षां, कर्तव्यपराङ्मुख क्षत्रियांनाच दंड करण्याकडं तें खर्ची घालावं ! क्षत्रियाला शिक्षा केल्यापासून समाजव्यवस्थेचं तरी थोडंबहुत कार्य साधेल !

गाल०:—(त्रासून) नारदा मग मी काय करूं म्हणतोस तें तरी सांग !

नार०:—मुनिवर्य, मी सांगतों तें ऐका. यादवकुलावतंस क्षत्रियवीर श्रीकृष्ण हा स्वतः गंगातीरावर क्रीडा करण्याकरितां आला आहे. त्याच्याकडं तुम्ही जा. वाटेल तर मीहि येतों तुमच्याबरोबर, आणि त्याच्या कानावर ही सर्व कागाळी घालून आपण गंधर्वराज चित्ररथाचं पारिपत्य करूं. अहो एकट्या चित्ररथाची कथा काय ? पण सगळ्या गंधर्वमंडळीला दहशत बसली पाहिजे. गंधर्वांची खोड मोडायची म्हणजे त्यांत येणार खुद्द देवेंद्राचा संबंध. म्हणून म्हणतों, श्रीकृष्णासारख्यानं तें काम हातीं घेतलेलं बरं !

कौशि०:—गुरुमहाराज, नारदमुनींची ही योजना मला बरी दिसते.

गाल०:—ठीक आहे. तुझ्या म्हणण्याप्रमाणंच कां होईना ! नारदा, चल आत्तां या क्षणीं आपण श्रीकृष्णाकडं जाऊं—

नार०:—आणि त्याच्यापुढं चित्ररथाच्या शासनाची गोष्ट काढूं.

गाल०:—नुसती गोष्ट काढून माझं समाधान होईल असं का तुला वाटतं ? फार काय, पण चित्ररथाला शिक्षा झाल्यावांचून मी यापुढं अन्न म्हणून ग्रहण करणार नाहीं ! हीच माझी प्रतिज्ञा !

नार०:—आपण प्रतिज्ञा तर बिकट केली. तेव्हां श्रीकृष्णाला निक्षूनच सांगितलं पाहिजे. त्याच्याकडूनहि एखादी प्रतिज्ञाच करविली पाहिजे, तरच निभाव लागायचा. चला तर, चला माझ्यामागून. मी दाखवितों श्रीकृष्णाचं शिबिर. [ जातात. ]

---

## प्रवेश चवथा

स्थळ—गंगाकाठचें श्रीकृष्णाचें शिबिर.

[ पडद्यांत गोंगाट होतो; सात्यकी व द्वारपाल बोलत येतात. ]

सात्य०:—( पुढें येऊन ) कायरे ? दारावर कोण आहे ? आणि हा गोंगाट कसला ?

द्वार०:—( प्रवेश करून ) बाहेर कोणी दोघे ऋषि आणि ऋषिकुमार

आले आहेत. ते म्हणतात, थोरल्या महाराजांची आत्तांच्या आत्तां गांठ घ्यायची आहे.

सात्य०:—महाराजांची स्वारी नुकतीच शयनगृहाकडं विश्रांति घ्यायला गेली आहे असं तूं त्यांना सांगावंस कीं नाहीं ? ऋषि झाले म्हणून काय झालं ? महाराजांना थोडीशी विश्रांतीहि घेऊं देणार नाहींत कीं काय ?

द्वार०:—मीं तें सर्व बोलून चुकलों. समजून सांगायची म्हणून कांहीं बाकी ठेवली नाहीं. आणि हे ऋषि नसून दुसरे तिसरे कोणी असते तर, त्यांना मीं त्याच क्षणीं धक्के मारून घालविलेंहि असतें.

सात्य०:—( घाईनें ) छेः छेः ! ऋषींना धक्केबिक्के मारायचे नाहींत हो ! किती केलं तरी तीं महाराजांचीं पूज्य दैवतं आहेत.

द्वार०:—छेः छेः ! महाराज, माझ्या हातून असा अत्याचार कधींहि होणार नाहीं. पण त्यांची समजूत पटेना तेव्हां मला किती राग आला होता तें नुसतं महाराजांना सांगितलं.

[ पडद्यांत फिरून गोंगाट होतो. ]

सात्य०:—पण हे ऋषि म्हणतात तरी काय ?

द्वार०:—ते म्हणतात, थोरल्या महाराजांची आत्तांच्या आत्तां गांठ पडली पाहिजे, आणि न पडेल तर जागच्या जागीं डोकं आपटून प्राण देऊं !

सात्य०:—खरं कीं काय ? तर मग ते फारच उतावीळ झालेले दिसतात ! त्यांना थांबवून धरण्याची सोयच राहिली नाहीं. जा जा तर, त्यांना आंत घेऊन ये. ( द्वारपाळ जातो. ) या ऋषींनीं इतका आततायीपणा करण्याएवढं संकट त्यांच्यावर काय आलं असेल बरं ? आमच्या वनविहाराला आणि शिकारीला तर अजून पुरता प्रारंभहि नाहीं ! आमच्यामुळं ऋषींना त्रास झाला असं श्रीकृष्ण आणि पार्थराज यांना समजलं तर त्यांना किती तरी वाईट वाटेल !

[ द्वारपाळ, गालव कौशिक व ऋषिकुमार यांना घेऊन येतो. सात्यकी त्यांना वंदन करितो. ]

गाल०:—यादववीरा, तुझं कल्याण असो. पण श्रीकृष्ण कुठं आहे ? मला त्याची गांठ घ्यायची आहे.

सात्य०:—होय महाराज. मी त्याच योजनेंत आहें. आपण आसनावर क्षणभर विश्रांति घ्याल तर—

गाल०:—काय विश्रांति ? आतां कसची विश्रांति ? विश्रांति घेण्याइतकी तुझ्या किंवा श्रीकृष्णाच्या मनाला स्वस्थता असेल ! पण अपमान दुःखाच्या आगींत होरपळत राहणाऱ्या माझ्या या मनाला आतां कसची स्वस्थता मिळणार ?

सात्य०:—( सहानुभूतीपूर्णपणानें ) काय महाराज ? आपला असा कुणी दुरात्म्यानं अपराध केला ? आणि आपल्यासारख्यांचा जर असा अपमान होईल, तर आम्हीं क्षत्रिय या भूमंडळावर असून काय करायचे ?

गाल०:—बरोबर ! मी झालं तरी तोच प्रश्न विचारणार आहे ! पण तो तुला नाहीं. यादवश्रेष्ठ श्रीकृष्णाला ! बोल, श्रीकृष्णाची स्वारी कुठं आहे ? तुझ्याशीं बोलत बसायला मला वेळ नाहीं.

सात्य०:—यादवाधिपतींची स्वारी आत्तां इतक्यांतच शयनगृहाकडं—

गाल०:—( रागानं ) काय ? आम्हां तापसी लोकांचा असा छळ होत असतां श्रीकृष्णाला भरल्या दोन प्रहरीं निद्रा लागते ?—तें कांहीं नाहीं. यादववीरा, अत्तांच्या आत्तां मला श्रीकृष्णाचं दर्शन झालंच पाहिजे. एक पळाचाहि विलंब लागतां कामा नये. आणि तसं होत नसेल तर स्पष्ट सांग म्हणजे—

सात्य०:—गांठ पडणार नाहींच असं मीं नाहीं म्हटलं महाराज ! पण महाराज नुकतेच विश्रांतीसाठीं शयनगृहाकडे गेले आहेत. त्यांचा किंचित् डोळा लागला असेल.

गाल०:—फिरून तेंच ! श्रीकृष्णाची निद्राबिद्रा मी कांहींएक जाणत नाहीं. श्रीकृष्णानं या क्षणीं उठून माझी गांठ घेतलीच पाहिजे. माझ्या अपमानाकडं डोळेझांकच करायची असेल तर त्यानं आधीं टोळे उघडून मला स्वमुखानं तसं स्पष्ट सांगितलं पाहिजे, म्हणजे मग माझा मार्ग मला मोकळा आहे !

सात्य०:—पण मी तरी कुठं नाहीं म्हणतों आहे ? महाराजांना नुसती

हांक मारून आपण आल्याचं कळवीपर्यंत क्षणभर बसून–( पडद्याकडे पाहून ) पण हे पहा स्वतः महाराजच इकडं येत आहेत. कामच झालं.

[ कृष्ण प्रवेश करतो. ]

गाल०:—श्रीकृष्णा—

[ कृष्णाच्या खुणेवरून सात्यकी व द्वारपाळ जातात. ]

कृष्णः—( वंदन करून ) ऋषिवर्यांची काय आज्ञा आहे ? या वेळीं अभावितपणं मुनिवर्यांची स्वारी इकडं कशी आली ?

गाल०:—श्रीकृष्णा, तुझी निद्रा मीं मोडली खरी. पण तुला निद्रा घेववते तरी कशी ?

कृष्णः—दासाची सर्वस्वीं चूक आहे. पण आसनावर बसून मजकडून सेवेंत कोणत्या रीतीनें अंतर पडलं हें सांगण्याचा महाराज अनुग्रह करतील तर मीं कृतार्थ होईन !

गाल०:—श्रीकृष्णा, तुझं बोलणं मोठं मोहक आहे. पण क्षत्रियाला अशा मोहक भाषणापेक्षां दुर्जनांच पारिपत्य करण्याला लागणारा कठोरपणांच अधिक शोभतो.

कृष्णः—मीं मुनिवर्यांशीं शिष्यवर्गाला उचित असा नम्रभाव धरला तो सर्वस्वीं प्रांजलपणाचाच आहे. त्यांत खोटा भाव यत्किंचितहि नाहीं. दुर्जनांचं पारिपत्य करण्याचं एखादं कठोर काम असेल तर आपल्या कृपाप्रसादानं तेंहि पार पडेल; कां नाहीं पडणार ?

गाल०:—कृष्णा, आम्हां गरीब आश्रमवासी तापसांना तूं गुरुपणाचा मान देतोस खरा; पण आमच्या तपश्चर्या कशा चालल्या आहेत याचा वृत्तान्त तुझ्या कानावर कधीं येतो असं मला वाटत नाहीं. हेंच का तुम्हां क्षत्रियांचं ब्रीद !

कृष्णः—मी सर्वस्वीं अपराधी आहे. काय अधिकउणा वृत्तान्त असेल तो निवेदन करावा महाराज!

गाल०:—श्रीकृष्णा, आम्हां गंगातीरनिवासी तापसांची तपश्चर्या संपली ! आमचा त्राता कोणी राहिला नाहीं !—

कृष्णः—( उत्सुकतेनें ) पण असं झालं तरी काय ?

गाल०:—इंद्रलोकचे गंधर्व उन्मत्त झाले. त्यांनीं लाज सोडली. पवित्र गंगानदीवर ते विमानांत बसून खुशाल क्रीडा करितात–आणि आम्हां तापसांचा उपमर्द—

कृष्णः—(घाईनें) खरंच कीं काय ? कोणता गंधर्व इतका माजला ?

गाल०:—अरे, कोणता म्हणून काय विचारतोस ? सर्वंच गंधर्वांनीं ताळ सोडलेला दिसतो. आजच सकाळीं या माझ्या शिष्यांना यक्षद्वीपावर गांठून एकानं त्यांच्याकडून गंगापूजनाच्या साहित्यानं आपल्या स्त्रीचीच पूजा करविली !

१ ऋ० कु०:—माझ्याजवळचं अर्घ्यपाद्य व चंदन या हातांनीं कीं हो त्या कुलटेच्या पायांवर मला वहावं लागलं !

२ ऋ०कु०:—आणि माझ्याजवळच्या पुष्पमाळा गंगेला वाहायच्या तिला वाहायला लावल्या.

गाल०:—(त्वेषानें) ऐक, कृष्णा, इंद्राच्या आश्रयानं माजलेल्या गंधर्वाधमांच्या या लीला नीट ऐक ! पण एवढ्यानंच झालं नाहीं. आजच प्रात:काळीं अर्धोदयपर्वानिमित्त मी श्रीसूर्याला गंगोदकाचें अर्घ्यप्रदान करीत होतों; वर विमानांत चित्ररथ स्त्रीसह क्रीडा करीत होता. त्यानं माझ्या ओंजळींत तांबूल चघळणाऱ्या तोंडांतून उष्टया मद्याची थूळ, कृष्णा ! एक वेळ नाहीं तर तीन वेळां थुंकली ! बोल आतां कृष्णा ! तापसांची तपश्चर्या निर्विघ्नपणें पार पाडण्याची तुझ्यासारख्या क्षत्रिय अधिराजांची कामगिरी कशी काय चालली आहे ती ?

कृष्ण:—(रागानें) काय ? गंधर्वांच्या उन्मत्तपणाची मजल इथवर गेली अं ! मुनिवर्य, आपण शांत व्हा आणि स्वस्थ रहा ! मी इंद्राकडून गंधर्वांचा चांगला बंदोबस्त करवितों. आपण निश्चिंत व्हा !

गाल०:—(रागानें) काय श्रीकृष्णा, यादववीरेश्वरा ! हे तुझ्याच तोंडचे शब्द काय ? धिक्कार असो तुला ! असल्या घोर अपराधाची कागाळी प्रत्यक्ष तुझ्यापाशीं येऊन केली असतां, तूं मला इंद्राकडून गंधर्वांचं पारिपत्य करविण्याचा परस्पर हवाला देतोस काय ? पहा पहा, हाच देवेंद्राचा पक्षपात ! हीच अपराधी गंधर्वांविषयीं तुझी अनास्था ! ठीकच आहे ! देवेंद्राचं

आणि त्याच्या सभेचं नृत्यगायन करणाऱ्या नटनर्तकांचं ममत्व तुला कां न वाटावं ? इंद्राकडून गंधर्वांचं पारिपत्य करायचं तर तूं मला कशाला हवास ? काय ? आम्ही तापसी लोक इतके निस्तेज झालों असं तुला वाटलं ? आम्हांला आत्मरक्षण करतां येणार नाहीं असा तुझा ग्रह झाला ? ठीक आहे, हा पहा मी चाललों—

कृष्णः—(पुढें होऊन) नाहीं नाहीं ! मुनिवर्यांनीं असं रागावून जाऊं नये. ( पायां पडून ) इंद्राचं नांव मीं घेतलं तें कांहीं त्याचा हवाला द्यावा म्हणून नव्हे. तर त्याच्या प्रजेचं पारिपत्य त्याच्याकडूनच झालं, म्हणजे गंधर्वांबरोबर इंद्रालाहि आठवण राहील म्हणून !

गाल०ः—इंद्राला नुसती आठवण काय म्हणून ? त्याचंहि पारिपत्यच झालं पाहिजे. गंधर्व मस्ती करितात ते झाले तरी इंद्राच्या जिवावरच कीं नाहीं ? प्रजेचा अपराध तोच राजाचा अपराध ! कृष्णा, पारिजात-वृक्षाच्या वेळीं इंद्राशीं युद्ध करायला तूं तयार झालास ! आणि आतां मात्र त्याला मोठा मान देऊन त्याचा अधिकार संभाळून त्याच्या प्रजेला शासन करण्याची बुद्धि तुला होत आहे ! परदुःख शीतळ खरंच ! पण ठीकच आहे. त्या वेळीं तुझ्या आवडत्या पत्नीचा हट्ट पुरवायचा होता म्हणून तूं इंद्राचा मान ठेवला नाहींस. मी यःकश्चित नीरस भिकारडा तापसी; माझी तुला काय किंमत ? पारिजातवृक्ष आपल्या मंदिरांत लाव-लेला पाहून सत्यभामेच्या मुखावर खुलणाऱ्या एका हास्यानं तुझा सर्व श्रमपरिहार झाला असेल. मी वेदाभ्यासजड तापसी, तुझ्या रसिक मनाला आल्हाद देणारं माझ्या तपश्चर्येच्या रुक्ष खटपटींत काय असणार ?

कृष्णः—महाराज, कोप आवरा ! चित्ररथाचं पारिपत्य करण्याचं काम मी इंद्रावर सोंपवीत नाहीं.

गाल०ः—इंद्रावर न सोंपविलंस तर आपल्या पदरच्या छप्पन्नशें यादव-वीरांपैकीं एखाद्याच्या अंगावर सोंपविशील ! तें कांहीं नाहीं. मीं तरी परावलंबी कां रहावं ! [ जाऊं लागतो. ]

कृष्णः—नाहीं, महाराज ! तें काम मी स्वतः आपल्या अंगावर घेतों.

गाल०ः—पण पारिपत्य कशा प्रकारचं करणार तें सांग ! नाहीं तर



कृष्ण :—ही पहा मी प्रतिज्ञा करितों. [ पृ० ४७.

तूं शब्दांतून निसटून जाशील ! मला शब्दच्छल करण्याचा मनापासून कंटाळा आहे !

कृष्ण:—पारिपत्य आपण काय सांगाल तें करीन ! पण आपल्याकडून तरी कशाला वदवूं ! देहान्त प्रायश्चित्त हेंच सर्व प्रायश्चित्तांत श्रेष्ठ. आपल्या अपमानाच्या अपराधाकरितां चित्ररथाला देहान्त शासन करीन, मग तर झालंना ?

गाल०:—ठीक आहे. पण हें सर्व केव्हां घडून येणार ?

कृष्ण:—आपण द्याल त्या मोजक्या कालावधींत ! अवघ्या आठ प्रहरांत—

गाल०:—नको, कृष्णा, तुझं काम मी बिकट करूं इच्छित नाहीं. मी तुला आठ सोडून बारा प्रहरांची अवधि देतों. त्याच्या आंत गंधर्वाचं शासन कर म्हणजे झालं ! पण कृष्णा, करीन म्हणून प्रतिज्ञा कर म्हणजे मी निःशंक होईन !

कृष्ण:—ठीक आहे. ही पहा मी प्रतिज्ञा करतों. ( हात वर करून ) बारा प्रहरांच्या आंत चित्ररथगंधर्वाचा शिरच्छेद करीन तर मी नांवाचा- ( गालव व कौशिक संशयानं एकमेकांकडे पाहतात. ) नको महाराज, शंका नको. आपल्याला शब्दच्छलाची शंका येऊं नये म्हणून ही पहा माझ्या मातेची शपथ घेऊन प्रतिज्ञा कारितों. ( फिरून कौशिक गालवाच्या कानाला लागतो. ) ( रागानें ) फिरून आपल्याला शंका आली काय ? ठीक आहे. माझीं नांवं जशीं पुष्कळ तशा माझ्या माताहि दोन आहेत खऱ्या. तर मग माझी जन्मदात्री माता देवकी, व पालनकर्त्री माता यशोदा या दोघींचीहि शपथ वाहून मी प्रतिज्ञा करितों कीं, बारा प्रहरांच्या आंत मी गंधर्वाधम चित्ररथाचा शिरच्छेद करीन !

गाल०:—( समाधान पावून ) शाबास श्रीकृष्णा ! आतां मात्र माझं मन शांत झालं खरं ! चित्ररथाला शासन केल्याशिवाय मी अन्न भक्षण करणार नाहीं अशी माझीहि प्रतिज्ञा आहे. तो काल येईपर्यंत मी गंगातीरावरच गायत्री-पुरश्चरण करीत बसणार ! कौशिका चल ! कुमारांनों चला. [ कृष्ण त्यांना वंदन करतो, व ते जातात. ]

कृष्ण:—( स्वगत ) अरे अरे अरे या दुष्ट गंधर्वानं या ऋषीचा केवढा हा घोर अपराध केला ! पण देवेंद्राचं त्याला साहाय्य ! मग त्यानं तरी अविचार आणि अत्याचार कां करूं नये ? [ नारद प्रवेश करतो. ]

नार०:—कां श्रीकृष्णा ! मुख म्लान आणि चिंताग्रस्त कां दिसतं ? खरंच सांगू का ? तुझं आणि गालवाचं बोलणं काय झालं हें मी सर्व ऐकलं. पण तुला खरोखर निक्षून सांगतों—वाटेल तर प्रार्थना करितों—कीं ही प्रतिज्ञा तूं करूं नको.

कृष्ण:—कां बरं ?

नार०:—अरे, या तामसी हिरवट ऋषीच्या नादाला तूं काय लागलास ? असा प्रत्येक रागीट ऋषीच्या छंदानं तू जर ईर्षेला पेटूं लागलास तर तुझ्या संहाराच्या कामाला कधीं खळ पडायलाच नको ! कौरवपांडवांचं युद्ध नुकतं कुठं संपलं आहे ! तोंच दुसऱ्या एका निराळ्या युद्धाची तयारी ! तुझ्यासारख्याला विश्रांति केव्हां मिळणार ? केवळ विश्रांति मिळावी, प्रेमळ मित्रमंडळींच्या संगतींत व क्रीडासुखांत चार दिवस घालवावे म्हणून ना तूं इथं आलास ? आणि इंद्रासारख्या बलाढ्य शत्रूशीं युद्ध करण्याची तयारी ! या ऋषींना काळ वेळ कांहींएक कळत नाहीं.

कृष्ण:—( त्रासानें ) बस्स ! नारदा, हा बुद्धिभेद पुरा झाला ! मी इतका सरळ मनानं वागतों तरी माझ्याविषयीं कोणाचंहि मन निःशंक म्हणून होत नाहीं. मला आपली प्रतिज्ञा पुरी केलीच पाहिजे.

नार०:—कां ? गालवानं तुझ्यावर अविश्वास दाखविला कीं काय ? तूं केलेली प्रतिज्ञा रामावताराची कीं कृष्णावताराची असं तुला विचारून् कीं काय ?

कृष्ण:—तोंडानं प्रत्यक्ष जरी विचारलं नाहीं, तरी त्यांच्या चर्येवरनं तसं दिसलं खरं !

नार०:—( हंसून) काय लबाड तरी हे ऋषि ! बाकी गंधर्वांचं पारिपत्य झालं तर तें मला नको असं मात्र नाहीं हो ! मग काय तूं आपली प्रतिज्ञा पूर्ण करणार ?

कृष्ण:—यांत काय संशय ? नारदा, तूंच माझा साक्षीदार; तुझ्या

देखत फिरून तीच प्रतिज्ञा करितों. ती ऐकुन गालवमुनींना जाऊन कळीव.

नार०:—असो. दुःखांत सुख इतकेंच कीं, अर्जुन इथंच तुझ्या संनिध आहे. इंद्राशीं युद्धप्रसंग आला तर तितकी तुला मदतच होईल! मी येतों तर. [ नारद जातो, व कनकश्री प्रवेश करिते. ]

कन०:—महाराज, स्फटिकशिलांनीं बांधलेल्या सरोवराकडं पार्थराज आणि इतर मंडळी क्रीडेकरितां नुकतीच गेली आहेत. ते आपली वाट पहात आहेत!

कृष्णः—आलोंच मी. देवी, हो पुढं. (कनकश्री जाते.) आतां कसची क्रीडा आणि कसचें काय? ऋषिजनांचा हा असा अपमान आणि छळ आमच्या संनिध होत असतांना मला क्रीडा कशी गोड लागणार? पण नको. आपणाकरितां इतरांच्या सुखांत व्यत्यय आणणं बरं नाहीं. पार्थ, द्रौपदी, सत्यभामा यांच्यापैकीं कोणालाच ही गोष्ट कळवूं नये. त्यांचं सुख तेंच माझं सुख नव्हे काय? [ जातो. ]

———

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

स्थळ—इंद्रलोक–चित्ररथाचा महाल

[ दोन गंधर्व अंतःपुराचें द्वार राखीत उभे आहेत. ]

१ गंध०:—कायरे आज अंतःपुरांत रोजच्याहून विशेष दंगल चाललेली दिसते !

२ गंध०—आहे तसंच कारण त्याचं !

१ गंध०:—( उत्सुकतेनें ) तें काय ?

२ गंधः०—तूं कर बरं तर्क.

१ गंध०:—(विषाद करून) मला नाहीं होत कांहीं तर्क, तूंच सांग.

२ गंध०:—आज देवेंद्राच्या सभेंत आपल्या चित्ररथमहाराजांनीं पाताळांतून आलेल्या एका गायकाचा गायनामध्यें पुरा पराभव केला. त्याचा हा विजयोत्सव सुरू आहे.

गंध०:—काय ? पाताळांतल्या गायकाचा पराभव ? खास करतील. आपल्या चित्ररथमहाराजांचा गायनविद्येंत प्रभाव तसाच आहे ! पण कायरे, महाराजांशीं स्पर्धा करणारा हा पाताळांतला गवईहि तसाच मोठा जाडा असला पाहिजे !

२ गंध०:—अरे, विचारतोस काय ? मी स्वतःच होतों तें गायनयुद्ध पाहायाला ! चारचार भोपळे जोडलेले आठ तंबोरे लावून मध्यें स्वारी गायला बसली होती. मसालेदार तांबूल करून देणारा एकएक अनुचर दोन्ही बाजूंला उभा होता. समोर मुखरस टाकण्याकरितां कनकपात्रें ठेविलीं होतीं. एक सेवक कमलतंतूचं वस्त्र घेऊन घर्मबिंदु पुसायला तत्पर होता. आणि हातांत ऐरावताच्या कानायेवढे मोठे अभ्रकपत्राचे पंखे घेऊन दुसरा सेवक एकसारखा वारा घालीत होता. गायकाच्या अंगावरचे हिऱ्यामोत्यांचे

दागिने पाहून तर, कुबेरमहाराजांची स्वारी गाणं ऐकायला आली होती, ती टकमक टकमक पहात राहिली ! काय सांगू तुला ? सभेत सिंहासनावर देवेंद्राची स्वारी बसली होती त्यामुळं आज दोन देवेंद्र निर्माण झाले की काय असं ज्याला त्याला वाटलं.

१ गंध०:—बरं, पण गाण्याचं कसं काय ?

२ गंध०:—तें कांहीं विचारूं नको ! वाटे कीं गळ्यांमध्यें यानें काय जिवंत कोकिळांचा ताफाच आणून बसवून ठेवला आहे कीं काय ? इतका गळा गोड. आवाज हिमालयाच्या शिखराहून अधिक पहाडी ! उंच केला म्हणजे वाटे कीं, ही काय प्रळयकाळची हांक आहे ! आणि खर्जात गेला म्हणजे वाटे की हा गवई गात नसून ग्रहमालेच्या गतीनं उत्पन्न होणारा परम गंभीर आवाजच ऐकूं येतो !

१ गंध०:—असं का ? तर मग असल्या गवयाचा पराभव करायला आपल्या चित्ररथमहाराजांना मोठं जड गेलं असेल !

२ गंध०:—प्रथम सर्वांनाच असं वाटलं खरं. पाताळचा हा गवई गाऊन उठल्यावर आमचे महाराज त्याच स्थानावर जाऊन बसले. त्यांनी अगदीं साधीं वस्त्रं अंगावर घेतलीं होतीं. म्हणून ज्यांच्या डोळ्यांत पाताळच्या गवयाचं वैभव भरलं होतं त्यांना महाराज अगदीं फिक्के दिसले. दुसरं असं, ( किंचित् हळू इकडेतिकडे पाहून ) आपले महाराज होते जरा मदिरेच्या धुंदींत. तें पाहून तर सर्वांच्या तोंडचं पाणीच पळालं. पण स्वतः देवेंद्रमहाजांना मात्र पुरा विश्वास होता कीं आपला गवईच जिंकणार म्हणून !

१ गंध०:—बरं मग ?

२ गंध०:—मग काय ? चित्ररथमहाराजांनीं नुसता ‘ सा ’ लाविला मात्र; कीं तेव्हांपासून गाण्याला जो रंग भरला तो अखेरपर्यंत ! महाराजांनीं लवकरच ठेवणींतल्या अस्सल चिजा काढून मेंढ, मुर्की, घसिट यांचा असा हल्ला सुरू केला कीं त्यामुळं पाताळचा गवई निम्माशिम्मा चीतच झाला. आणि त्यांतूनहि जो काय अर्धामुर्धा उरला होता, तो शेवटीं महाराजांच्या तानांच्या जाळ्यांत गुरफटून जाऊन पुरा मेला ! अहाहा ! त्यांच्या गळ्यांतून

निघणाऱ्या समुद्रतरंगासारख्या उंच, विस्तृत आणि गंभीर लहरी ऐकून सर्व सभा तटस्थ झाली–आणि हूं काय ? पाताळच्या गवयानं उठून महाराजांचे पाय धरले ! लगेच देवेंद्रांनीं महावस्त्रांचा पोषाख, दागिने इत्यादि देऊन महाराजांची जागच्याजागीं संभावना केली ! आणि "गानमतंगज-केसरी " अशी पदवी दिली !

१ गंध०:—धन्य–धन्य–धन्य–चित्ररथमहाराज !

[ पडद्यांतून–" धन्य–धन्य–धन्य–चित्ररथमहाराज " असा घोष करीत मदिरा व वीणा अशा दोन गंधर्वकुमारी येतात; मदिरेच्या हातांत एक लहानशी वीणा, आणि वीणेच्या हातांत एक मदिरेची स्फटिकाची सुरई असते. ]

२ गंध०:—कायरे ! आज अंतःपुराच्या द्वारावर येणाऱ्याजाणाऱ्यांनीं उच्चारण्याचा गुप्त शब्द, या मुलींनीं उच्चारला तोच आहे का ?

१ गंध०:—होय तोच; तो शब्द उद्यां सकाळीं बदलायचा आहे !

[ गंधर्वकुमारी फिरून " धन्य–धन्य–धन्य–चित्ररथमहाराज " असे शब्द उच्चारतात. ]

वीणा:—मदिरे, तूं कुणीकडं ?

मदि०:—वीणे, तूं जिकडं तिकडंच मी !


वीणा:—( मनांत ) चित्ररथमहाराजांकडं आधीं मी जाणार आणि देवेंद्रांनीं दिलेल्या या बहुमोल देणगीचा आनंद त्यांना मी आधीं घडविणार !

मदि०:—( मनांत ) ही वीणा जर माझ्या आधीं गेली तर चित्ररथमहाराज आनंदानें जें बक्षीस देतील तें तिला आधीं मिळणार. तर आपणच धांवत इच्या आधीं जावं.

[ दोघीहि एकदम धांवत द्वाराकडे जातात. दोघेहि द्वारपाळगंधर्व पुढें येऊन त्यांना अडवितात ]

१ द्वा० गं०:—काय ग पोरींनो, कुणीकडं चाललां ? गुप्तप्रवेशाच्या खुणेचा शब्द तुम्हांला माहीत आहे काय ?

वीणा–मदि०:—( दोघी एकदम ) हो माहीत आहे आम्हांला. धन्य–धन्य–धन्य–चित्ररथमहाराज, आतां सोडा आम्हांला आंत.



१ ब्रा० ग०:—काय गं पोरींनो ! कुणीकडं चाललां ?                [ पृ० ५२.

२ द्वा० गं०:—आम्हीं दोघींना नाहीं सोडणार आंत एकदम! कोणी तरी एकजण आंत जा.

वीणा–मदि०:—( दोघी एकदम ) मला आधीं सोडा आंत.

१ द्वा० गं०:—फिरून तेंच. एक कोणी तरी वाटेल ती आधीं जा.

२ द्वा० गं०:—मी करतों त्याचा निर्णय. चित्ररथमहाराजांकडेंच तुम्ही चाललां आहां ना?

दोघीः—( एकदम ) होय.

२ द्वा० गं०:—काय काय आहे तुमच्याजवळ?

वीणा–मदि०:—( दोघी एकदम बोलतात ) मदिरा! वीणा!

१ द्वा० गं०:—पण यांतलं महाराजांना अधिक आवडतं असेल तें आम्ही आधीं आंत सोडूं!

वीणाः—महाराजांना वीणेपेक्षां मदिरा अधिक प्रिय असते. मला आधीं जाऊं द्या आंत!

२ द्वा० गं०:—महाराजांना मदिरा अधिक प्रिय असते ना? मग (मदिरेच्या खांद्यावर हात ठेवून) ही पहा मदिरा! इला सोडतों आंत आधीं!

वीणाः—तसं नव्हे, ही मदिरा! ( हातांतल्या मदिरेच्या कुपीकडे बोट दाखविते. )

१ द्वा० गं०:—बरं काय ग ए मदिरे? तूं आधीं आंत कां जाणार सांग पाहूं?

मदि०:—महाराजांना मदिरेपेक्षां वीणा अधिक प्रिय असते म्हणून!

१ द्वा० गं०:—होय ना! मग ही पहा वीणा! ( वीणादासीकडे बोट दाखवून ) हिला सोडतों आंत आधीं!

मदि०:—तसं नव्हे. ही पहा महाराजांची आवडती वीणा!

[ आपल्या हातांतील वीणेकडे बोट दाखविते. ]

२ द्वा० गं०:—अरे ही तर पंचाईत झाली! इथं आतां दोन मदिरा आणि दोन वीणा झाल्या! आतां कसं काय करावं बुवा?

[पडदा उघडतो. आंत चित्ररथगंधर्व व त्याची स्त्री उच्चासनावर बसलीं आहेत; पुढें तंबोरा व तबला घेऊन दोन मुली बसल्या आहेत, असा देखावा.]

चित्र०:—अहाहा ! मालती, सभेंत माझा गळा काय सुंदर लागला होता म्हणून सांगूं !

माल०:—असं वर्णन करूं नये महाराज ! दृष्ट पडायची आपली आपल्याला !

चित्र०:—पडूं दे, दृष्ट पडूं दे. यापुढं जन्मभर माझा गळा बसला आणि त्यांतून एकहि सूर निघाला नाहीं तरी हरकत नाहीं. माझ्या जन्माचं सार्थक झालं. पाताळलोकच्या गायकावर मीं विजय मिळविला ! माझी कीर्ति आजवर फक्त या स्वर्गलोकांतच होती, ती यापुढं पाताळलोकांतहि पसरणार !

माल०:—होय महाराज, इंद्रसभेंतून परत आलेले देव, यक्ष व गंधर्व आज राजमार्गानें याच गोष्टी बोलत जात होते. तें ऐकून मला किती तरी धन्यता वाटली.

चित्र०:—होयना प्रिये ! म्हणूनच मी म्हणतों कीं, माझं जन्माचं काम झालं. [ वीणा व मंदिरा प्रवेश करितात. ]

वीणा–मदि०:—(एकदम) गंधर्वराजांच्या गायनविजयाबद्दल प्रेमचिन्ह म्हणून ही वस्तु देवेंद्रांनीं आपला हस्तस्पर्श करून माझ्याबरोबर महाराजांकडं धाडली आहे, हिचा स्वीकार व्हावा !

माल०:—( हंसून ) अग अशा एकदम काय बोलतां ? एकामागून एक बोलाल कीं नाहीं ?

वीणा:—माझी प्रतिज्ञा होती कीं, आपली वस्तु आधीं पोंचवीन म्हणून !

मदि०:—आणि माझीहि प्रतिज्ञा तशीच होती !

माल०:—(हंसून) अस्सं कां ? मग बाई दोघींच्याहि प्रतिज्ञा सफळ झाल्या खऱ्याच ! ( दोघींचेहि प्रेमानें गालगुचे घेऊन ) बरं तर आतां तुम्हांला बक्षिसंहि एकदमच दिलीं पाहिजेत तर ! ( दोन्ही हातांतल्या बोटांतली एकेक आंगठी काढून ) या अशा पुढं या ! आणि हात क[रा] माझ्यापुढं. ( त्या तसें करतात व मालती दोघींच्याहि हातांत एकदम आंगठ्या घालते, व एकदम प्रेमानें दोघींच्याहि तोंडांत देते. ) जा बरं, आतां आल्यात तशा एकदम जा पाहूं !

[ दोघी एकदम " धन्य-धन्य-धन्य-चित्ररथमहाराज " म्हणून दोहींकडून पळून जातात. ]

चित्र०:—( वीणा व मदिरेचा कलश घेऊन ) अहाहा ! देवेंद्राचं हें माझ्यावर केवढं प्रेम ! ही वीणा आणि ही मदिरा दोन्हीहि कशा मला प्राणापेक्षां प्रिय आहेत !

माल०:—म्हणूनच देवेंद्रांनीं आपला हस्तस्पर्श करून त्या इकडं धाडून दिल्या.

चित्र०:—मग आतां प्रिये ! तूंच सांग बरं माझा जन्म सफळ झाला कीं नाहीं तो ! " चित्ररथा, धन्य धन्य " हे शब्द खुद्द देवेंद्राच्या तोंडून निघाले ! आतां माझं कोणतं कार्य उरलं ? खरंच मालती, मला आतां मृत्यु आला तरी हरकत नाहीं !

माल०:—(रागानें) हें काय भलतंच बोलावं तें ? पोटांत मावेना इतका आनंद झाला म्हणून कुणी असं का बोलत असतं ! [नारद प्रवेश करतो.]

नार०:—( स्वगत ) अरे ! यांचा हा मृत्युविषयक संवाद कसला चालला आहे ? चित्ररथाला श्रीकृष्णाच्या प्रतिज्ञेची वार्ता आधींच कळली कीं काय ? [ उभा राहतो. ]

चित्र०:—( मद्य पिऊन ) ही पहा देवेंद्राच्या हस्तस्पर्शानं पवित्र झालेली नंदनवनांतल्या उत्तमोत्तम सुगंधी पुष्पांपासून आणि रुचकर अशा तृणपल्लवांपासून तयार केलेली, ही मदिरा मी आकंठ प्यालों. आतां हा कंठनाळ जरी कोणीं चिरला तरी त्याची मला चिंता नाहीं. आणि मृत्यु जर मला अशा स्थितींत लवकर हरण करून नेईल तर सर्व यम-लोक माझ्या अंगच्या सुगंधानें दरवळून जाईल !

माल०:—( कानावर हात ठेवून ) शिव शिव शिव ! हे अमंगळ शब्द तोंडांतून काढवतात तरी कसे ! [ नारद पुढें येतो. ]

चित्र०:—काय ? असले शब्द तोंडांतून कसे काढवतात ? पहा हवे तर मी त्यांचा फिरून उच्चार करून दाखवितों.

माल०:—नको नको ते शब्द ऐकायला मला !

[ त्याच्या तोंडावर हात ठेवते. ]

नार०:—मालती, हा सर्व काय प्रकार आहे ? चित्ररथ मृत्यूचं काय बोलतो ?

माल०:—( लाजून ) मदिरेच्या आनंदोत्सवांत कोण काय बोलेल आणि काय नाहीं !

नार०:—तसं नव्हे मालती ! मला खचित वाटतं कीं, तुझ्यावर आणि तुझ्या पतीवर जें एक संकट येऊं पहात आहे, त्याची ही प्रस्तावना त्याची आत्मस्फूर्तिच त्याच्या तोंडून करवीत आहे !

माल०:—( दचकून ) काय महाराज ! कसलं संकट आमच्यावर येणार आहे ?

नार०:—मालती, तूं शहाणी आहेस ! तेव्हां संकटाला धैर्यानं तोंडच दिलं पाहिजे, हें मीं तुला सांगायला पाहिजे असं नाहीं. ऐक सांगतों. मालती, तुला माहीतच आहे कीं, अलीकडे कित्येक दिवस गंधर्वांच्या हातून कळत न कळत असे बरेच अपराध घडले आहेत ! आणि अपराधांच्या प्रायश्चित्ताचा दिवस केव्हांना केव्हां तरी येतोच. तसाच गंधर्वांच्या अपराधांचाहि आला आहे. आणि तोहि लांब नाहीं तर आठ प्रहरांच्या आंत !

चित्र०:—अहो, वीणाचोर ! अहो विदूषकाधिराज ! ही आपण काय थट्टा आरंभिली आहे माझ्या प्रियेची ?

नार०:—चित्ररथा ! अरे थट्टा नाहीं. असली थट्टा का कोणी करतं ?

चित्र०:—जाऊं दे ग प्रिये, नारदाचं तूं काय ऐकत बसली आहेस ? त्याचा विनोद हा आपला नेहमींचाच आहे. उगाच आपल्या क्रीडासुखांत तितका व्यत्यय मात्र यायचा !

नार०:—चित्ररथा, अरे बाबा हा विनोद नाहीं. नीट शुद्धीवर ये. मी सांगतों यांत एक अक्षरहि खोटं नाहीं.

माल०:—महाराज, मदिरामदामुळं इकडं आनंदाचं भरतं आलं आहे. आणखी कांहीं वेळ गेल्याशिवाय, आपण काय म्हणतां याचा अर्थसुद्धां नीट ध्यानांत यायचा नाहीं. आपण काय म्हणतां तें मलाच सांगा.

नार०:—( हातावर हात मारून ) आतां मी काय सांगूं आपलं कपाळ !

चित्र०:—नारदा, तुमचं कपाळ सांगायला कशाला पाहिजे ? तें डोळ्यांना दिसत नसेल तर सांगायचं ! तुमचं कपाळ केवढं लांबरुंद, जशी कांहीं ऐरावती पाठच ! तुमचं कपाळ केवढं तरी उंच, जसं कांहीं वैजयंतप्रासादाचं शिखरच ! तुमच्या कपाळावरची श्वेतमुद्रांचीं जाळीं पाहून मला हिमालयावरच्या शुभ्र बर्फातल्या क्रीडागुंफाची किंवा चक्रव्यूहाची आठवण होते.

नार०:—वाहवारे मद्याचा प्रभाव!मृत्यु डोळ्यांपुढं आला तरी आनंदच!

चित्र०:—( हंसून ) नारदा, आनंद म्हणून काय विचारतां ? पण तो सांगूनहि समजाचा नाहीं. हा दिव्य मद्याचा एक पेला भरून घ्या ! म्हणजे नारदा , मग तुम्हांला उगाच वणवण करून भटकायला नको; सगळं त्रैलोक्य गरगर फिरून तुमच्या डोळ्यांपुढून आपोआप बसल्या जागीं जाईल ! आणि मग काय ! सगळा आनंदी आनंदच !

माल०:—( उत्सुकतेनें ) नारदा, त्यांचं काय ऐकायचं अशा वेळीं ? आपण मला सांगतां ना काय खरा प्रकार आहे तो ?

नार०:—मालती, काय सांगूं ? श्रीकृष्णानं प्रतिज्ञा केली आहे !—

चित्र०:—( हंसून ) इतकंच ना ? मग त्यांत काय वाईट झालं ? श्रीकृष्णाला सोळा हजार एकशें आठ स्त्रिया आहेत. त्याला एखादी आणखी स्त्री करायची असेल झालं ! आजवरच्या सगळ्या स्त्रिया भूलोकावरच्या आणि पाताळांतल्या झाल्या. तेव्हां कृष्णाला आतां स्वर्गां-तल्या एखाद्या स्त्रीची लालसा उत्पन्न झाली असेल, येवढंच ना ! मग त्याला येवढी प्रतिज्ञा कशाला ? एखादी गंधर्वकन्या श्रीकृष्णाला हवी असेल तर ती त्याची हौस मी सुद्धां पुरवीन. आणि असली तसली नको अगदी इंद्रसभेंत नृत्यगायन करणारीच हवी असेल तर श्रीकृष्ण देवेंद्राला नुसता निरोप पाठवूं दे कीं झालं काम ? पारिजातक देत नाहीं म्हटल्या-मुळं आपल्यावर युद्धाचा प्रसंग आला हे देवेंद्राच्या पुरं लक्षांत आहे. फिरून देवेंद्र कृष्णाला नकार देणारच नाहीं !

माल०:—( पुढें होऊन ) नारदा, सांगाना श्रीकृष्णानं कोणती प्रतिज्ञा केली आहे ती ?

नार०:—मालती, काय सांगू ? त्या प्रतिज्ञेचा तोंडानं उच्चारहि करायला माझं मन घेत नाहीं, इतकी ती भयंकर आहे.

[ खालीं मान घालून उभा राहतो. ]

चित्र०:—मला वाटतं नारद अलीकडं फारच भित्रा झाला आहे. पण काय करील बिचारा ? सर्व प्रकारचं धैर्य अंगांत आणून देणाऱ्या या स्वर्गीय रसायनाचं त्यानं जर कधींच सेवन केलं नाहीं तर त्याच्या अंगांत धैर्य तरी येणार कसं ? [ मद्य पेल्यांत ओतून पितो. ]

माल०:—नारदा, प्रतिज्ञा ऐकायच्या आधींच माझं मन भीतीनं कांपू लागलं आहे. तरी पण वाइटांत वाईट काय असेल तें ऐकलंच पाहिजे ना ?

नार०:—ऐक मालती !

चित्र०:—( थट्टेच्या स्वरानें हंसून ) सांग नारदा ! मीहि ऐकतों माझं हृदय जरी आनंदानं भरून गेलं असलं तरी माझे कान अगदीं मोकळे ठेवले आहेत.


माल०:—( त्रासानें ) राहूं दे ना ! आतां आपण क्षणभर बोलूं नये !

नार०:—मालती, श्रीकृष्णानं अशी प्रतिज्ञा केली आहे की, सोळा प्रहरांच्या आंत चित्ररथाचा शिरच्छेद करीन.

[ हें ऐकतांच मालती किंकाळी फोडते व त्याच वेळीं चित्ररथ मोठमोठ्यानें खदखदां हंसतो. दोन्ही क्रिया एकदम होतात. ]

चित्र०:—( हंसून ) काय माझा शिरच्छेद ! आणि तो कसा काय बुवा ! माझ्या आनंदानं माझं शरीर आणि माझं शीर हीं अगदीं एकरूप करून टाकलीं आहेत. नारदा, जा तुम्ही कृष्णाला सांगा कीं, चित्ररथाचं डोकंच जाग्यावर नाहीं मग तूं तें कसं तोडणार ? आतां माझा शिरच्छेद झाला तर तो मला हवा आहे. पण प्रिये ! तूंच चांगला करशील ये, माझ्या गळ्याभोंवतीं आपल्या बाहुलता अशा पसरून दे कीं, तुझ्या उरोजवेष्टनांत माझं शिर झांकून नाहींसं होऊन जाईल ! आणि तसं झालं म्हणजे शरदृतूतल्या मेघांच्या जाळीदार पडद्याआड लपून खेळूंया ! चंद्र सगळ्या जगाकडं चोरून बघतो तसा मग मीं या नारदाकडं बघेन !

[ हें चाललें असतां मालती स्फुंदून रडते. ]



चित्ररथः—चित्ररथाचं डोकंच जाग्यावर नाहीं, मग तूं तें कसें तोडणार ? [ पृ० ५८

माल०:—( रडत ) नारदा, खरंच तुम्ही इकडची किंवा माझी थट्टा तर करीत नाहीं ना ? तुमची ही वार्ता ऐकून मी अगदीं भिऊन गेलें आहें. माझ्या काळजानं ठाव सोडला ! खरंच नारदा ही सर्व थट्टा म्हणा म्हणजे मी तुमचे उपकार मानीन !

[ नारद मालतीला खुणावून जवळ बोलावतो व कानांत सांगतो. ]

चित्र०:—( हंसून ) नारद सदा सगळ्या जगाची थट्टा करितो, पण थट्टा केली असं कधीं म्हणतो का ? प्रिये, तूं कसले उपकार मानतेस या थट्टेबाज विदूषकाचे ! यानं आम्हां गंधर्वांची वीणा चोरून गवयाचं ढोंग केलंन् ! पण हें बघ प्रिये, याचा गळा जर चांगला नाहीं, तर जगाची एकतानता करून जगाला शिकवायचं त्याला कसं बरं साधणार ? आणि तें साधेना तेव्हां जगावर रागावून यानं कलह लावायचे आरंभिले ! पण प्रिये ! याच्या अंगांत खरा दुष्टपणाच नाहीं. आणि खरा जातीचा दुष्टपणा, कुणाच्याहि अंगांत असल्याशिवाय, त्याच्या हातून लावालावी तरी कशी यशस्वी होणार ! तल्लीनता उत्पन्न करणाऱ्या आमच्या तंतुवाद्यांच्या तारांची लावालावी करणं सोपं, पण अगदीं खरंखुरं होऊन रक्तस्राव माजेल अशी कलहाची लावालावी करणं त्याहून अवघड आहे. आण रे इकडं माझी वीणा बघूं ! [ वीणा लावीत बसतो. ]

माल०:—मीं बायकोमाणूस ! मला तरणोपाय कसा सुचणार ? तो आपणच सांगा ! या घोर प्रतिज्ञेची वार्ता सांगायला धांवून येण्याची कृपा जशी आपण माझ्यावर केली तसाच या संकटांतून निभावून जाण्याचा मार्गहि आपणाशिवाय मला दुसरा कोण सांगणार ?

नार०:—मालती, वेळ मोठी वाईट आली खरी ! त्यांतून निभावणीचा कांहीं मार्ग सांगितला तर चित्ररथ शुद्धीवर नाहीं.

माल०: —आपण काय मार्ग असेल तो मजजवळ सांगून ठेवला तरी चालेल ! आणखी दोनचार घटकांनीं मदिरेचा मद उतरून शुद्धीवर यायचं होईल, तेव्हां श्रीकृष्णाच्या प्रतिज्ञेची बातमी ऐकून माझ्याइतकंच घाबरायचं होईल, आणि तुम्ही सांगून ठेवाल तो उपाय मग मीं हातून करवीन—

नार०:—ठीक आहे, इकडं कान कर म्हणजे सांगतों ! मोठ्यानं बोललों तर चित्ररथ तें ऐकेल, आणि शुद्धीवर नसल्यानें त्याची उगीच मोठमोठ्यानं वाच्यता करीत बसेल. या सगळ्या उपाययोजना गुपचुप झाल्या पाहिजेत. नाहींतर कृष्णाला कळून तो तरणोपायाचे तेहि सर्व मार्ग बंद करून टाकील हो ! कारण, कुणीकडून तरी त्याला आपली प्रतिज्ञा पुरी करायची आहे ना ?

माल०:—( रडत ) मीं सर्व कांहीं आपण सांगितलं तसं हातून करवितें; पण त्याचा कसा काय उपयोग होईल देव जाणे ! खरंच नारदा, होईल का कांहीं उपयोग या सगळ्याचा ! नाहींतर हे मोठमोठे देव म्हणजे सगळे श्रीकृष्णाचे पक्षपाती !

नार०:—बोलूं नको, बोलूं नको मोठ्यानं ! मग तुला येवढं कानांत कशाला सांगितलं तें ? आणि त्यांतूनहि उपाय फसलाच तर मग दुसरा कांहीं सुचतो पाहीन ! मीं जातों आतां ! [ जातो. ]

माल०:—( ढळढळा रडून ) आतां मीं काय करूं ? नारदमुनि दृष्टिसमोर होते तोंपर्यंत मला मोठा धीर वाटत होता. ते गेल्यामुळं अरण्यांतल्या आगींत मीं एकटी सांपडल्यासारखी झालें आहें ! महाराज—

चित्र०:—प्रिये, मीं तुझं सगळं बोलणं ऐकतों आहें. तूं एकटी आहेस असं का तुला वाटतं ? आणि मीं इथं असतांना ! मग आश्चर्यच आहे म्हणायचं ! ( उठून तिचा हात धरून ) चल, मला आतां इथं बसण्याचा कंटाळा आला आहे. इंद्रमहाराजांनीं मला दिलेली ही नवी सुंदर वीणा घेऊन आपण गंधर्वोद्यानांत कांहीं वेळ जाऊन बसूं या, म्हणजे मी थोडासा गाईन आणि कोकिळेला माझ्याशीं स्पर्धा करण्याचा हिसाळ आणून जरा गंमत करीन; म्हणजे या कळलाव्या नारदानं खोटं-खोटं सांगून तुझ्या मनाला काळजी लाविली आहे ती दूर होऊन, तुझा चेहरा आनंदानं प्रफुल्लित झालेला मला पहायला सांपडेल !

माल०:—आतां कसली गंमत आणि कसला आनंद ? ( रडत ) खरंच होईल का कांहीं नारदांनीं सांगितलेल्या उपायाचा उपयोग ? चला महाराज ! आपणाला आवडत असलं तर गंधर्वोद्यानाकडं जाऊं. (आपल्याशीं)

स्वारीची धुंदी उतरून नारदांनीं आणलेली बातमी समजून घ्यायची होईल तेव्हां काळजाचं पाणी कसं होईल तें बाई माझ्या डोळ्यांपुढं आधींच दिसूं लागलं आहे ! काय होईल तें खरं ! देवेंद्राला काळजी !

[ मालती चित्ररथाचा हात धरून त्याला घेऊन जाते. ]

---

## प्रवेश दुसरा

स्थळ—गंगातीर

[ सत्यभामा व सात्यकी बोलतबोलत प्रवेश करितात. ]

सत्य० :—मीं तुम्हांला मुद्दाम बोलावणं पाठविलं !

सात्य०—सेवेला हजर आहे !

सत्य० :—आज इकडच्या चर्येंत कांहीं फरक दिसतो का झालेला तुम्हांला ?

सात्य० :—तसा म्हणण्यासारखा फरक झालेला मला कांहीं दिसला नाहीं फारसा !

सत्य० :—तुमची आणि तिकडची गांठ पडून किती वेळ झाला ?

सात्य० :—झाला थोडा वेळ ! आपण आणि महाराज बोलत बसलां होतां, मग आपण निघून गेलां, मीं शिबिराजवळच होतों, इतक्यांत दोघे ऋषि आणि ऋषिकुमार गोंगाट करीत महाराजांना भेटायला आले, त्यांची आणि महाराजांची गांठ घालून दिली, आणि मीं निघून गेलों गंगातटाकावर. तेव्हांपासून माझी गांठ पडली नाहीं.

सत्य० :—तरीच तुम्हांला कांहीं माहीत नाहीं.

सात्य० :—पण असं झालं तरी काय ?

सत्य० :—अमुक एक झालं असं कांहीं नाहीं. पण तिकडच्या चर्येंत फार फरक पडला आहे खरा. गंगानदीमध्यें नावेंत बसून जायचं ठरलं होतं तो बेत एकदम रहित केला ! आणि निद्रा न घेतां मंचका-

वर उगीच विचार करीत पडल्यासारखं पडायचं झालं आहे मगाचपासन ! ' काय चाललं आहे ? ' म्हणून विचारलं म्हणजे जुलमानं किंचित् हंसून ' कांहीं नाहीं, उगीच विचार करीत पडलों आहें ' असं सांगायचं, आणि दुसऱ्या कुशीवर वळायचं ! म्हणजे मला दिसूं नये ! मग मीं कशाला उभी राहूं तिथं !

सात्य०:—पण चर्येवरून राग आला आहे कीं कांहीं चिंता उत्पन्न झाली आहे यांपैकीं काय वाटतं आपणाला ?

सत्य०:—मला दोन्हींचाहि भास झाला ! पण कुणावर तरी राग झाला आहे खरा !

सात्य०:—अहाहा ! इतका भाग्याचा कोण असेल तो खरा ! कारण, मला पक्कं माहीत आहे कीं, महाराजांचा कुणावर राग झाला आणि त्याचंहि कल्याण झालं नाहीं असं नाहीं ! ज्या मुखावर सर्व जगाविषयीं प्रीति आणि सद्बुद्धि यांचं गोड हास्य नित्य खेळत असतं, त्यावर रागाची किंचित् छाया उमटलेली पहायला मिळाली तर ती एक पर्वणीच खरी ! तें मुखसौंदर्यहि कांहीं वेगळेंच आहे !

सत्य०:—पण सेनाधिराज, तो रागीट चेहरा पाहून माझ्या मनाला रुखरुख लागली आहे. कसं विचारावं आणि काय करावं कांहीं सुचत नाहीं

सात्य०:—मला वाटतं कीं मगाशीं जे ऋषिकुमार आले होते त्यांच्या भाषणांत कांहीं कमजास्त निघालं असावं !

सत्य०:—पण तें कळणार कसं ? [ कृष्ण प्रवेश करितो. ]

कृष्ण:—कोण सात्यकि ? तुम्ही आलां फार चांगलं झालं.

सात्य०:—मी सेवेला हजर आहे.

कृष्ण:—सात्यकि, गंगातीर हें कुणाच्या राज्यांत मोडतं ?

सात्य०:—महाराजांच्या !

कृष्ण:—( रागानें ) छेः ! तसं नसेल. तुम्ही मला भलतंच कांहीं तरी सांगतां !

सत्य०:—पण असला प्रश्न कां विचारणं होतं आहे आज ! त्याचा हेतु कळला तर बरं होईल ?

कृष्णः—तसं असतं तर गंगातीरावर तपश्चर्या करणाऱ्या ऋषिगणांना गंधर्वांकडून असा त्रास पोंचता का?

सात्य०:—काय हकीकत आहे ती मीं ऐकलेली नाहीं.

सत्य०:—मगाशीं कोणी ऋषि मोठमोठ्यानं ओरडत आक्रोश करीत आले होते ते; त्यांनाच कोणीं कांहीं त्रास दिला आहे वाटतं!

कृष्णः—आक्रोश न करितील तर बिचारे काय करितील? आम्हीं त्यांच्या तपश्चर्येकरितां सुखाच्या सोई करून द्यायच्या त्या तर राहिल्याच; पण त्यांना दुष्ट लोकांकडून उपसर्ग पोंचतो त्याचंहि निवारण आमच्या हातून होऊं नये, ही आमच्या क्षत्रिय राजे लोकांची नीति! अरेरे! तापसी लोक असे दुःखांत असतां आम्हीं क्षत्रियांनीं नदीकांठीं उपवनं निर्माण करून क्रीडासुख भोगीत बसावं? तें कांहीं नाहीं! वनदेवी कनकश्रीला माझा निरोप सांग कीं, आम्हांला आठदहा प्रहरांपेक्षां या ठिकाणीं राहतां येणार नाहीं. आणि आमच्या प्रीत्यर्थ उत्सव-समारंभ चालूं आहेत ते सर्व थांबवा! माझ्या मनाला त्यांच्यापासून करमणूक तर होत नाहींच; पण उलट काळजावर डाग दिल्यासारखा वाटतो!

सत्य०:—देवी कनकश्रीची समजूत मी घालीन; त्यांत कांहीं मोठंसं कठिण नाहीं. पण कुणा ऋषिवर्याला काय त्रास झाला हें नाहीं का आम्हांला कळवायचं?

सात्य०:—तें थोडंसं कळलं तर मी स्वतः जाऊन त्याचा बंदोबस्त करून येईन. महाराजांना त्याची चिंता करण्याचें कारण नाहीं!

कृष्णः—सात्यके, ऐका. देवी सत्यभामे, ऐक. आज सकाळीं महात्मा गालवऋषि गंगास्नान करून अर्घ्यप्रदान करीत असतां देवेंद्राच्या सभेंतील नृत्यगायनाचा अधिपति जो गंधर्व चित्ररथ त्यानं—काय केलं असं तुम्हांला वाटतं?

सत्य०:—गालव ऋषींना जाऊन बळंच शिवला कीं काय?

सात्य०:—नाहींतर—हातांतलं अर्घ्यप्रदान त्यानं उडवून दिलं असेल!

कृष्णः—नाहीं. याहून मोठा अत्याचार त्याच्या हातून घडला! चित्ररथ स्त्रीसह विमानांत बसून गंगेच्या पात्रावर क्रीडा करीत असतां त्यानं

गालव अर्ध्यप्रदान करीत असलेला पाहून आपल्या तोंडांतली मद्याची चूळ त्याच्या ओंजळींत टाकली, आणि आपल्या स्त्रीकडूनहि तसंच करविलं !

सत्य०:—अगबाई ! काय ? मद्याची चूळ ऋषीच्या ओंजळींत ?

कृष्णः—आणि मद्याच्या भरतीला तांबूल !

सात्य०:—मीं जर त्या ठिकाणीं असतों तर चित्ररथाची तिथल्या-तिथं मान तोडली असती !

कृष्णः—बरोबर, आणि मींहि झालं तरी आतां तेंच करणार आहें. गालवऋषींच्या समाधानाकरितां मीं अशी प्रतिज्ञाच केली आहे कीं, चित्ररथाचा शिरच्छेद करून त्याच्या अत्याचाराचं प्रायश्चित्त मीं त्याला देईन ! तें सर्व होईल ! पण असा अत्याचार मुळीं गंधर्वांच्या हातून घडावाच कां ?

सत्य०:—मला वाटतं देवेंद्राचं गंधर्वांना पाठबळ असेल म्हणून !

सात्य०:—पारिजातवृक्षाच्या वेळीं दातीं तृण धरून महाराजांच्या पायीं शरण कसं यावं लागलं हें देवेंद्र विसरला वाटतं ?

सत्य०:—विसरला असला तर फिरून आठवण होईल लवकरच.

कृष्णः—ठीक आहे ! सात्यके, विमानराजाच्या हातीं इंद्राला निरोप पाठवा आणि त्याला कळवा कीं, तुझ्या प्रजेचा न्याय तुझा तूंच कर. चित्ररथाचा शिरच्छेद तूं केलास तरी चालेल. पण माझ्या प्रतिज्ञेप्रमाणं परवां प्रातःकाळच्या आंत त्याचं शिर माझ्या पायांशीं येऊन लोळलं पाहिजे. नाहीं तर युद्धाला सिद्ध हो ! सात्यके, जा; आत्तांच्या आत्तां हें काम झालं पाहिजे !

सात्य०:—जशी आज्ञा ! [ जातो. ]

सत्य०:—निरोप पोंचतांच इंद्र चित्ररथाचा शिरच्छेद करील ! तो युद्धाच्या भानगडींत पडेल असं नाहीं मला वाटत !

कृष्णः—तो तसं कांहीं करणार नाहीं ! पण त्याचा तरी काय नेम सांगावा ? कारण, इंद्र पडला गायननर्तनाचा मोठा भोक्ता. आपल्या आवडत्या गायकाचा जीव वांचावा म्हणून कोणीकडून तरी माझ्या प्रतिज्ञेच्या काळाचा अतिक्रम व्हावा असा तो प्रयत्न करील. म्हणून मला युद्धाची तयारी करून ठेविली पाहिजे.

सत्य०:—कसंहि झालं तरी प्रतिज्ञेची सिद्धि व्हायला कांहीं पंचाईत पडणार नाहीं. मग काळजी कशाला करावी ?

कृष्णः—देवी, प्रतिज्ञा तडीला जाण्याची चिंता मला मुळींच नाहीं. पण झाली ही अनुचित गोष्ट घडून तरी कां यावी ? असले अत्याचार होणं हेंच आम्हां क्षत्रियांना दूषण आहे ! अपराध्याला केवळ शासन केलं म्हणजे कांहीं हें दूषण पुसून जात नाहीं ! छेः ! माझं मन या गंगातीरावर आतां मुळींच रमत नाहीं. चित्ररथाचा शिरच्छेद होऊन प्रतिज्ञा पूर्ण झाली कीं मी द्वारकेला परत जाणार ! [कृष्ण सत्यभामेचा हात धरून जातो.]

---

## प्रवेश तिसरा.

स्थळ—इंद्रलोक

[ नारद प्रवेश करितो. ]

नार०:—श्रीकृष्णाच्या प्रतिज्ञेवर साक्ष घालून या नूतन कलहांतला एक व्यवहार तर पुरा आणि पक्का करून आलोंच. आतां चित्ररथाकडची वार्ता कशी काय आहे ती पहावी ! चित्ररथ आतां चांगला शुद्धीवर आला असेल आणि एकसुद्धां देव आपल्याला पाठीशीं घालायला तयार नाहीं असं पाहून भीतीनं गर्भगळित झाला असेल ! अरे ! पण हे ऋषिकुमार इकडं कुणीकडं स्वर्गलोकांत ? आणि बंदिवान केलेला हा गंधर्व कोण ? ( इंद्राचे सेवक गंधर्वाला बंदिवान करून घेऊन प्रवेश करितात. बरोबर त्याची स्त्री रडत चालली आहे व दोघे ऋषिकुमार—गालवशिष्य—चालले आहेत. ) आपण यांच्या नजरेला पडूं नये हेंच बरं ! [बाजूला जातो.]

इं० से०:—( गंधर्वास तडाखे देऊन ) बोल अधमा, या ऋषि-कुमारांचा तूं काय अपराध केलास ? बोलतोस कीं नाहीं ?

गंध०:—( विवळत ) सांगतों, पण मारूं नका !

गं० स्त्री०:—आपण त्यांना मारूं नका. मी सर्व कांहीं सांगतें. काल प्रात:काळीं आम्ही उभयतां यक्षद्वीपावर गेलों होतों, तिथं या ऋषिकुमारांची गांठ पडली ! आणि आमच्या हातून त्यांचा थोडासा अपमान झाला हें खरं आहे.

इं० से०:—असं नुसतं मोघम बोलून चालणार नाहीं. अपराधाचा सर्व प्रकार मला कळलाच पाहिजे. कारण, त्या मानानं याला शिक्षा करावी अशी देवेंद्रमहाराजांची मला आज्ञा आहे. कायहो ऋषिकुमारांनों ! हाच ना तुमचा अपराधी ? नीट ओळखा !

१ऋ० कु०:—होय महाराज !

गंध०:—मी या ऋषिकुमारांना टाकून बोललों. त्यांना मी मारलं ! त्यांच्या हातांतल्या पूजासाहित्यानं मी माझ्या स्त्रीची पूजा करविली ! माझी चूक झाली महाराज !

इं० से०:—( दरडावून ) चूक झाली ! अशी कशी चूक झाली ? तुमच्या चुकीमुळं स्वतः देवेंद्राच्या यशाला काळिमा लागतो आणि त्यांच्यावर संकटं येतात हें कुठं आहे माहीत तुम्हाला ! तुम्ही आपल्या मदिरेच्या धुंदींत अपराध करितां आणि वरती मद्यप्राशनाची सबब सांगून अपराधाचं समर्थन करूं पाहतां ! पण देवेंद्राच्या राजनीतीची बेअब्रू होते ना ?

[ तडाखे देतो. ]

गं० स्त्री०:—मी आपल्या पायां पडतें, मारूं नका त्यांना !

इं० से०:—(वेडावून) मारूं नका त्यांना ! (रागानें) अरेरे ! गंधर्वस्त्रियांनींहि इतकं उन्मत्त व्हावं ना ! तुझ्या नवऱ्यानं गंगापूजेच्या साहित्यानं तुझी पूजा करविली, आणि चांडाळणी तूं ती करून घेतलीस ? कुणीकडं ती पवित्र गंगा आणि कुणीकडं तूं या स्वर्गलोकांतली वारयोषिता !

गं० स्त्री०:—(ऋषिकुमारांच्या पायां पडून) महाराज, आपण अपराधाची क्षमा करा, म्हणजे आमची शिक्षा चुकेल; पुनः कधीं आमच्या हातून असं व्हायचं नाहीं !

[ १ ला ऋषिकुमार २ ऱ्या ऋषिकुमाराच्या कानांत कुजबुजतो. ]

२ ऋ० कु०:—ठीक आहे; अहो सेनाध्यक्ष, या गंधर्वाला आणि

त्याच्या स्त्रीला आम्ही क्षमा केली आहे ! हो, क्षमा करणं हा आम्हा ब्राह्मणांचा धर्मच आहे !

१ ऋ० कु०:—माझंहि म्हणणं तसंच आहे. झालं तें झालं. मला त्याची दया येते.

इं० से०:—( ऋ० कु० ना दरडावून ) चूप रहा. तुम्हाला कुणी विचारलं होतं यांना क्षमा करण्याचं ! आणि तुमच्या किंवा माझ्या हातांत तरी काय आहे या कामीं? तुम्हाला फक्त अपराधी लोक हेच कीं नाहीं इतकंच ओळखायला बोलावलं होतं स्वर्गलोकांत. तुम्ही अपराधी ओळखले आणि त्यांनींहि अपराध कबूल केला. आतां त्यांना शिक्षा करण्याकरितां भूलोकावर श्रीकृष्णाकडं पाठवायचे आहेत. तुमचं काम संपलं. जा तुम्ही आतां भूलोकीं. या स्वर्गलोकांत कामापलीकडं राहण्याची तुम्हाला परवानगी नाहीं ! चला या माझ्या पाठीमागून.

[ इंद्रसेवक, गंधर्व आणि गंधर्वस्त्री जातात. ]

२ऋ०कु०:—तरी मी तुला म्हणत होतों कीं,आपणाला ज्यांत अधिकार नाहीं त्यांत बोलूं नये ! आतां झाली फजिती ?

१ ऋ० कु०:—झाली तर झाली ! पण कसंहि असो. यक्षद्वीपावर उन्मत्तपणा करणाऱ्या या गंधर्वांची तरी खूप खोड मोडली कीं नाहीं? झालं तर. [ ऋषिकुमार जातात व नारद पुढें येतो. ]

नार०:—अस्सं ! एकूण या कृत्यांत अपराध्यांना भूलोकावर श्रीकृष्णाकडं पाठविण्यांत येणार ? बरं, पण चित्ररथ जर देवेंद्राच्या सेवकांकडून एकदम श्रीकृष्णाकडं पोंचता झाला तर मग त्याचा शिरच्छेद व्हायला काय उशीर लागणार ? आणि आपली कलह लावण्याची प्रतिज्ञा सिद्धीला कशी जाणार ? तें कांहीं नाहीं. चित्ररथाला एकदम आपल्याबरोबर भूलोकीं घेऊन जावा हेंच उत्तम. ( थोडेंसें चालून ) मला वाटतं मी चित्ररथाच्या मंदिरापाशींच येऊन पोंचलों; होय, त्यांत संशय नाहीं. एरवीं हा संगीतघोष कुठचा ऐकूं येणार ? ( कान देऊन ऐकतो. ) पण मला वाटतं हा गाण्यापेक्षां रडण्याचा सूर असावा ! ( कान देऊन ) नव्हे ! हे पहा भैरवीचे सूर ! नव्हे हे तोडीचे ! अरे ! पण मध्येंच जोगीचे आलाप कसे

ऐकूं येतात ? हें काय पंचमेळ रागाचं गायन चाललं आहे कीं काय ? छेः ! पण चुकलों. हें गाणं नव्हे खास. हे गाण्याचे आलाप नसून रडण्याचे विलाप आहेत ! काय आश्चर्य पहा ! या गंधर्वांच्या घरीं रडणं सुद्धां गाण्याच्या सुरावर रडतात ! रडतांना सुद्धां कुठं बेसूर होईल किंवा ताल ढळेल तर शपथ ! इतकं गायन कसं यांच्या अंगीं आंतबाहेर अगदीं मुरून गेलं आहे ! पण आज रोजच्यासारखा दारावर पहारा कां बरं नाहीं ? चित्ररथाला यापूर्वींच धरून नेला कीं काय ? थेट अंतःपुरापर्यंत गेल्याशिवाय बातमी लागायची कठिण दिसते. (जातो.)

[ पडदा उघडतो, आंत चित्ररथ सचिंत बसला आहे. जवळ मालती उभी आहे. ]

माल०:—महाराज, आतां शोक आवरावा ! पुढच्या उद्योगाला लागलं पाहिजे ना ?

चित्र०:—मालती, आतां कसचा पुढचा उद्योग ? श्रीकृष्णानं केलेल्या प्रतिज्ञेच्या उच्चाराबरोबरच माझ्या प्राणांचं आकर्षण होण्याला सुरुवात झाली ! माझा मृत्यु मला डोळ्यांपुढं दिसूं लागला !

माल०:—पण अशी आशा सोडूं नये ! नारदमुनींनीं पुन्हा येण्याचं मजजवळ कबूल केलं होतं,ते इतक्यांत येतील ! आणि पुढची कांहीं तरी तोड सुचावितील ! (नारद प्रवेश करितो.) अगबाई ! हे पहा नारद मुनीच आले वाटतं ! [ चित्ररथ व मालती दोघेजण नारदाच्या पायां पडतात. ]

चित्र०:—मुनिराज, मी आपला शतशः सहस्रशः अपराधी आहें. क्षमा करा !

नार०:—काय चित्ररथा तूं माझा अपराधी? तूं काय केलंस बाबा माझं ?

चित्र०:—आपण माझ्यावरच्या प्राणसंकटाची वार्ता सांगायला आणि उपाय सुचवायला आलां, आणि मीं चांडाळानं तुम्हाला नाहीं-नाहीं तें बोलून तुमचा अपमान केला !

नार०:—पण हें तुला स्वतःला स्मरतं का ? कीं तूं हें दुसऱ्या कुणाच्या सांगण्यावरनं म्हणतोस ?

चित्र०—मला मालतीनं सर्व हकीकत सांगितली !

नार०:—झालं तर. अरे वेड्या! जें कृत्य तुला स्वतः केल्याचं स्मरत नाहीं, त्या कृत्यानं तूं अपराधी कसा होतोस? असली तरी तुझी जिव्हा अपराधी; मन खास नाहीं!

माल०:—पण महाराज, इकडनं गालवमुनींचा जो अपराध घडला तोहि असाच होता!

नार०:—होय मालती! पण गालवासारख्या तमोगुणी हिरवट आततायी ब्राह्मणांच्या हें कुठून लक्षांत येणार? त्यांची आणि सर्पांची जात एक! कुणाचा चुकून कां होईना त्यांच्या अंगाला नुसता स्पर्श झाला की यांनीं कडकडून दंश केलाच!

चित्र०:—पण आपण जसे इतके क्षमाशील तसे गालवमुनीहि नाहीं का होणार? समजा, मी जाऊन त्यांच्या पायां पडलों आणि न कळतां झालेल्या अपराधाची क्षमा मागितली तर ते ती देणार नाहींत काय?

माल०:—आणि इकडच्याकरितां मी सुद्धां एक वेळ सोडून शंभर वेळ पायां पडेन त्यांच्या.

नार०:—पण तुझा अपराध न कळतां झाला हें गालवाला मुळीं खरंच वाटणार नाहीं. मद्यप्राशनानं माणसाची शुद्ध खरोखर कितपत जाते हें त्याला कसं कळणार? कारण, अनुभव नाहीं! पण गालवाची क्षमा मागण्याचं राहूं दे. तें व्यर्थ आहे. मी सांगितलं त्याप्रमाणं कोणकोणत्या देवांकडं आणि माणसांकडं, चित्ररथा तूं जाऊन आलास? आधीं प्रथम ब्रह्मदेव काय म्हणाला?

चित्र०:—ते म्हणाले, श्रीकृष्णाच्या कामांत मी पडत नाहीं! मला त्याच्या धेनु लपविण्याची एक वेळ बुद्धि झाली होती. तेव्हां त्यानं मला चांगलंच प्रायश्चित्त दिलंन्!

नार०:—बरं, शंकर भोळं दैवत. ते काय म्हणाले?

चित्र०:—शंकर तर जटा आपटून उलट माझ्यावरच रागावले!

नार०:—अस्सं? देव कसचे तुला साहाय्य करतात म्हणा! जातीला जात ओळखणारच! बरं पांडवाकडं गेला होतास का?

चित्र०:—धर्मराजांना माझी किंचित् कींव आल्यासारखी दिसली.

पण भीम, नकुल आणि सहदेव या सर्वांनी मोडता घातला ! भीमसेन तर इतका क्रुद्ध झाला की, श्रीकृष्णाच्या आधीं हाच डोक्यांत गदा घालून माझा प्राण घेतो की काय असं वाटलं !

नार०:—बरं, मध्यम पांडव पार्थ ?

चित्र०:—पार्थराजाची स्वारी इंद्रप्रस्थाला नव्हती. इकडं गंगा-किनाऱ्यालाच आली आहे असं समजलं !

नार०:—अस्सं ? पण पार्थ तरी काय ? भिमाचाच भाऊ तो ! ( तोंड वाईट करून ) एकूण चित्ररथा, तुला कोणीच थारा देत नाहीं म्हणतोस ? संपला तर तुझा अवतार संपला ! ( आठवण करून ) पण इंद्राचा तूं आवडता गायक आहेस ना रे ?

माल०:—होय महाराज, देवेंद्रांचं इकडं फार प्रेम आहे !

नार०:—मग त्याच्या मध्यस्थीचा कांहीं उपयोग करून कां पहात नाहींस ?

चित्र०:—छेः ! ती आशा व्यर्थ आहे. कृष्णप्रतिज्ञेची वार्ता कळल्या-पासून देवेंद्र स्वतःच फार भ्याले आहेत ! ज्या माझ्या अनुचरांनीं यक्षद्वीपा-वर दोघां ऋषिकुमारांचा अपमान केला त्यांना पाशबद्ध करून भूलोका-कडं नुकतंच पाठावेण्यांत आलं आहे. आणि ' तूंहि जाण्याची तयारी कर' असा सेवकाहातीं मला देवेंद्रांनीं आतां इतक्यांतच निरोप पाठविला आहे!

नार०:—(दुःखाच्या आविर्भावानें) होय ना ! सगळं संपलं तर मग ?

माल०:—( रडत ) नाहीं मुनिवर्य, खचित आपण माझी निराशा करणार नाहीं ! इकडचे प्राण बचावण्याचा कांहीं तरी उपाय सांगा ! मी तुमची धर्मकन्या आहें !

नार०:—नाहीं मालती, माझाहि आतां उपाय खुंटला असंच समज ! मी तरी काय करणार ?

चित्र०:—( हताश होऊन ) मग काय देवेंद्राच्या सेवकांच्या स्वाधीन होऊं आणि द्वारकेला जाऊं ?

नार०:—हां ! तेवढं मात्र करूं नको.

चित्र०:—कां ?

नार०:—कारण, तूं होऊन कृष्णाच्या स्वाधीन झालास कीं मेलास ! मी सांगतों असं कर—

माल०:—( उत्सुकतेनें ) सांगा मुनिवर्य काय तें !

नार०:—चित्ररथा, मला तर वाटतं कीं, अशा वेळीं आत्मघात हाच तुला श्रेयस्कर आहे. कारण, कृष्णाच्या हातून मरण्यापेक्षां तूंहोऊन प्राण दिलास तर तुझी कीर्ति तरी होईल !

माल०:—(रडत) मुनिवर्य, मरणाला प्रत्यक्ष मरणाशिवाय दुसरा कांहीं तरी उपाय सांगाल असं मला वाटलं होतं कींहो ! पण माझी निराशा झाली!

नार०:—होय मालती, पण मी तरी काय करणार ? तुझ्या प्रिय-पतीचा मृत्यु कोणत्याहि उपायांनीं टळेल असं मला दिसत नाहीं. तेव्हां प्राण जायचाच तर तो कोणत्या मार्गानं जाणं अधिक इष्ट इतकंच मी पाहतों. चित्रसेना, तूं खरंच माझं ऐकशील तर असं कर !

चित्र०:—काय करूं महाराज ?

नार०:—तूं एकदम माझ्याबरोबर चल ! बरोबर आपल्या स्त्रियांनाहि घे. देवेंद्राला निरोप पाठीव कीं, मी द्वारकेला जातों म्हणून ! आणि आपण सर्व एकदम निघून गंगातीरावर जाऊं. तोंपर्यंत मला कांहीं आणखी एखादी युक्ति सुचली तर पाहतों, आणि नाहींच तर कुणाला न कळत तूं गंगातीरावर आत्मयज्ञ कर. म्हणजे श्रीकृष्णाचा आणि गालवाचा राग शांत होऊन तुला मुक्ति तरी मिळेल !

माल०:—शिव शिव ! मुनिवर्य, हेच आपल्या तोंडचे निर्वाणीचे शब्द ना! चला महाराज, मीहि आपल्याबरोबर येतें.जी आपली गत तीच माझी !

नार०:—(तोंड वाईट करून) चल चित्ररथा, दुसरा उपाय नाहीं !

[ सर्व जातात. ]

## प्रवेश ४ था

स्थळ—गंगानदीकांठचें अर्जुनाचें शिबिर

[ नारद प्रवेश करितो. ]

नार०:—मी चित्ररथाला आणि त्याच्या स्त्रीवर्गाला गंगातीरावर नेऊन रडत तर बसविलींच आहेत. चित्ररथ इंद्राच्या हातून सुटून मला मिळायचा फार कठिण होतं तें कसं तरी झालं. पण त्याहूनहि काठिण काम तें पुढंच आहे. या रात्रीच्या प्रसंगीं माझा प्रवेश द्रौपदीच्या महालापर्यंत होणार कसा ? आणि झाला तरी अर्जुनाची गांठ पडूं नये आणि द्रौपदीची तर गांठ पडावी हें घडून कसं यावं ? तिचीनि माझी जर एकस्याची गांठ न पडली तर सर्वच व्यूह ढांसळणार ! (विचार करीत इकडे तिकडे फिरतो. ) ही मध्यरात्रीची वेळ आणि मी हा अंतःपुरांत रिकामटेंकडा हात हालवीत येरझारा घालीत बसलेला कोणी पाहिला तर काय म्हणेल ? द्रौपदीच्या महालाचा नेमका मार्ग माहीत असता तर थेट तेथपर्यंत एकदम गेलों असतों, आणि दासीकडून तिला हांक मारविली असती! पण आधीं या चौकीपहाऱ्याच्या कोंड्या फोडतां फोडतांच मला पुरेवाट होईल ! बरं हांक तरी मारावी कुणाला आणि कशी ? तें कांहीं नाहीं. या वीणेचाच उपयोग केला पाहिजे या कामीं.

[ तंबोरी वाजवून भजन म्हणूं लागतो, तों आंतून दासी प्रवेश करिते. ]

दासीः—अग बाई ! या मध्यरात्रीं सामसूम झाल्यावर हा भिक्षेकरी कोण आला ?

नार०:—(गप्प बसण्याचा इशारा करून) शूः शूः मोठ्यानं बोलूं नको.

दासीः—( रागानें ) तें कां ?

नार०:—अग वेडे ! मी पार्थराजांचा गुप्त बातमीदार आहें. मला त्यांची गांठ घ्यायची आहे.

दासीः—असाल तुम्ही गुप्त बातमीदार. पण पार्थराज आज शिबिरांत नाहींत.

नार०:—(स्वगत) मग मला हवं होतं तेंच झालं नि काय ? (उघड. तोंड वाईट करून) काय म्हणतेस ? पार्थराज इथं नाहींत ? वाईट झालं ! तर मग ते कुठं गेले ?

दासी:—काल रात्रीं एकटेच श्रीकृष्णाच्या शिबिराकडं गेले ते अजून परत आले नाहींत.

नार०:—(स्वगत) फार उत्तम झालं ! (उघड) मोठीच पंचाईत झाली. तरी पण आणलेली गुप्त बातमी निदान देवी द्रौपदीला तरी मला सांगितली पाहिजे.

दासी:—पण त्यांना गाढ झोंप लागली आहे. मी नाहीं त्यांना उठवणार !

नार०:—काय तूं त्यांना उठविणार नाहींस ? आणि गुप्त बातमी त्यांच्या कानावर वेळेला न जाऊन घातपात झाले तर त्याचा दोष तूं घेशील आपल्या डोक्यावर ?

दासी:—मला काय कळतं तुमची गुप्त बातमी आणि घात कीं पात यांतलं ! राणीसाहेबांची झोंप मोडूं द्यायची नाहीं, एवढं माझं काम. त्याहून मोठा घात काय असतो, तो मला समजतच नाहीं. झोंप मोडणं हा तरी घातच कीं नाहीं ?

नार०:—बरं तूं झोंप मोडूं नको त्यांची. तें काम मी करितों, आणि त्याचा काय दोषबिष असेल तोहि घेतों मी आपल्या माथीं ! मग तर झालं ना ? मला तूं नुसतं त्यांच्या शयनगृहाच्या दरवाज्यापर्यंत घेऊन जा म्हणजे झालं ! चल हो पुढं, वेळ गमावूं नको.

दासी:—(स्वगत) काय करावं बाई ! मोठीच पंचाईत येऊन पडली ! याला बाईसाहेबांकडं न्यावा तरी कठीण, आणि न न्यावा तरी कठीण !

नार०:—अग वेडे विचार कसला करतेस ? तूं बाईसाहेबांपर्यंत मला घेऊन तरी चल, आणि मी आणलेली गुप्त बातमी त्यांच्या कानावर जाऊं दे मात्र, म्हणजे मग पहा झोंप मोडल्याबद्दल तुला शिव्या न मिळतां उलटं चांगलंसं बक्षीसच मिळेल !

दासी:—आणि असं न झालं तर ?

नार०:—तर ? तर मी आपली ही तंबोरी खालीं ठेवीन !

दासी:—(हंसून) मोठींच पैज मारिली म्हणायची ! काय म्हणे तंबोरी खालीं ठेवीन ! जगच्च बुडेल कीं नाहीं जसं कांहीं तंबोरी खालीं ठेवल्यानं !

नार०:—तुला बक्षिसाची आशा नसली तर नसूं दे. पण शिक्षेची तर भीति तुला वाटते ? हें पहा, जर मी आणलेली गुप्त बातमी बाईसाहेबांच्या कानावर लवकर गेली नाहीं आणि मागाहून ती त्यांना समजली आणि घोटाळा झाला तर मग तुला बाईसाहेब मारायला काढतील ! मग पहा आपला विचार !

दासी:—अग बाई ! असं का ? चला तर मी तुम्हाला बाईसाहेबां-पर्यंत घेऊन जातें. त्यांची झोंप मोडायचं काम मात्र तुमचं तुम्हीच करा हो !

नार०:—चल, कांहीं हरकत नाहीं. तें अवघड काम मीच करीन !

[ दासी पुढें व मागून नारद असे जातात. पडदा उघडतो व फिरून दासी व नारद प्रवेश करितात. ]

दासी:—हं ! संपली तुमची मजल इथवर ! आतां तुम्हीच मारा बाईसाहेबांना हाका !


नार०:—येवढी देवी द्रौपदी ! तिला ग्राम्य मनुष्यासारख्या मोठ-मोठ्यानं हांका कशा मारूं ? माझी वीणाच तें काम करील. देव स्वतः भक्ताकरितां लहानसहान कामें करितो; मग देवाच्या नांवालाहि तसलेंच काम करायला काय हरकत ?

[ तंबोरी वाजवून भजन करितो. कांहीं वेळानें द्रौपदी आंतून बोलते. ]

द्रौप०:—कोण आहे तें बाहेर येवढ्या रात्रीं जागं ?

दासी:—( स्वगत ) अग बाई ! बाईसाहेब झोंप मोडल्यामुळं रागा-वल्या वाटतं ! ( उघड ) बाईसाहेब, मी नाहीं अां आपली झोंप मोडली ! मी यांना म्हणतच होतें कीं, झोंप मोडूं नका म्हणून ! ( द्रौपदी बाहेर येते. )यांनींच आपली झोंप मोडली मी नको नको म्हणत असतां ! यांनींच आपणाला हांका मारल्या !

द्रौप०:—तें दुसरं कोण ? (नारदास पाहून) हें काय मुनिवर्य ? इकडं



**द्रौपदी:**—काय म्हटलंस ? यांनीं माझी झोंप मोडली ?

[ पृ० ७५.

कुणीकडं या वेळीं ? ( दासीकडे पाहून ) काय म्हटलंस, यांनीं झोंप मोडली ? मला हांक मारायचं काम जर यांच्यासारख्यांकडंच यायचं तर तुम्हाला कशाला ठेवल्या ग अवदासांनों ? आणि फिरून तोंड वर करून मला म्हणते कीं यांनींच मला हांका मारल्या म्हणून ! (दासीवर रागावून) कायग निलाजरे ! अशी मुखस्तंभासारखी काय उभी राहिलीस ? मुनिवर्यांना आसन आणून द्यायचं कळत नाहीं वाटतं ?

दासी:—चूक झाली, आणतें बाईसाहेब ! ( जातां जातां स्वगत ) अग बाई ! हा गुप्त बातमीदार ना ? मग मुनिवर्य कुठून झाला एकाएकीं?

[ जाते. ]

नार०:—द्रौपदी, हें आसनबिसन देण्याच्या भानगडींत तूं कशाला पडतेस ? मला बसायलाच काय, पण इकडं पाऊल टाकायला सुद्धां वेळ नाहीं. [ दासी प्रवेश करून आसन मांडते व जाते. ]

द्रौप०:—छे: ! आपण उभे राहिलेले मला कसं बरं पाहवेल ? आसनावर बसण्याची कृपा करावी.

नार०:—देवी, खरंच सांगतों मला बसायला अवकाश नाहीं. मी चाललों आहें गंगेवर. म्हटलं तुला कळवावं आणि तूंहि गंगेवर येतेस का विचारावं ! म्हणून इकडं वळलों.

द्रौप०:—( आश्चर्यानें ) काय गंगेवर इतक्या रात्रीं ?

नार०:—होय, तीच तर मौज आहे पर्वाची. पर्व सांगून थोडंच येत असतं. काय बेटं पद्दा मध्यरात्रींच आलं !

द्रौप०:—पण हें पर्व तरी कसलं ?

नार०:—हें एक नवीनच पर्व आहे. याचं नांव—

द्रौप०:—पण धौम्यमुनि काल सकाळीं नित्यनियमाप्रमाणं पंचांग सांगून गेले; तेव्हां त्यांनीं नाहीं कुठं सांगितलं हें पर्व !

नार०:—अग तीच तर मौज आहे. आपलीं पंचांगं आतां जुनीं झालीं आहेत. त्यांचं संशोधन करायलाच पाहिजे. पंचांगांचं संशोधन व्हायचं तेव्हां होईल, पण तुला यायचं असलं तर चल आपली माझ्याबरोबर गंगाकांठावर !

द्रौप०:—पर्वकाळ असेल चारदोन घटका. मग उगाच गडबड कशाला ?

नार०:—अग वेडी आहेस तूं ! पर्वकाळ एक घटका सुद्धां नाहीं. न सांगतां सवरतां आलेलं पर्व तें. तें का असं फार वेळ टिकतं ? मनुष्यांना जशी लहर लागते एखादे वेळीं तशीच ग्रहांनाहि लागते. काल मी सहज सूक्ष्म गणित करीत बसलों होतों ग्रहांचं. तों हें पर्व आपलं चटकन् आलं डोळ्यांपुढं.

द्रौप०:—पण हें असलं अवाचित पर्व आणणारे ग्रह तरी कोणते बाई?

नार०:—अग ग्रह आहेत नेहमींचेच. नवीन थोडेच हुडकून काढलेले आहेत मीं ! हे ग्रह जवळजवळ एकाद्या राशीच्याच फरकानं असतात. म्हटलं तर त्यांचा नेहमींचा मोठा मित्रभाव आहे. दोघेहि मिळून परक्याशीं भांडतात. पण आज या घटकेला असा कांहीं योग आहे कीं, त्यांनीं आपला मित्रभाव टाकून एकमेकांकडं शत्रुत्वानंच पहावं. अग, ग्रहमालेंत झालं तरी जिवलग मित्रांचे कट्टे शत्रु बनणं हा योग कांहीं लहानसान का मानतां येईल ? चल चल गंगेवर माझ्याबरोबर येत असलीस तर !

द्रौप०:—पण हा पापयोग आहे कीं पुण्ययोग आहे ?

नार०:—दिसायला पापयोग; कारण मित्रग्रहांचं शत्रुत्व होणार. पण परिणामीं तो पुण्ययोग आहे; कारण त्यापासून जगाचं कल्याणच होणार आहे ! द्रौपदी, ही सर्व माहिती तुला वाटेनं सांगेन. पण तूं आधीं चालायला लाग कशी !

द्रौप०:—पण अंग धुतल्यावर नेसायचीं वस्त्रं, पूजेचं साहित्य हें देऊन दासींपैकीं कुणाला तरी बरोबर घ्यायला नको का मला ?

नार०:—द्रौपदी, तुला पर्वणीचं महत्व मुळींच कळत नाहीं. काय करावं ? दासींना सांग काय हवं तें मागाहून आणायला. पण यायचं असलं तर या क्षणीं चल. नाहीं तर हा पहा मी चाललों !

[ चुटक्या वाजवितो. ]

द्रौप०:—पर्वणी आयत्या वेळीं आल्यामुळं संकल्प सांगायला घाटावर

ब्राह्मण नको का ? धौम्यमुनींना उठविलं तर ते येतील माझ्याबरोबर आत्तां इतक्यांत !

नार०:—अग मी एवढा वैदिक ब्राह्मण तुझ्याबरोबर असतांना तुला नुसता संकल्प सांगायची का अडचण पडेल ? चल चल ! सगळे संकल्प विकल्प आहेत तयार माझ्याबरोबर !

द्रौप०:- बरं, पर्वणीचं स्नान केलं आणि कांहीं दान नाहीं दिलं तर काय उपयोग ?

नार०:—त्याची कां तुला काळजी ! जो ब्राह्मण स्नानाचा संकल्प सांगेल तो दानहि घेईल ! देवी माझ्यासारखा सत्पात्र ब्राह्मण दान घ्यायला आजपर्यंत तुला खचित मिळाला नसेल !

द्रौप०:—पण नारदा, तुम्ही निरिच्छ वैराग्यसंपन्न म्हणून म्हटलं.

नार०:—मी निरिच्छ कोण म्हणतो ? देवी, तूं आज पहा तरी, तुझ्याकडून असं दान घेतों मागून कीं, आजपर्यंत कोणाहि लोभी ब्राह्मणानं तुझ्याजवळ तसलं दान मागितलं नसेल !

द्रौप०:—वाटेनं दिवा दाखवायला एखादा दास दासी तरी बरोबर घेतें.

नार०:—हवा कशाला दास आणि दासी ? हा पहा मीच उचलून घेतों तो. तूं आपली नुसती माझ्यामागून चल. द्रौपदी, पर्वकाळ चालला बरं पळापळानं !

द्रौप०:—खरंच का पर्वणी टळायची इतकी घाई आहे ? चला तर मी कांहींएक बरोबर घेत नाहीं. चला.

नार०:—( घाईनें ) मी झालं तरी मगाचपासून तेंच म्हणतों आहे. ये, अशी माझ्या मागोमाग ये. पर्वकाळ साधून स्नानदान झालं तुझ्या हातून, म्हणजे मग तुझा तुलाच किती तरी आनंद वाटेल !

[ दोघेहि जातात. ]

———

## प्रवेश पांचवा

स्थळ—गंगाकांठ–जंगलरस्ता

[ सुलोचना व सुनयना प्रवेश करितात. ]

सुलो०:—कायग सुनयने, आम्हाला भूलोकावर कशाकरितां आणणार हें तुला निघतांना माहीत होतं का ?

सुन०:—छेग बाई ! तसं असतं तर मी पाऊल तरी काढलं असतं मंदिरांतनं बाहेर ?

सुलो०:—कोण बाई मेला हा दुष्टपणा ! आम्हाला चित्ररथमहाराजां-बरोबर सती जायला आणलं ! जसं कांहीं सती जाणं म्हणजे परसांतली भाजीच असेल !

सुन०:—पण आर्धी चित्ररथ गंधर्वराज झाले म्हणून काय झालं ? आम्ही त्यांच्या लग्नाच्या बायका आहोंत कीं काय त्यांच्याबरोबर सती जायला ?

सुलो०:—आणि मालती त्यांची लग्नाची बायको असली म्हणून ती थोडीच जाणार आहे सती त्यांच्याबरोबर !

सुन०:—आणि गेली तर उपकार कुणावर ? आजवर चित्ररथमहा-राजांची मुख्य आवडती राणी म्हणून तोऱ्यानं मिरविलंन्, आणि सगळीं सुखं भोगलींन् मनासारखीं ! तेव्हां झाली का आमची आठवण ? ज्यानं सुख भोगलं त्यानंच दु:ख भोगावं ! दुसऱ्यावर काय म्हणून जुलूम ?

सुलो०:—अग काय म्हणून काय विचारतेस ? या गंधर्वराजांच्या बडेजावाकरितां ! जिवंतपणीं हे जातील तिथं यांच्या मागं आम्हा अप्स-रांचा ताफा जात नव्हता का ? तसाच हे मरतांना देखील जायला पाहिजे बरं का ? मरायचं तें सुद्धां अश्शा श्रीमंती थाटानं मेलं पाहिजे ! नाहीं तर हे श्रीमंत कसचे ? इंद्राचे लाडके असं यांना कोण म्हणेल ? जशी काय ही श्रीमंती आणि हें वैभव यांच्याबरोबरच जाणार आहे ब्रह्मलोकांत !

सुन०:—आपलं वैभव मोठं दिसावं म्हणून हे सती जायचा जुलूम

आमच्यावर पुष्कळ करतील ! पण तो आम्ही करून घ्यायला पाहिजे ना ? जिचं प्रेम असेल ती जाईल सती !

सुलो०:—अग आमचीच मुळांत चूक झाली! तुला नाहीं का माहीत? कीं चित्ररथमहाराजांचा शिरच्छेद करण्याची प्रतिज्ञा श्रीकृष्णानं केली असा जेव्हां इंद्रसभेंतून निरोप आला, तेव्हां म्हातारा प्रतिहारी सगळ्या अंतःपुरांतनं सांगत फिरला कीं, 'अप्सरांनों, ओक्साबोक्शी रडायला लागा ! '

सुन०:—तें काय म्हणून ? आमच्या रडण्यानं महाराजांचं भरण थोडंच वांचणार होतं ?

सुलो०:—त्याचं कारण असं कीं, असा हा अंतःपुरांत हलकल्लोळ माजला म्हणजे ती वार्ता इंद्रमहाराजांच्या कानावर जाईल, आणि त्यांना वाईट वाटून ते गंधर्वराजाचा प्राण वांचवायचा कांहीं तरी उपाय करतील म्हणून ! आणि मग आम्ही वेड्या आपल्या लागलों रडायला !

सुन०:—मग तूं रडत होतीस तें कांहीं खरं नव्हतं तर !

सुलो०:—छे: ! खरं कुठून येणार ? पण काय ग ? मी रडतांना डोळ्यांवर ठेवलेल्या हातांच्या बोटांतनं मधूनमधून तुझ्याकडं पहात होतें तों तूंहि रडतच होतीस असं दिसलं !

सुन०:—अग तें खोटंच तुझ्यासारखं ! तूं रडत होतीस हें बघून मीहि केलं सोंग रडण्याचं. दुसरं काय ? एक रडली आणि दुसरी गप्प बसली तर तें कसं बरं दिसेल? चित्ररथमहाराजांच्या अंतःपुरांत जन्म घालविला ! तेव्हां त्यासारखा बहाणा करायलाच पाहिजे थोडा तरी !

सुलो०:—पण रडण्याचा बहाणा कर म्हटलं तर कुणी एक वेळ करील. आम्हा अंतःपुरांतल्या अप्सरांना काय ? 'हूं' म्हटल्याबरोबर डोळ्यांतनं पसाभर पाणी काढून देऊं ! पण खऱ्या रक्ताचा एक थेंब तरी देऊं का आम्ही खुषीनं !

सुन०:—अग आम्हींचशा काय ? पण चित्ररथमहाराज झाले तरी काय ? ते देतील का अंतःपुरांतल्या एखाद्या अप्सरेचा जीव वांचविण्याकरितां आपल्या अंगांतला रक्ताचा एखादा तरी थेंब ? एवढंच काय ?

पण श्रीकृष्णानं जर असं कबूल केलंन् कीं, तुमच्याऐवजीं शंभर अप्सरांचीं शिरं कापून द्या तर तुम्हांला आम्हीं सोडतों, तर आपले प्राण वांचवायला चित्ररथमहाराजांनीं तुला मला धरून खुशाल आपलीं डोकीं मारलीं असतीं. लोकांच्या जिवावर उदार व्हायला कुणाचं काय जातं ?

सुलो०ः—बऱ्या तूं आणि मी वेळेवर सावध होऊन निघून आलों ! पण बाकीच्या आपल्या सोबतिणी अजून गंगातीरावरच आहेत त्यांचं काय ?

सुन०ः—आतां तूं त्यांची नको काळजी करीत बसूं. त्या झाल्या तरी थोड्याच सती जाणार आहेत ? राहुंदेत आपल्या मालतीबाईच्या रडण्याच्या सुराला सूर द्यायला ! आम्हां अप्सरांचं एकेरी रडणं कानाला चांगलं लागत नाहीं. मालतीबाईच्या रडण्याला पंचम मध्यम हवाच कीं नाहीं जोडीला ?

सुलो०ः—बरं काय ग, आपण निघून आलों हें कुणाला कळलं तर ?

सुन०ः—कुणाला कळणार ? अप्सरांच्या इतक्या मोठ्या गर्दींत दोन कमी काय आणि दोन जास्ती काय ? आणि त्यांतूनहि आम्ही जाग्यावर नाहीं असं कोणी पाहिलं तर म्हणेल, कीं चित्ररथमहाराजांवर आलेल्या संकटाच्या दुःखामुळें गंगेंत उड्या घालून मरून गेल्या असतील म्हणून !

सुलो०ः—( हंसून ) हें आपलं बरं ! जिवंतपणींच सती गेल्याची कीर्ति !

सुन०ः—आणि परत गेल्यावर कुणी पाहिलं तर सांगून देऊं, कीं गंगेंत उड्या घातल्यावर कुणा नागकन्यांना दया येऊन त्यांनीं आम्हाला वांचविलं म्हणून !

सुलो०ः—आणि हें सारं खरं दिसायला काय करायचं ?

सुन०ः—काय करायचं ? बायकांचं हत्यार उपसायचं—म्हणजे रडायचं!

सुलो०ः—कसं ?

सुन०ः—असं—[ उं उं उं करीत खोटें रडते व तिचें रडें पाहून सुलोचनाहि खोटें रडूं लागते. दोघीहि हंसत रडत पडद्यांत जातात. ]

---

## प्रवेश सहावा

स्थल—गंगाकांठ

[ चित्ररथ व त्याची स्त्री मालती शोक करीत येतात. त्यांच्यामागून त्यांचा एक सेवक येतो. ]

चित्र०:—प्रिये मालती, आतां शोक पुरे कर ! माझ्या अपराधाचं प्रायश्चित्त मला भोगलंच पाहिजे. पण नारदानं सांगितल्याप्रमाणं श्रीकृष्णाच्या हातून अपकीर्ति होऊन मरण्यापेक्षां स्वत: अग्निकाष्ठं भक्षण करून मेलेलं काय वाईट ?

माल०:—पण महाराज नको ! मनुष्यानं प्राणाची आशा केव्हांहि सोडूं नये ! आपणा स्वत:ला आशा नसेल, पण मला आहे. मला अजून वाटतं कीं आपले प्राण वांचण्याचा कांहीं तरी मार्ग निघेल म्हणून !

चित्र०:—मालती, तुला भ्रांति आहे ! श्रीकृष्ण असली प्रतिज्ञा सहसा करणार नाहीं. आणि त्यानं प्रतिज्ञा केली तर ती कधीं फुकट जायची नाहीं. श्रीकृष्णाला स्वर्गलोकच्या गंधर्वांपेक्षां भूलोकावरच्या ब्राह्मणांचाच पक्षपात अधिक असणार !

माल०:—पण नारदमुनींनीं आपणाला इंद्रलोक सोडून आणलं त्यांत त्यांचा असेल कांहीं तरी हेतु. मला वाटतं ते आपली सुटका करण्याची कांहीं तरी योजना करीत असतील !

चित्र०:—खरंच सांगूं का मालती ? नारदांच्या सांगण्यावरनं मी इकडे भूलोकावर एकदम निघून आलों खरा. पण हें मी दु:खाच्या भरांत भ्रमिष्टासारखं कांहीं तरी केलं आहे इतकंच ! नारद माझा बचाव करील असा मला मुळींच भरंवसा वाटत नाहीं. उलट मला इथं आणून अचुक श्रीकृष्णाच्या हातीं न देवो म्हणजे झालं !

माल०:—नको नको महाराज, त्या सत्पुरुषाची अशी निंदा आपण करूं नका. आमचा घात करून नारदांना काय लाभ ?

चित्र०:—जगांत एरवीं इतकीं भांडणं लावण्यापासून होतो तोच. ( नारदाच्या भजनाचा सूर कानावर पडतो; त्याबरोबर जीभ चावून ) अग नारदच आला वाटतं ! माझे निंदेचे शब्द त्याच्या कानावर पडले असतील काय ?

नार०:—( प्रवेश करून ) कोण ते ? चित्ररथ आणि मालती ? अरे मी तर तुमचाच शोध करीत होतों. बरं मी सांगितल्याप्रमाणं चिता पेटवून ठेवल्या आहांत ना ? आणि बाकीच्या अप्सरांचा ताफा कुठं आहे ?

माल०:—( पायां पडून ) मुनिवर्य ! झाली का हो योजना इकडचे प्राण वांचवायची ? होय म्हणा ! आश्वासन द्या, आशीर्वाद द्या, नाहींतर मी आपले पाय सोडणार नाहीं !

नारदः—मालती, मी आपणाकडून जितकं करितां येईल तितकं करून पाहिल. तुम्हीं आतां उगाच शोक करूं नका आणि आणि सांगतों इकडं लक्ष द्या. होणार त्या गोष्टी होतच असतात. त्या टाळण्याचं आपल्या हातीं थोडंच आहे ! माझ्या प्रयत्नांना यश येईल असं मला कांहीं वाटत नाहीं. कारण, ज्यांना ज्यांना म्हणून तुम्हांला पाठीशीं घालण्याविषयीं मी विनंति केली त्यांनीं त्यांनीं माझ्याकडं पाठच फिरविली ! मग मी तरी काय करणार ? चित्ररथा, तुला आतां खरोखर अग्निकाष्ठ भक्षण केल्याशिवाय गत्यन्तरच उरलं नाहीं. पण त्यांतूनहि श्रीकृष्णाच्या हातूनच तुला मरायचं असलं तर थांब, माझी कांहीं हरकत नाहीं. तूं अग्निकाष्ठ भक्षण करून मरावंस हेंच चांगलं असं मला वाटतं. पण म्हणून मी कांहीं तुला तसा आग्रह करणार नाहीं !

चित्र०:—तुह्मी आग्रह करायला कशाला पाहिजे ? माझ्या कीर्तीची अपकीर्तीची चाड मला आहे !

[ चालूं लागतो ]

नार०:—त्याविषयीं मला खात्रीच आहे. पण कुणाचं कशांत हित असेल तें मला सांगितल्याशिवाय रहावत नाहीं.

[ चित्ररथ मालतीच्या खांद्यावर मान टाकून रडत जातो. ]

नार०:—( चित्ररथाच्या सेवकाला हळूच खुणावून ) शूः इकडे ये.

( सेवक येतो ) अरे, चित्ररथमहाराजांच्याबरोबर सती जायला त्यांच्या अंत:पुरांतल्या अप्सरांचा ताफा आलेला आहे ना ?

सेव०:—होय, आला आहे.

नार०:—तो कुठं आहे.

सेव०:—तो गंगानदीच्या किनाऱ्यावरच वाळवंटांत बसला आहे ! पण—पण—

नार०:—कां, असा अडखळतोस कां !

सेव०:—पण त्या सती जाणार कीं नाहीं हें मी काय सांगूं ?

नार०:—पण त्यांच्याकरितां निदान मीं सांगितल्याप्रमाणं चिता तरी पेटवून तयार ठेविल्या आहेत कीं नाहीं ?

सेव०:—होय ! अप्सरा त्या चितांच्याच जवळ अंग शेकीत बसल्या आहेत ! आणि चितांच्या उजेडांत कुणाचा चेहरा अधिक चांगला हें ठरविताहेत !

नार०:—असं ! स्वर्गलोकापेक्षां भूलोकावर थंडी अधिक वाजते खरी. बिचाऱ्या न शेकत बसतील तर काय करतील ? पण कायरे, मला वाटतं ज्यांना शेकून थंडी भागवावी लागते त्यांना आगींत उडी घेऊन सती जायचं धैर्य कसचं होणार हें दिसतंच आहे ! पण त्या सती जावोत वा न जावोत ! तूं एक कामगिरी करशील तर सांगतों.

सेव०:—सांगा महाराज.

नार०:—या अप्सरा सती जाण्याइतक्या धीट नसल्या तरी खोटं रडण्याइतक्या मायावी तरी असतील !

सेव०:—होय महाराज ! रडायला हवं तितकं सांगा ! त्यांच्या डोळ्यांतल्या पाण्यानं समुद्र बनवून त्यांत चित्ररथमहाराजांना दडवून ठेवायचे म्हटलेत तरी तितकं पाणी त्या डोळ्यांतनं खुशाल काढतील !

नार०:—असो, हेंहि कांहीं थोडं नाहीं. येवढ्यानं सुद्धां मी असं म्हणेन कीं चित्ररथाचं जितकं प्रेम त्यांच्यावर होतं त्यापेक्षां चित्ररथावर त्यांचं अधिक आहे ! बरं, तुला चित्ररथमहाराज वांचावेसे वाटतात ना ?

सेव०:—हें काय विचारावं महाराज !

नार०:—मग मी एक काम तुला सांगतों तें मात्र बिनचूक बठवून दे. कारण, तुझ्या धन्याच्या बचावाला तें बरंच उपयोगी पडेल ! हें बघ, आत्तां इतक्यांत मी फिरून या ठिकाणीं परत येईन. तूं चित्ररथाची पाठ सोडून या अप्सरांच्या तापयाजवळ जाऊन उभा रहा. त्यांना नीट आधीं सांगून समजावून दे. आणि माझी तंबोऱ्याची तार ऐकूं आली कीं सगळ्या अप्सरा एकदम रडण्याचा आक्रोश करून आकाशापर्यंत हलकल्लोळ नेऊन पोंचवितील अशी तजवीज ठेव !

सेव०:—होय महाराज. तें काम मला सहज करतां येईल. कारण, तंबोऱ्याची तार ऐकल्याबरोबर या अप्सरांचं तोंड आपोआप उघडणारच. त्यांत त्यांना आधीं सांगून ठेवलेलं असलं तर साध्या गाण्याऐवजीं रड-गाणं गायचं इतका फरक त्यांना सहज करतां येईल ! अमुक एकाच रागांत त्यांना रडायला सांगूं कीं त्यांना सुचेल त्या ?

नार०:—राग कोणता वाटेल तो ! पण रडण्याचे आलाप इतके हृदय भेदक असावे कीं जर इथं या वेळीं एखादी परकी स्त्री चुकून आली तर तें ऐकल्याबरोबर तिचं हृदय दयेनं वितळून गेलं पाहिजे. जा; येवढं काम नीट कर. त्याचं कारण तुला आपोआप मागाहून कळेल !

[ जातो. ]

सेव०:—हा काय खरा चित्ररथवध आहे कीं हें चित्ररथवधाचं नाटक आहे ? पण श्रीकृष्ण आणि नारद असे दोघे ज्यांत पडले तें नाटक असलं तरी खऱ्या प्रकारापेक्षां अधिक चटकदार होणार ! आमच्या गंधर्व-राजांचे प्राण कदाचित् वांचतील असा रंग दिसतो. तसं असलं तर या नाटकांतली माझी भूमिका मी मोठ्या हौसेनं बजावीन !

[ जातो. ]

---

## प्रवेश सातवा

—*०*—

स्थळ—गंगातीर

[ पुढच्या बाजूस द्रौपदी स्नान करीत उभी आहे व नारद
मार्गे दूर उभा आहे.

द्रौप०:—मी स्नान करून अर्घ्यप्रदान करायलाहि तयार झालें; पण नारदमुनि कुठं दिसत नाहींसे झाले मधूनच ? आणि सगळ्या गंगेवर मी एकटीच स्नानाला हें कसं ? हें पर्व दुसऱ्या कुणालाच का कळलं नसेल ?

[ नारद प्रवेश करितो. ]

नार०:—देवी द्रौपदी, मी इतकी घाई केली त्याचं सार्थक झालं. अहाहा ! पर्वकाळ ऐन मध्यावर आला आहे. तुझं स्नान झालं असेल तर आचमन कर, मी संकल्प सांगतों.

द्रौप०:—माझं स्नान होऊन मी संकल्पाचीच वाट पहात उभी होते.

नार०:—ठीक आहे. आद्य पूर्वोच्चारित एवंगुणविशेषणविशिष्टायां शुभपुण्यतिथौ, मित्रग्रहाविग्रहसंनिपाताऽपूर्वकौतुकजन्यदारुणप्रलयनाट्यरूपिणी पर्वणि, गंगाप्रवाहे स्नानमहंकरिष्ये.

द्रौप०:—नारदा, हा संकल्प रोजचा नाहीं दिसत !

नार०:—होय देवी ! पर्व जसं अपूर्व तसाच संकल्पहि. हा संकल्प मी या पर्वाकरितां मुद्दाम बनविला आहे. बरं, स्नानानं निम्मंशिम्मं पुण्य तर पदरांत पडलंच आहे. आतां राहिलं दान. अहाहा ! असा कोण भाग्यवान् याचक असेल कीं द्रौपदी, तुझ्या हातचं दानोदक या अशा पर्वणीच्या वेळीं त्याच्या हातीं पडेल ! खरोखर या प्रसंगानं मला प्रेमाचं भरतं येऊन ईश्वरभजन करावंसं वाटूं लागलं आहे !

[ तंबोरी वाजवून भजन म्हणूं लागतो. ]

द्रौप०:—अहाहा ! किती गोड भजन ! आजचा हा पर्वणीचा समारंभ खरोखर अपूर्व आहे.

नार०:—यांत काय संशय ?

[ फिरून जोरानें तंबोरी वाजवितो व तो आवाज ऐकून अप्सरा एकदम रडण्याचा आक्रोश करून सोडतात. ]

द्रौप०:—( दचकून ) हें काय नारदा ? हा रडण्याचा आक्रोश कुणीकडून ऐकूं आला ?

नार०:—( आश्चर्य दाखवून ) अरे होय की ! पण जाऊं दे; द्रौपदी, तूं तिकडं लक्षच देऊं नकोस. अजून पर्वकाळाचे कांहीं क्षण उरले आहेत, तेवढे आपण साधून घेऊं या. हं ! आटप; तुला दान कसलं आणि कुणाला द्यावंसं वाटतं बोल, म्हणजे त्याचा संकल्प सांगतों.

[ फिरून रडण्याचा मोठा आक्रोश होतो. ]

द्रौप०:—छे: छे: ! नारदा, राहूं दे हें दान तसंच ! इतक्या आक्रोशानं रडविणारं असं कुणाला काय दुःख झालं आहे हें मला पाहिलंच पाहिजे

नार०:— भलतंच कांहींतरी ! अग हें रडणं खरींखुरीं माणसं रडताहेत हें आधीं कशावरून ? न जाणों हा नदीकांठ आहे–रात्रीची वेळ–स्मशानांतलीं भुतंबितं रडत असतील एखादीं.

द्रौप०:—नाहीं नाहीं ! नारदा, इतकी का चूक होईल ? मला माणसाचा आवाज कोणता हें का ओळखत नाहीं ?

नार०:—पण भुतं नसून खरींखुरीं माणसं असलीं म्हणून काय झालं ? आपल्या पर्वणीच्या पुण्यकृत्यांत व्यत्यय येतो ना ? हं ! कर कर दानाचा उच्चार कर ! पर्वणी पळापळानं जात चालली !

द्रौप०:—हें पहा ओंजळींतलं पाणी मीं सोडलं. पण दान काय आणि कुणाला द्यायचं याचा उच्चार करायला माझं मनंच ठिकाणावर नाहीं, त्याला मी काय करूं ? नारदा, मीं क्षत्रियांची स्त्री, त्यांतूनहि पांडवांची स्त्री आहे. दुसऱ्याचं दुःख हरण करणं याहून मोठं पुण्य मला कोणतं लाभणार ? चला नारदा चला. आपण जाऊन या दुःखी मनुष्यांचं दुःख निवारण करूं !

नार०:—पर्वकाळाचें शेवटचें क्षण अशा रीतीनं दवडणं माझ्या जिवावर आलं आहे ! पण तुझी इच्छाच असेल तर चल बापडी ! यजमानीनीच्या पुढं उपाध्याच्या इच्छेचं काय चालणार ! पण दानाचा संकल्प

मनानं करून पाणी सोडलं आहेस ना ? झालं तर–पर्वकाळीं संकल्प झाला. आतां यथावकाश दान कोणचं आणि कुणालाहि दिलं तरी तें या पर्वणीचंच दान ठरणार. चल, द्रौपदी, तुझी इच्छाच असेल तर जाऊं या !

[ नारद व द्रौपदी जातात तोंच पडदा उघडतो, आणि चित्ररथ व मालती एका चितेजवळ उभीं आहेत, पलीकडं अप्सरा रडत आरडत दुसऱ्या चितांजवळ उभ्या आहेत, असा देखावा दिसतो. ]

**चित्र०:**—सोड मालती मला सोड, मला या चितेमध्यें उडी घेऊं देच ! भवितव्यता आंतून माझे प्राण आकर्षण करूं लागल्याचा मला भास होतो. मी तिला आपला हेतू पूर्ण करण्याला मदत करणार ! मी श्रीकृष्णाच्या हातीं सांपडून त्यानं एका हातानं माझा केशकलाप धरून दुसऱ्या हातानं माझा कंठ चिरावा आणि तो तूं, या अप्सरांनीं आणि सूर्यप्रकाशामध्यें सर्व जगानं पहावा इतकी विटंबना करून घ्यायला मीं कां जगावं !

**माल०:**—नाहीं महाराज, नारदमुनि फिरून दृष्टीपडेपर्यंत मी आपणाला अग्निप्रवेश करूं देणार नाहीं. आणि करणारच तर माझ्यासकट अग्निप्रवेश करा ! [ नारद व द्रौपदी येतात. ]

**द्रौप०:**—नारदा, हा या बाजूनंच रडण्याचा आवाज ऐकूं आला नव्हे का ? ( चिता पाहून ) अगबाई आणि हें काय ? या चिता कसल्या पेटल्या आहेत इतक्या ! खरंच भुताटकी तर नव्हे ?

**नार०:**—द्रौपदी, तुला सुद्धां आतां माझ्यासारखंच वाटूं लागलं ना ! मात्र मगाशीं मीं होऊन भुताटकीची कल्पना केली तेव्हां मला मोडून काढलंस, आणि आपलं पर्वणीच्या स्नानदानाचं कृत्य सांग करायचं सोडून मला इकडं घेऊन आलीस, याला काय म्हणावं ?

**द्रौप०:**—छेः ! पण भुताटकी कुठून येईल ? हीं पहा माणसांसारखीं माणसं माझ्या डोळ्यासमोर उभीं असतांना मला भुताटकीचा भ्रम तरी कसा झाला ?

**नार०:**—वः ! भुताटकींत हीच तर मोठी गंमत असते. असतात भुतंच पण दिसतात थेट माणसासारखीं !

चित्र०:—तें कांहीं नाहीं ! हा पहा मी अग्निप्रवेश करणारच !

माल०:—थांबा महाराज, क्षणभर थांबा ! एका क्षणाकरितां माझं सौभाग्याचं ऐश्वर्य माझ्या हातून घालवूं नका ! आपण दोघंहि चितेंत प्रवेश करूं. पण मी आधीं आणि मग आपण ! ( ती पदर बांधून चित्ररथासमोर येऊन त्याला नमस्कार करिते. ) देवा ! पति हेंच माझं दैवत. त्याला मीं नमस्कार केला तोच तुला पोंचेल.महाराज,आपण मला जन्मभर सौख्यच दिलत, माझ्या हातून जर एखादा अपराध कळत किंवा न कळत घडला असला तर आपण मला त्याची क्षमा कराल ना ? पण करालच. आपण तसेच दयाळू आहां ! ठीक आहे. ही मी चाललें ! ब्रह्मलोकच्या द्वारापर्यंतचा आपला अग्निमार्ग आपल्याला आवडत्या अशा या केशकलापानं झाडून निर्मळ करण्याकरितां !—

[ उडी घेणार तोंच द्रौपदी पुढें होऊन तिचा हात धरते. चित्ररथ पडद्यांत जातो, नारद दूरच उभा राहतो.]

द्रौप०:—बाई कोण तूं ! आणि असा हा अग्निप्रवेश कां करतेस ? मागं फिर, तुझ्या संकटाचं निवारण मला कांहीं करतां आलें तर पाहीन !

माल०:—( तोंड न फिरवितां ) कोण तें ? महाराज कां बरं आपण माझा हात धरतां ? आपणांपूर्वी अग्निप्रवेश करण्याची माझी प्रतिज्ञा मी पार पाडणार !

द्रौप०:—पण बाई तूं अग्निप्रवेश कां करितेस ? मागं तोंड वळवून माझ्याशीं दोन शब्द बोल आणि मग तुला काय करायचं तें कर ! मी तुझ्या मार्गांत आड येऊं इच्छित नाहीं.

[ नारद पुढें येऊन चित्ररथाला हातानं धरून बाजूला घेऊन जातो व त्याच्याशीं कुजबुजतो. ]

माल०:—( मागं तोंड फिरवून ) बाई कोण तुम्ही ? उगाच कां माझ्या दुःखानं तुम्ही दुःखी होतां ?

द्रौप०:—उगीच काय म्हणून ? तुमचं संकट निवारण करावं असं माझ्या मनांत आहे. नीट मन मोकळं करून सांगा.

माल०:—मला स्त्रीला दुःखी पाहून तुम्ही स्त्री असल्यानं तुमचं मन

कळवळलं खरं. पण माझ्या दुःखाचा परिहार तुमच्यासारखी यःकश्चित स्त्री कशी करणार ? बाई, तुमचे माझ्यावर उपकार झाले. जा तुम्ही आपल्या वाटेनं.

द्रौप०:—बाई, मी यःकश्चित स्त्री नाहीं. मी क्षत्रियवीराची पत्नी आहे. मी हातांत धनुष्यबाण घेत नाहीं. पण माझं मन माझ्या पतीप्रमाणंच न्यायनिष्ठुर आहे. कुणाला विनाकारण अन्यायानं दुःख होत असेल तर तें मला पहावत नाहीं.

माल०:—बाई, न्याय आणि अन्याय कुठं असेल तो जगांत हुडका जा. मला त्याचं कांहीं कळत नाहीं. माझं सौभाग्य नष्ट व्हायची वेळ आली इतकं मात्र मला दिसतं. पण तें माझ्या डोळ्यांदेखत मी नष्ट होऊं देणार नाहीं. म्हणूनच मी आपल्या पतीच्या आधीं अग्निप्रवेश करतें आहें. सोडा मला !

द्रौप०:—बरं बाई न्याय आणि अन्याय राहूं दे. पण शरणागताचं रक्षण करणं हें आम्हां क्षत्रियांचं काम आहे, हें तरी तुला ठाऊक आहे ना ! सांग तुझ्या सौभाग्यावर घाला कोण घालूं पहातं तें. मी त्याचं रक्षण करितें बरं !

माल०:—बाई, तुम्ही क्षत्रियवीराची पत्नी असाल; पण क्षत्रियवीरांच्या मनांत जरी शरणागताचं रक्षण करण्याचं आलं तरी तें प्रत्यक्ष घडवून आणण्याइतकं त्यांच्या अंगांत सामर्थ्य पाहिजे. प्राणाची याचना झाली तरी ती भलत्यापुढं करण्यांत काय अर्थ ? कार्य न होतांना याचकाचं दैन्य मात्र दिसतं. बाई सोडा मला !

द्रौप०:—तुमची शंका बरोबर आहे. पण माझ्या पतीचं नांव तुम्हांला कळलं म्हणजे मग तुम्ही असे शंकेचे आणि निराशेचे उद्गार खचित काढणार नाहीं ! नारदा, या इकडं आणि सांगा यांना मी कुणाची कोण तें !

नार०:—( द्रौपदीस हळूच ) तुला काय पडली ही नसती उठाठेव ? ( मालतीस ) बाई, त्रिभुवनविख्यात क्षात्रकुलावतंस वीरश्रेष्ठ जो अर्जुन त्याची ही पत्नी, इचं नांव द्रौपदी.

माल०:—कोण ? देवी द्रौपदी–सती द्रौपदी !

[ मालती द्रौपदींचे पाय घट्ट धरते. ]

द्रौप०:...बाई, उठा, माझे पाय कां धरतां ! मी तुमच्यासारखीच एक स्त्री आहें.

माल०:—नाहीं ! मला अभयदान दिल्याशिवाय–मला सौभाग्याचा आशीर्वाद दिल्याशिवाय–मी तुमचे पाय सोडायची नाहीं ! माझ्या पतींचे प्राण वांचवायला मला आतां त्रैलोक्यचिंतामणीची मात्राच मिळाली !

द्रौप०:—एवढंच ना ? हें घ्या मी तुम्हांला अभय दिलं. तुम्ही सौभाग्यवती व्हा ! हा पहा मी आशीर्वाद दिला.

नार०:—(घाईघाईनें) हं हं द्रौपदी, ही अशी घाई काय उपयोगी ? मनांत सुबुद्धि असली तरी आजूबाजूच्या सर्व गोष्टी नीट पहाव्या लागतात !

द्रौप०:—आजूबाजूच्या गोष्टी त्या काय पहायच्या ?

नार०:—म्हणजे आपण अभय देतों खरं, पण भय कुणापासून हें आधीं पहायला नको का ?

द्रौप०:—त्यांत काय पहायचं आहे ? बाई हें पहा तुम्हांला अभय दिलं. उठा आतां ! काय ? अजूनहि तुमची खात्री होत नाहीं ? नारदा, तुम्हीच साक्ष या अभयदानाला !

नार०:—म्हणजे मगाशीं गंगाप्रवाहांत उभी राहून तूं उदक सोडून ठेवलंस तेंच हें दान असं समजायचं ना ? ( द्रौपदी मानेनें हुंकार देते. ) मग ठीक आहे. आहे माझी साक्ष त्याला पुरी. कारण, दानाचा संकल्प मीच सांगितला आहे ! [ मालती द्रौपतीचे पाय सोडून उभी राहते. ]

द्रौप०:—बाई, तुमचे पति कुठं आहेत ?

नार०:—( चित्ररथास खुणावतों. ) तो लांब पलीकडं उभा राहिलेला गृहस्थ हाच या बाईचा पति असावा असं वाटतं !

माल०:—देवी, आपले आम्हां उभयतांवर फार उपकार झाले.

द्रौप०:—बाई त्या पलीकडच्या चितांजवळ ज्या बायका रडत होत्या त्या कुणाकरितां रडत होत्या ?

माल०:—त्याहि आमच्याच दुःखभागी आहेत.

द्रौप०:—मग बरंच झालं. त्यांचंहि आतां सांत्वन होईल ! बरं पण आपल्या प्राणांवर कोण उठलं आहे हें नाहीं अजून सांगितलंत !

नार०:—पहा ! द्रौपदी, जी गोष्ट आधीं विचारायची तीच तूं मागाहून विचारतेस !

द्रौप०:—आधीं काय आणि मागाहून काय ? मागाहून विचारली म्हणून यांना मी दिलेल्या आश्वासनांत थोडाच फरक पडणार आहे ! प्राणदान दिलं तें दिलं !

माल०:—आमच्या हातून गालवमुनींचा अपराध झाला. म्हणून इकडचा शिरच्छेद करायची प्रतिज्ञा केली आहे.

द्रौप०:—पण ती कुणी ?

माल०:—श्रीकृष्णानं !

नार०:—नारायण ! नारायण ! द्रौपदी, तरी मी सांगत होतों कीं, दान देण्याच्या पूर्वी विचार कर म्हणून ! ( मालती नारदाकडे भीतीनं पाहते. ) तसं नाहीं, दान दिलस तें चांगलंच झालं. कारण, त्यामुळं चित्ररथ आणि मालती आतां निश्चित होतील. पण प्रत्यक्ष श्रीकृष्णापासूनच याच्या जिवाला भय होतं असं आधीं कळलं असतं म्हणजे—जरा आपलं हें--

द्रौप०:—नारदा, तें काय म्हणून ? यांना मारण्याची प्रतिज्ञा श्रीकृष्णाची आहे असं मला आधीं कळतं तर मी प्राणदान दिलं नसतं असं का तुम्हांला वाटतं ? छे: ! तसं मुळींच नाहीं. या घातक प्रतिज्ञेशीं श्रीकृष्णाचा संबंध आहे असं जर मला दान देण्यापूर्वी कळतं तर मी तें आणखी अधिक खात्रीनं आणि हौसेनं दिलं असतं. बहिणीची भीड भाऊ न मानील तर दुसरा कोण मानणार ?

नार०:—छे: छे: ! तसं कसं न होईल ? आणि म्हणूनच झालं तरी मी तुझ्या दानाचा साक्षीदार झालों. पण द्रौपदी, एक गोष्ट तुला सांगायची राहिली आहे !

द्रौप०:—ती कोणती ? पण ( मालतीस ) बाई, तुम्हीं आधीं जा आणि आपल्या पतीचं समाधान करा पाहूं ! [ मालती जाते. ]

नार०:—ती गोष्ट ही कीं, चित्ररथानं अग्निकाष्ठ भक्षण करण्याचा

निश्चय करण्यापूर्वी ब्रह्मा शंकर इत्यादि देवांची विनवणी केली होती. फार काय धर्मादि सर्व पांडवांनाहि त्यानं पाठीशीं घालण्याला विनविलं होतं. पण एकानंहि त्याला थारा दिला नाहीं. उलट भीमसेन तर त्याला मारायलाच धांवला म्हणे !

द्रौप०:—( आश्चर्ययुक्त चिंतेनं ) खरंच कीं काय ? बरं आमच्या इकडेहि हे गेले होते कीं काय ती विनंति करायला ?

नार०:—नाहीं, द्रौपदी, तेवढी गोष्ट मात्र सुदैवानं घडून आलेली नाहीं !

द्रौप०:—(सुस्कारा टाकून) आतां मात्र माझ्या जिवांत जीव आला !

नार०:—द्रौपदी, तुझी चिंता बरोबर होती. पण चित्ररथाचे प्राण वांचायचे तर एकच उपाय दिसतो.

द्रौप०:—तो कोणता ?

नार०:—तो असा कीं, तूं जसं याला अभयदान व प्राणदान दिलंस तसंच अर्जुनानंहि द्यायला पाहिजे. म्हणजे तुझं दान सिद्धीला जायला दुजोरा मिळेल.

द्रौप०:—होय नारदा, तोच विचार माझ्याहि पण मनांत आला होता.

नार०:—आणखी दुसरं असं व्हायला पाहिजे कीं, अर्जुनाची प्रतिज्ञा होईपर्यंत चित्ररथ दुसऱ्या कुणाच्या हातीं लागतां कामा नये ! नाहीं तर ते त्याचा शिरच्छेद करूनच मोकळे व्हायचे !

द्रौप०:—तसं होऊं दिलं तर माझी प्रतिज्ञा ती कसली ? मी जातांना चित्ररथ आणि त्याची स्त्री यांना आपल्याबरोबर घेऊनच शिबिराला जातें. आणि तिकडनं प्रतिज्ञा करून मला वचन मिळेपर्यंत मी त्यांना माझ्या अंतःपुरांतून बाहेरच काढीत नाहीं म्हणजे झालं !

नार०:—शाबास ! द्रौपदी, ही युक्ति तूं अगदीं बरोबर काढलीस.

द्रौप०:—पण नारदा, फिरून फिरून माझं मन साशंक होतं. तिकडनं वचन घ्यायच्या कामीं तुमची मात्र मला मदत पाहिजे !

नार०:—वः ! द्रौपदी, हें काय सांगायला का हवं ? फार काय पण तुझ्यापेक्षां हें काम माझंच आहे असं समजून मी तुला सहाय्य करीन. मी साहाय्य कसं करतों तें पहा तरी ! [ चित्ररथ व मालती येतात. ]

**चित्र०**:—( द्रौपदीच्या पायां पडून ) हा अपराधी गंधर्व आपल्याला शरण आहे.

**द्रौप०**:—गंधर्वराज, तुम्ही असे घाबरूं नका. ही तुमची स्त्री माझी धर्मभगिनी आहे. तिचा घात मी होऊं द्यायची नाहीं !

**माल०**:—आपले आमच्यावर फार उपकार झाले.

**द्रौप०**:—माझं दान खरं ठरून परवांचा दिवस उजाडला म्हणजे हे तुमचे शब्द माझ्या कानाला ऐकूं येतील !

**नार०**:—द्रौपदी, तूं मनावर घेतल्यावर काय नाहीं होणार ? बरं पण चला. एकदम आपण शिबिराला जाऊं. [ चालूं लागतो. ]

**द्रौप०**:—या माझ्यामागून तुम्ही दोघंहि.

[ सर्व जातात. ]

---

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

स्थळ—गंगानदीकांठचें अर्जुनाचें शिबिर

[ अर्जुन व सात्यकी प्रवेश करितात. ]

अर्जु॰:—काय म्हटलंत सात्यके, द्रौपदीची प्रकृति एकाएकीं बरीच बिघडली म्हणून ?

सात्य॰:—होय महाराज. पहाटेच मला हाका मारण्याला दूत आला. आणि जाऊन पहातों तों बाईसाहेब अगदीं घाबऱ्याघुबऱ्या होऊन नुसत्या लोळताहेत !

अर्जु॰:—पण असं एकाएकीं होण्याचं कांहीं कारण ?

सात्य॰:—कारण कांहींच सांगतां येत नाहीं. राजवैद्याचं म्हणणं कीं, शरीररोग कांहीं असेल असं वाटत नाहीं; नाडी उत्कृष्ट चालते आहे. राजपंचाक्षरी म्हणतो कीं, मी सर्व मंत्र करून पाहिले ते फुकट गेले; यावरून भूतपिचबाधा नसावी. आणि राजज्योतिषी म्हणतो कीं, आजच्यासारखे उत्तम ग्रह बाईसाहेबांना आज साऱ्या जन्मांत कधीं आलेले नव्हते!

अर्जु॰:—आणि असं असून तिला व्यथा मात्र मनस्वी होत आहे ?

सात्य॰:—होय महाराज. तें दुःख मलासुद्धां पहावेना. शिवाय बाईसाहेबांनीं आपली वरचेवर आठवण काढली तेव्हां धाडला दूत तावडतोब महाराजांकडं शोधायला !

अर्जु॰:—मी मगाशींच शिबिराला परत यायचा. पण शिकारीच्या नादानं उगीच मौजेनं हिंडत होतों इकडं तिकडं झालं! असो चला; श्रीकृष्णाकडं हिच्या प्रकृतीबद्दलचा निरोप कांहीं पाठविला होता कीं नाहीं ?

सात्य०:—नाहीं. महाराजांनीं एक वेळ प्रकृति समक्ष पाहिल्यावर मग आज्ञा होईल त्याप्रमाणं करीन.

अर्जु०:—चला तर एकदम अंत:पुरांतच जाऊं. सात्यके, श्रीकृष्णाकडं एकदम निरोप पाठवा.

[ जातात. पडदा उचलतो. आंत द्रौपदी मंचकावर पडलेली दिसते. ]

अर्जु०:—( दासीस ) काय ग प्रकृति कशी काय आहे ?

दासी:—बाईसाहेब आमच्याशीं बोलतच नाहींत. नुसती महाराजांची आठवण काढतात.

अर्जु०—ठीक आहे; जा तूं. [ दासी जाते. ]

सात्य०:—मीहि जातों. कारण लागलं तर येतोंच आहे ताबडतोब.

अर्जु०—( द्रौपदीच्या जवळ बसून ) देवी द्रौपदी, ही काय तुझी अवस्था झाली अशी एकाएकीं ?

द्रौप०:—( अर्जुनाकडे पाहून ) कोण तें ? महाराज ? आपण इतका वेळ कुठं होता ?

अर्जु०:–रात्रीच्या शिकारीहून श्रीकृष्णाबरोबर मी परत आलों; श्रीकृष्ण आपल्या शिबिराकडे वळले; मी इकडं निघालों; येतांना गंगानदीकांठची शोभा पहात थोडा बसलों होतों झालं. पण तुझी प्रकृति बिघडल्याचं मला आधीं कळतं तर याहून आधींच आलों असतों. देवी, तुला काय होतं ?

द्रौप०:—मला काय होतं हें मला सांगतांच येत नाहीं.

अर्जु०:—बरं पण काय केल्यानं तुला बरं वाटेल ?

द्रौप०:—तें मी सांगेन. पण महाराज, मी सांगेन तें आपण करालच अशाबद्दल मला आधीं आपण वचन दिलं पाहिजे !

अर्जु०:—(आश्चर्यानें) काय वचन? हें आज नवीन काय काढलंस ?

द्रौप०:—प्रसंगाप्रमाणं नवीन गोष्टीहि कराव्या लागतात ! मला आज वचनच पाहिजे आहे !

अर्जु०:—तुझ्या या बोलण्यावरून मी वचन द्यावं कीं नाहीं याचा निर्णयच मला करितां येत नाहीं.देवी,तूं माझ्या नुसत्या शब्दावर अविश्वास दाखविलास याबद्दल मला वाईट वाटत नाहीं. पण ज्या अर्थी तूं

वचनच मागतेस, त्या अर्थी तूं मागणार तें वचन फारच धोक्याचं असावं असं मला वाटतं !

द्रौप०:—ठीक आहे. आपणाला वचन द्यायचं नसेल तर देऊं नये. माझीच काय अवस्था व्हायची असेल ती होईल.

[ दुसऱ्या बाजूस तोंड फिरविते. ]

अर्जु०:—देवी, नको असं दुःख करूं नको, आणि मलाहि दुःखी करूं नको. असं कोणचं साहस या जगांत करण्यासारखं आहे, कीं हा तें तुझ्याकरितां करणार नाहीं ?

द्रौप०:—महाराज, हें अक्षरशः खरं आहे ! मला माहीत का नाही?

अर्जु०:—पण न कळत दिलेल्या वचनाचे परिणाम एखादे वेळीं भलतेच होतात. म्हणून तुझ्या आणि माझ्या दोघांच्याहि हिताकडं पाहूनें मी किंचित् मागें घेतों, दुसरं काय ?

द्रौप०:—महाराज, हीं दोन हितं कधींपासून वेगवेगळीं झालीं ?

अर्जु०:—माझ्या बोलण्याचा विपर्यास कां करितेस ? तुझं आणि माझं हित एकच असल्यामुळं अविचारी वचनापासून धोका आला तर त्याचा आघात आपल्या उभयतांवर दुप्पट होणार नाहीं काय ?

द्रौप०:—पण महाराज, आपलं आणि माझं हित जसं एकच, तसाच माझ्या वचनाचा जो खरेखोटेपणा तोच आपलाहि नव्हे का ?

अर्जु०:—होय, द्रौपदी, यांत संशय कसला ?

द्रौप०:—हें खरं, तर मी जर एखाद्या गोष्टींत कोणा एखाद्याला वचनबद्ध झालें असलें तर आपणहि त्याला बांधले गेलां आहां हें खरं नाहीं काय ?

अर्जु०:—होय. हेंहि मी कबूल करतों.

द्रौप०:—तर मग महाराज, आपणाला मी मागतें तें वचन दिलंच पाहिजे !

अर्जु०:—ठीक आहे. हें घे वचन तुला दिलं. बोल आतां, मन मोकळं करून बोल.

द्रौप०:—( उठून बसते ) महाराज, आतां मात्र माझ्या जिवांत जीव

आला. आज मी गंगेवर स्नानाला गेलें असतां कोणा एका मनुष्याची स्त्री आपला नवरा निश्चित मरणार असं वाटून अग्निप्रवेश करून मरण्याला सिद्ध झाली होती. तेव्हां तिची दया येऊन मी तिला अभयदान दिलं !

अर्जु०:—इतकंच ना ? मग हें काम तर तूं उत्तम केलंस. तुझ्या जागीं जर मी असतों तर मीहि तेंच केलं असतं. आपणा क्षत्रियांचा हा धर्मच नव्हे काय ? मग मी तुझं वचन खरं करायला तुला मदत केली नसती अशी शंका तरी तुला कां आली ?

द्रौप०:—( आनंदानें ) मग मी हें वचन पक्कं समजूं ना ? माझं पर्वाचं दान आतां मात्र सुफल झालं ! महाराज, मी जातें तर !

अर्जु०:—( आश्चर्यानें ) अशी एकदम कुठं चाललीस ?

द्रौप०:—आपल्या वचनामुळं ज्यांचे प्राण वांचले त्या नवराबायकोचं समाधान करायला.

अर्जु०:—आणि श्रीकृष्ण तुझ्या समाचाराला इतक्यांत आला तर ?

द्रौप०:—फारच चांगलं ! श्रीकृष्णाला तिष्ठत बसावं लागणार नाहीं. मी इतक्यांत आलेंच म्हणून सांगावं. श्रीकृष्णाकडं माझं कामच आहे.

[ द्रौपदी जाते. ]

अर्जु०:—हा काय प्रकार आहे कांहीं कळत नाहीं. नुसतं एखाद्याला प्राणदान दिल्याची या वीरपत्नी द्रौपदीला चिंता कां वाटावी ? पण खचित तिनं आपलं मन मोकळं करून मला सर्व हकीगत सांगितली नाहीं हें उघड दिसतं. तथापि तिचा तरी काय अपराध ? ती वीरपत्नी झाली तरी बोलूनचालून स्त्री-परावलंबी ! पुरुषांच्या तोंडून स्त्रीची चिंता दूर होण्याचे प्रतिज्ञाशब्द निघेपर्यंत त्यांना कसं होतं काय होतं याची काळजी वाटावी हें स्वाभाविक आहे. [ श्रीकृष्ण व सत्यभामा येतात. ]

कृष्णः—पार्था, द्रौपदीची प्रकृति एकाएकीं फार बिघडली असं मला सात्यकीनं कळविलं. तूं पूर्वींच कां नाहीं निरोप पाठविलास ? मी मगाशींच आलों असतों.

अर्जु०:—प्रकृति बिघडली खरी; पण लवकरच नीट झाली म्हणून कळविलं नाहीं.

कृष्णः--पण प्रकृति अशी बिघडायला एकाएकीं कारण काय झालं ? द्रौपदीची प्रकृति एकदम बिघडण्याइतकी कांहीं नाजूक नाहीं !

अर्जु०:--( हंसत ) नाजुकपणा मूळचाच कमी ! त्यांतून बारा वर्षें आमच्याबरोबर वनवासांत घालविलीं त्यामुळं असेल नसेल तोहि नाजुकपणा निघून गेलेला आहे ! पण देवा, ज्या कारणांनीं शरीरप्रकृति टणक झाली त्याच कारणांनीं मनःप्रकृति नाजुक झाली असं मला वाटतं.

कृष्णः--अस्सं ! हें काय आपल्याला माहीत ? द्रौपदीताईच्या मनाची प्रकृति बिघडली असली तर मग माझ्या लवकर येण्याचा काय उपयोग झाला असता म्हणा ! पण म्हटलं आपले उगीच एकाला दोन ! बरं आतां प्रकृति बरी सुधारली ना चांगली ?

अर्जु०:-- हो, तूर्त तर सुधारली आहे खरी ! पण देवा, प्रकृतीनं मुदत मागून घेतली आहे.

कृष्णः--वः ! प्रकृति मोठी चाणाक्ष स्वार्थसाधु दिसते रे ! तिच्यांत प्रांजलपणा जरा कमी आहे. असो. प्रकृति सुधारली असली म्हणजे झालं. कां आणि कशी बिघडली याची चौकशी आपल्याला कशाला रिकामी ?

अर्जु०:--तें कां ? देवा, आपण चौकशी केली नाहीं आपल्या बहिणीच्या प्रकृतीची,तरी ती बातमी आपणांपर्यंत आल्याशिवाय रहायची नाहीं पुढंमागं ! मग तरी त्यांत आपणाला लक्ष घालावंच लागेल ! कारण, प्रकृतीनं मुदत मागून घेतली आहे ती देवा आपल्या भरंवशावर.

कृष्णः--ठीक आहे. माझ्यावर खऱ्या मनानं कुणी भरंवसा टाकला तर मी तो कधींहि निष्फळ करीत नसतों.

[ नारद प्रवेश करितो. ]

नार०:-- होय, आतां तें पहायचंच आहे.घोडामैदान कांहीं दूर नाहीं.

कृष्णः--( हंसून ) हां ! आपली स्वारी आहेच तयार आमची गंमत पहायला ?

नार०:-- होय; देवा, तुम्ही गंमत करायला तयार झालां तर ती कोणी पहायला पाहिजेच कीं नाहीं ? नाहीं तर काय उपयोग ? कृष्णलीलेचं नाटक नटांच्या कुशलतेपेक्षां प्रेक्षकांच्या मार्मिकपणानंच आजवर

अधिक रंगलं आहे ! माझ्यासारख्या प्रेमळ भक्ताचा आनंद हाच, श्रीकृष्णा, तुमच्या नाट्यव्यवसायाचा हेतु! दुसरा कोणता ?

कृष्णः—पार्था, द्रौपदीच्या मनोव्यथेचं कारण मी समजलों ! मी उदासपणानं वनदेवीचा उत्सवसमारंभ कांहीं वेळ बंद केला हेंच की नाहीं ? पण क्षणभर उदासपणा आला होता खरा कांहीं अतर्कित अशा कारणामुळं; आतां तो संपला. चला, बोला आज वनविहार कोणत्या प्रकारचा करायचा ? यमुनानदींत नावा घालून खेळायचा खेळ मी आयत्या वेळीं रहित केला तोच हवा तर आज खेळूं.

अर्जु०:—पण देवा, तुमच्या मनाला उदासपणा कशानं आला होता सांगा ना ? हें कळलं म्हणजे तो खरोखर कितपत निघून गेला आहे याचा तर्क करितां येईल !

नार०:—अर्जुना, दुसऱ्याच्या गुप्त गोष्टी विचारीत बसण्याची भारी वाईट खोड तुला दिसते !

अर्जु०:—मनुष्यानं आपण होऊन आढी काढून टाकून मन मोकळं केलं म्हणजे कोण विचारीत बसेल असल्या गोष्टी ?

नार०:— ही गोष्ट मनुष्यांना लागू असेल. पण देवांना—

अर्जु०:—देवांना तर ती मनुष्यांपेक्षां अधिकच लागू असली पाहिजे! कारण, तिथं आंत-बाहेर असण्याचं कारणच नाहीं.

कृष्णः—अर्जुना, माझ्या उदासपणाचं कारण मी तुला सांगूं ? म्हणजे मग तुम्हां सर्वांच्या मनांतला संशय जाईल ? आणि तुम्हीं मोकळ्या मनानं देवी कनकश्रीच्या समारंभांत आनंदोत्सव कराल ?

सत्य०:—बरं झालं बाई ! भावोजींनीं हा विषय काढला. काल जेव्हां इकडून सगळा उत्सवसमारंभ बंद करण्याची निक्षून आज्ञा झाली त्या वेळीं असं कां ? असं कां? काय झालं ? असं मला कित्ती कित्ती वेळां राहून राहून विचारावंसं वाटलं; पण बाई माझी छातीच होईना !

नार०:—तर तर, कृष्णाला बोलायला लावायचं देवी सत्यभामेला माहीतच नसेल जसं कांहीं ! आपल्या पायावर कृष्णाला लोळवून नाक घासायला लावून नाकदुऱ्या काढवून घेण्याच्या तेवढ्या माहीत आहेत.

कृष्णः—माझ्या उदासपणाचं कारण असं कीं, वनविहार करण्याला आपण आलों त्या दिवशींच गंगातीरवासी ऋषींना त्रास पोंचल्यामुळं एका अपराध्याला देहान्त प्रायश्चित्त देण्याची मला प्रतिज्ञा करावी लागली. अर्जुना, तूंच सांग बरं अशा गोष्टीनं मन उदास व्हावं कीं नाहीं तें !

अर्जु०:—यांत काय संशय ? पण देवा, दैवाची लीला कांहीं विचित्र दिसते. कारण, आपल्या वनविहाराच्या पहिल्याच दिवशीं एक प्राण घेण्याची तुम्हांला प्रतिज्ञा करावी लागली, तर दुसऱ्याच दिवशीं एक प्राण वांचविण्याची प्रतिज्ञा मला करावी लागली !

नार०:—असो. फिटांफिट झाली ! श्रीकृष्ण एक प्राण घेणार आणि अर्जुन एक प्राण वांचविणार ! दोघांचेहि हेतु मोठे स्तुत्य आहेत. म्हणून दोघांनाहि परस्परांची प्रतिज्ञा शेवटाला जावी अशीच इच्छा असणार ! मला वाटतं आपण आतां देवी कनकश्रीला निरोप पाठवून कळवूं कीं, तुझ्या समारंभावर आलेलं संकट टळलं, तेव्हां समारंभ पूर्वीहून दुप्पट उत्साहानं साजरा करण्याची तूं तयारी कर !

कृष्णः—पार्था, सांग बरं तूंच, ऋषींना त्रास देणं हा केवढा अपराध ! आणि त्यांना हा त्रास इतका झाला कीं, नेहमीं दया क्षमा शांति धारण करणारे ऋषी, पण तेहि रागानं लाल होऊन माझ्याकडे तक्रार करीत आले. त्यांनीं स्वतःच त्यांच्या अपराध्याला शाप दिला असता तरी काय हरकत होती ? एवढंच काय पण आम्ही क्षत्रियांनीं त्यांचं रक्षण अशा उन्मत्त अपराध्यांपासून पूर्वींच करायचं तें न करतां आपल्या कामांत दुर्लक्ष केल्याबद्दल त्यांनीं मलाहि शाप दिला असता तरी तें योग्यच झालं असतं. पण आपला सगळा राग आवरून ते माझ्याकडे आले. पार्था, तुला खरंच सांगतों तेव्हां मला अगदीं लाजल्यासारखं झालं! म्हणून अपराध्याला शासन करण्याची मी प्रतिज्ञा केली हें योग्यच केलं कीं नाहीं सांग बरं ?

अर्जु०:—यांत काय संशय ? देवा, आपण केलं तेंच यथायोग्य केलं!

ऋषींच्या जपातपांचं आणि अनुष्ठानादिकांचं आम्हां क्षत्रियांकडून जितकं रक्षण व्हावं तिकतं होत नाहीं हेंच खरं.

नार०:—पण अर्जुना, पहा काय गंमत आहे ती ! एखाद्याचा प्राण घेणं हें जसं एखाद्याचं कर्तव्य होऊं शकतं, तसंच एखाद्याचा प्राण वांचविणं हेंहि दुसऱ्या एखाद्याचं कर्तव्य होऊं शकतं ! तुझीच हकीकत सांगना श्रीकृष्णाला !

अर्जु०:—नाहीं, हकीकत अशी कांहीं विशेष नाहीं.पण एखादी स्त्री, आपला नवरा मरणार या भीतीनं आधीं उगीच आगींत उडी घेण्याला तयार झाली तर तिला आश्वासन देऊन, बाई, तुझा नवरा शक्य तर वांचवीन, अशी तिची समजूत घालणं हें, देवा, तुम्हीच सांगा बरं बरोबर होईल कीं नाहीं ?

नार०:—इतकंच काय पण मला वाटतं कीं, अशा नुसत्या सांगण्यानं जर तिची समजूत पडण्यासारखी नसली तर तिला वचनहि द्यावं लागेल ! आणि वचनाची खात्री पटण्याकरितां प्रतिज्ञाहि करावी लागेल !

कृष्णः— होय, मलाहि असंच वाटतं. जिवंत आहे तोंपर्यंत कुणालाहि कुणी वांचवील. मेल्यावर थोडंच कुणी कुणाला वांचविणार !

नार०:—देवा, तसं कां म्हणतां ? तुम्ही मेलेलीं माणसंसुद्धां जिवंत करून ज्याचीं त्याला परत दिलीं आहेत ! मग अर्जुनाची प्रतिज्ञा तर काय ? जिवंत मनुष्य मरूं न देण्याची !

कृष्ण:— होय, मी तेंच म्हणतों. अर्जुनानं नवऱ्याला वांचविण्याचं आश्वासन देऊन त्याच्या बायकोला जर आत्महत्त्येपासून वांचविलं असेल तर तें अगदीं योग्य. त्याच्या जागीं मी असतों तरी असंच केलं असतं. असो. पण आतां देवीकनकश्रीकड चलायचं ना सर्वांनीं मिळून ? द्रौपदीची निद्रा झाली असेल तर बोलावा तिला.

अर्जु०:—तीच इकडं येत आहे पहा !

[ द्रौपदी येते. ]

कृष्ण:—कां ताई, झोंप झाली कीं नाहीं ? तुझी प्रकृति आतां कशी काय आहे ?

द्रौप० :—हें काय बरं ? तुम्ही सर्व जमलां होतां तर मला झोंप लागली म्हणून काय झालं, हाक मारायची होतीत कीं नाहीं ?

कृष्णः—तुला जागरण झालं होतं पहाटे असं समजलं. म्हणून हांक नाहीं मारली.

द्रौप० :—जागरण झालं होतं खरं; पण म्हणून काय झालं ? तुम्ही एकत्र बोलत बसावं आणि मी निजावं हें कसं बरं बरं दिसेल ? पण खरंच सांगूं का ? मी निजलें नव्हतें, तर इकडनं ( अर्जुनाकडे पाहून ) जिच्या नवऱ्याचे प्राण वांचविण्याचं वचन देण्यांत आलं, त्या बिचाऱ्या स्त्रीचं मी समाधान करीत होतें.

नार० :—पण द्रौपदी, तुझ्या आणि पार्थाच्या उपकारबुद्धीनं कृतार्थ झालेली अशी स्त्री कोण आणि ती इथं कुठून तुला भेटली ? आण, तिला इकडं आण, देवी सत्यभामेला तिला भेटव.

द्रौप० :—ती आणि तिचा नवरा दोघंहि आंत बसलीं आहेत ! घारीच्या चोंचींतून सुटलेल्या चिमणीच्या पोरांसारखीं अजूनहि तीं भीतीनं थरथर कांपताहेत !

सत्य० :—वत्स, खरंच येऊंद्या त्यांना बाहेर. प्राणदानासारखं पुण्य नाहीं. त्यांना पाहून इकडं आणि मला संतोष होईल.

द्रौप० :—ठीक आहे. तुमची इच्छा असेल तर त्यांना आणतें बाहेर. आणि घालतें तुमच्या सर्वांच्या पायांवर.

[ आंत जाते आणि चित्ररथ व मालती यांसह बाहेर येते. ]

नार० :—अरे ! हा तर चित्ररथ आणि त्याची स्त्री ही मालती !

कृष्णः—( आश्चर्यानें ) कोण ? हा चित्ररथ ? इंद्रसभेंतला गायक चित्ररथ ?

द्रौप० :— होय कृष्णा !

कृष्णः—गंगातीरावर गालवमुनींच्या अर्घ्यप्रदानांत तांबूल आणि मद्याची थूंक ज्यानं फेंकली तोच हा चित्ररथ ?

चित्र० :—होय देवा, माझ्या हातून तो अपराध घडला खरा. पण

मला आतां त्याचा पश्चात्ताप झाला आहे. म्हणून मला अपराधाची क्षमा व्हावी.

कृष्ण:—ती गोष्ट आतां शक्य नाहीं. चित्ररथाच्या शिरच्छेदाची प्रतिज्ञा मीं करून चुकलों आहे.

द्रौप०:—पण याच्याच स्त्रीला मीं अभय दिलं आहे !

अर्जु०:—( आश्चर्यानें ) काय ? द्रौपदी, याचेच प्राण वांचविण्याचं वचन ? म्हणजे मीं प्रतिज्ञा केली ती याचेच प्राण वांचविण्याची ?

द्रौप०:—होय महाराज ! आणि आपण ती पुरी करावी अशी मी प्रार्थना करितें !

नार०:—नारायण ! नारायण ! हा मोठाच घोंटाळा झाला आहे म्हणायचा ! ( घाईघाईनें ) देवा, अर्जुना, मी आतां तुम्हां सर्वांची रजा घेतों. माझी संध्या खोळंबली आहे. मला गेलंच पाहिजे. [ जातो. ]

कृष्ण:—अर्जुना, तें कांहीं चालायचं नाहीं. माझी प्रतिज्ञा पुरी झालीच पाहिजे.

चित्ररथ द्रौपदीच्या व अर्जुनाच्या पाठीशीं दडतो व मालती सत्यभामेचे पाय धरते. ]

माल०:—( रडत ) देवी सत्यभामे, मला सौभाग्यदान द्या; नाहीं तर मला अग्निप्रवेश करण्याची तरी आज्ञा करा.

अर्जु०:—देवा, या स्त्रीच्या प्रार्थनेबरोबर मीहि तीच प्रार्थना करितों. चित्ररथाला आपण अभय द्या. मी गालवमुनींची समजूत कशी तरी काढण्याच्या उद्योगाला लागतों.

कृष्ण:—पार्था , काय ? माझी प्रतिज्ञा मी विफल करूं म्हणतोस ? मीं प्रतिज्ञा करितांनाहि गालवमुनींनीं मला अविश्वासाचे शब्द बोलून त्यांनीं माझा उपहास केला, तो माझ्या हृदयांत शल्यासारखा खुपतो आहे. तें कांहीं नाहीं ! तुझ्याशीं भांडत बसण्याची माझी इच्छा नाहीं. माझं कठोर कर्तव्य लक्षांत आण, आणि तें पुरं पाडण्याच्या कामीं मला व्यत्यय करूं नको. मला याच ठिकाणीं चित्ररथाचा शिरच्छेद करायला पाहिजे. पण तुझ्या आश्रयाला तुझ्या शिबिरांत तो स्त्रीसह उभा असतांना मीं त्याचा प्राण घेऊं

इच्छित नाहीं. माझी प्रतिज्ञा पुरी करण्याला अजून किंचित् कालावधि आहे! तोंपर्यंत चित्ररथ माझ्या शिबिराला आलाच पाहिजे. नाहीं तर परिणाम फार वाईट होतील! ( सत्यभामेस ) देवी, चल. हा चित्त-क्षोभ माझ्यानं सहन होत नाहीं. गंगातीरावरून हिंडत हिंडत आपण शिबिराला जाऊं. [ कृष्ण जाऊं लागतो. ]

सत्य०:—वत्स, काय बाई आतां करावं? या कातरींतून आतां कसं बरं बाहेर पडतां येईल?

[ द्रौपदीच्या कानांत बोलून सत्यभामा कृष्णाच्या मागून जाते. ]

---

## प्रवेश दुसरा.

स्थळ—गंगातीर

[ ऋषिकुमार प्रवेश करितात. ]

१ ऋ० कु०:—कां? गंधर्वाची मोडशी जिरली कीं नाहीं पुरी?

२ ऋ० कु०:—जिरली म्हणून विचारतोस काय? तो आमचा अप-राधी खरा. पण इंद्राच्या सेनापतीनं, त्याला जें तडातड तडाखे दिले ते आपल्याच्यानं कांहीं पाहवले नाहींत बुवा! खरंच सांगतों.

१ ऋ० कु०:—अरे किती झालं तरी आपलं हाड ब्राह्मणाचं—गरीब! आपल्या हातानं कुणाचा छळ व्हायचा नाहीं. आणि दुसऱ्यानं तिसऱ्याचा केला तरी पहावयाचा नाहीं.

२ ऋ० कु०:—पण कायरे? आपल्याला या यक्षद्वीपावर त्या इंद्र-सेनाधिपतीनं कशाला बोलावलं असेल या वेळीं?

१ ऋ० कु०:—माझ्यासुद्धां हेंच मनांत आलं.

२ ऋ० कु०:—फिरून तर नाहींना आपला अपमान करायचा त्यांच्या मनांत?

१ ऋ० कु०:—पण त्या इंद्रसेनाधिपतींनं बोलावलं म्हणून माझ्या मनांत कांहीं शंका आली नाहीं.

२ ऋ० कु०:—पण तो स्वत: न येतांना तो गंधर्वच आला, आणि आसपास दुसरंतिसरं कुणी नाहीं असं पाहून त्या गंधर्वानं त्या दिवसासारखंच उपसलंन हत्यार तर ! [ गंधर्व व त्याची स्त्री प्रवेश करितात. ]

१ ऋ० कु०:—अरे पहा पहा तीच जोडी फिरून आली !

२ ऋ० कु०:—आणि त्यांना झोडणारा तो सैनिक कुठं दिसत नाहीं तो ?

१ ऋ० कु०:— ( भिऊन ) मला तर भीति वाटते ! चल आपण हळूं-हळूं मागं सरूं. आणि तो गंधर्व फारच जवळ आला तर पळून जाऊं.

गंध०:—( स्त्रीस ) तेच ते ऋषिकुमार !

[ पुढें येतो तों ऋषिकुमार पळून जाऊं लागतात, इंद्रसैनिक प्रवेश करितात.]

इं० सै०:—हां हां ! ऋषिकुमारहो, भिऊन पळूं नका. आमच्यापासून तुम्हांला कसलीहि भीति नाहीं. या असे पुढं या.

१ ऋ० कु०:—हो पुढं हो.

२ ऋ० कु०:—हो तूंच पुढं हो, तुझ्या मागून मी येतों.

इं० सै०:—गंधर्वा, बोल हेंच स्थळ ? हेंच तें यक्षद्वीप ? ज्या ठिकाणीं तूं या ऋषिकुमारांचा अपमान केला होतास ते ?

गंध०:—होय महाराज !

इं० सै०:—ठीक आहे. इंद्रमहाराजांचा असा हुकूम आहे, कीं तूं आणि तुझ्या स्त्रीनं याच ठिकाणीं त्यांच्या पायांवर गंधफुलं वाहून त्यांची पूजा करावी. तरच तुझे प्राण वांचतील.

गं० स्त्री०:—होय महाराज ! आम्ही आनंदानं यांची पूजा करूं. आम्हांला त्यानं पुण्यच लागेल !

इं० सै०:—मग हा विचार पूर्वींच केला असतास तर एवढा दुर्धर प्रसंग कशाला ओढवता ! देवेंद्राची अब्रू तुम्हां लोकांच्या हातीं आहे. स्वत:उन्मत्त होऊन असे अत्याचार करितां आणि देवेंद्राला खालीं पहायला लावतां, तुम्हांला काय म्हणावं ?

गंध०:— झाली ती चूक होऊन गेली. पुन्हां असं हातून होणार नाहीं.

[ तो व त्याची स्त्री ऋषिकुमारांच्या पायांवर गंधफूल वाहतात. ]

१ ऋ० कु०:—पण अहो सेनाध्यक्ष, पुरे पुरे ! पश्चात्ताप झालेल्या अपराध्याला झालं तरी असं अगदीं मातीवरून ओढायचं काय कारण ? त्यालाहि थोडासा स्वाभिमान असतोच कीं नाहीं ?

२ ऋ० कु०:—खरंच सेनाध्यक्ष, दीन झालेल्या या गंधर्वांकडून अशी पूजा करून घेण्याचं माझ्या तर जिवावर येतं ! कृपा करा.

इं० सै०:—तें खरं; पण मी तरी काय करूं ? देवेंद्रमहाराजांकडून झालेली आज्ञा मला अक्षरशः पाळलीच पाहिजे. नाहीं तर मला स्वतः-लाच शासन व्हायचं ! पण महाराज, तुम्हांला जर गंधर्वांची खरोखरच दया येत असली तर एक गोष्ट करा.

१ ऋ० कु०:— ती काय ?

इं० सै०:—सर्व गंधर्वांचा अध्यक्ष चित्ररथ याच्या शिरच्छेदाची प्रतिज्ञा श्रीकृष्णांनीं केलेली आहे, व तिला आपले गुरुजी गालवमुनी यांचा राग कारणीभूत झाला आहे असं ऐकतों. तर, कृपा करून आपल्या गुरुजींना चित्र-रथाला क्षमा करण्याची विनंति कराल काय ? आपण उभयतां गालवमुनींचे पट्टशिष्य आहां असं म्हणतात. आपण कृपा केलीत तर काम होऊन जाईल.

गं० स्त्री०:—आपण ब्राह्मण दयावंत असतां. आपणांला आमची कींव आली असं आपल्या वर्तनावरून दिसतंच आहे. तर महाराज, एवढं कराच. कारण, चित्ररथ महाराजांचा शिरच्छेद झाला तर आमच्या सर्व गंधर्वकुळाचा नाश झाल्याप्रमाणंच आहे. आमच्या राजाचं जें सुख तेंच आमचं सुख.

गंध०:—ऋषिमहाराज, येवढं जर आपण केलं तर आम्ही सर्व गंधर्व-मंडळी कृतज्ञताबुद्धीनं आपल्या गुणवर्णनाची कवनं करून इंद्रसभेंत गाऊन दाखवूं !

१ ऋ० कु०:—छे: छे ! गंधर्वा, इतकं दीन होऊन बोलण्याचं कांहींच कारण नाहीं. आमचे गुरुजी जितके तेजस्वी आहेत तितकेच ते क्षमाशीलहि आहेत.

२ ऋ० कु०:—हेंच पहाना ! हातांत मद्याची चूळ थुंकलेली पाहतांच त्यांना आपल्या नुसत्या शापानं चित्ररथ व त्याची स्त्री यांना विमानासह दग्ध करून गंगेंत पाडतां आलं असतं; पण त्यांनीं मन आवरून योग्य मार्गानं प्रतिकार करण्याकरितां श्रीकृष्णाकडं नुसती कागाळी केली ! श्रीकृष्ण पडला क्षत्रिय. त्याला फार राग आला आणि त्यानं घोर प्रतिज्ञा केली.

इं० सै०:—पण स्वतः गालवमुनींनींच जर चित्ररथाला क्षमा केली, तर श्रीकृष्ण कांहीं आपली प्रतिज्ञा पुरी करण्याचा हट्ट खचित धरणार नाहीं. म्हणून आपणांला हात जोडून पुनःपुनः बिनंति करितों. येवढी कृपा कराच.

१ ऋ० कु०:—छेः छेः ! सेनाध्यक्ष, इतकी विनवणी करण्याचं मुळींच कारण नाहीं. चित्ररथ मेल्यानं आम्हांला किंवा आमच्या गुरुजींना काय लाभ ? ते खचित त्याला क्षमा करितील. आणि आम्हीहि त्यांना क्षमा करण्याबद्दल विनंति करूं ! चला आमच्याबरोबर आश्रमांत. तुमच्यादेखतांच विनंति करितों. तुम्ही बरोबर असल्यानं त्यांना विशेष अगत्य वाटेल; चला !

[ सर्व जातात. ]

## प्रवेश तिसरा

स्थळ—गंगाकांठचें श्रीकृष्णाचें शिबिर

[ सत्यभामा व सात्यकी प्रवेश करितात. ]

सात्य०:—बाईसाहेब, आतां माझ्या ध्यानांत पुरं आलं. हीं सर्व नारदमुनींनीं लावालावी केलेली दिसते.

सत्य०:—पण येवढं नुसतं ध्यानांत येऊन काय उपयोग ? विरोधी प्रतिज्ञांचा हा तंटा मिटणार कसा ? दोघांनींहि माघार घेणं योग्य आहे; पण एकहि माघार घेण्याला तयार होईल असं वाटत नाहीं; प्रतिज्ञेची ईर्षा मोठी कठिण असते.

सात्य०:––मला एक उपाय सुचतो, तो असा; द्रौपदी देवी आतां इतक्यांत येणारच आहेत. आपण त्यांच्यापाशीं गोष्ट काढूं.

सत्य०:—पण तिनं उलटीं माझींच बोटं माझ्या डोळ्यांत घातलीन् तर ? ( द्रौपदी येते ) या पहा, वन्स आल्याच या. वन्स, वेळेवर आलांत

[ सात्यकी जातो. ]

द्रौप०:––वेळ कसली आणि अवेळ कसली ? वहिनी, मी तुला केव्हां भेटेन असं झालं होतं; बरं बाई तुझी गांठ पडली !

सत्य०:—वन्स, नारदमुनींचा मला फार राग आला आहे.

द्रौप०:—होय वहिनी, मलासुद्धां त्यांचा फार राग आला आहे.

सत्य०:––( मनांत ) चिन्ह तर बरं दिसतं आहे. ( उघड ) राग न येईल तर काय होईल ? नसत्या कलागती लावायच्या !

द्रौप०:—खरंच वन्स, आता या भांडणाविणं काय बरं अडलं होतं ?

सत्य०:––देहस्वभाव जाणार कसा ?

द्रौप०:—म्हणूनच जिथं जिथं हे जातात तिथं तिथं जळता निखारा टाकून येतात. ( मनांत ) वहिनी नारदमुनींवर रागावली आहे. तेव्हां तिच्या मनासारखं बोलून काम करून घेतलं पाहिजे. ( उघड ) मी तर असा निश्चय केला आहे कीं, नारदमुनि दिसूं देत कीं त्यांची खरडपट्टीच काढतें चांगली. जिव्हाळ्याच्या स्नेह्यास्नेह्यांत अशीं भांडणं लावायचीं याला काय म्हणावं ?

सत्य०:––आणि भांडण तरी काय साधं ? बसल्या बसल्या आपली थोडीशी थट्टा किंवा कुचेष्टा केली तर तें एक असो; पण या जीव जायच्या थट्टेला बाई काय म्हणावं ?

द्रौप०:—( स्वगत ) कृष्णाला प्रतिज्ञा मोडायला सांग असं म्हटलं तर ही ऐकेलसं दिसतं ! जीव जायची थट्टा म्हणते. चित्ररथाचे ग्रह बरे दिसतात. ( उघड ) होय वहिनी, अगदीं बरोबर बोललीस तूं. नारदाची झाली थट्टा. पण गरीब बिचारा चित्ररथ त्याचा जीव जाण्याची आली कीं नाहीं वेळ ?

[ नारद प्रवेश करितो. ]

नार०:—( स्वगत ) अरे या दोघी मिळून माझी निंदा करताहेत. तेव्हां संगनमत करणार कीं काय ? मग माझी युक्ति फसणार !

सत्य०:—वन्स, तसं नाहीं मीं म्हटलं ! मेल्या चित्ररथाचा जीव जाईना का ? पण म्हटलं भावोजी आणि इकडं दोघांनीं प्रतिज्ञा राखण्याकरितां भांडायचं आणि वेळ पडली तर लढायचं याला म्हटलं हो, मी जीव जायची थट्टा !

नार०: —( स्वगत ) आतां माझ्या जिवांत जीव आला. ( उघड ) ( पुढें होऊन ) द्रौपदी, सत्यभामे, काय चाललं आहे तुम्हां दोघींचं हितगुज ?

सत्य०:–हें हो काय नारदमुनि,ही हो कसली तुमची प्राण जायची थट्टा?

नार०:— मी कुठं म्हणतों प्राण जावा कुणाचा म्हणून ? चित्ररथाचा प्राण जावा अशी कांहीं माझी इच्छा नाहीं. आणि तुम्ही मनांत आणलं तर त्याचा प्राण सहज वांचू शकेल ! त्यांत काय कठिण ! आतां बोलूं नये पण वेळ आहे म्हणून बोलतोंच. श्रीकृष्ण तुमच्या अगदीं अर्ध्या वचनांत आहे. तुम्ही नुसता शब्द उच्चारला कीं श्रीकृष्ण आपली प्रतिज्ञा मागं घेतील, आणि बिचाऱ्या चित्ररथाचे प्राण वांचतील ! राहिली आपली माझी प्राण जायची थट्टा !

द्रौप०:—होय. वहिनी, मीहि तेंच म्हणणार होतें !

सत्य०:—असं कसं म्हणतां बरं वन्स ? चित्ररथाचे प्राण घेण्याची प्रतिज्ञा तिकडून झाली आहे हें तुम्हांला माहीत आहे ना ?

द्रौप०:—होय; पण असं कसं बरं म्हणतेस वहिनी ? चित्ररथाचा प्राण वांचविण्याची प्रतिज्ञा तिकडून झाली आहे हें तुला माहीत आहे ना ?

नार०:—बरा माझा आपला परस्परच न्याय झाला म्हणायचा ! कारण, माझी थट्टा असलीच तरी ती जितकी प्राण जायची आहे तितकीच प्राण वांचविण्याचीहि आहे हें उघड झालें. द्रौपदी, सत्यभामे, या या कामीं माझ्या हातनं थट्टा झाली असली तर ती चूक आहे. माझी चूक तुम्ही अजून सुधारा म्हणजे झालं. कलह लावायचा अभिमान मी आपला परत घेतला. कलह मिटवायचा अभिमान तुम्ही धरून तो आतां मिटवा म्हणजे झालं. हें पहा मी तुम्हां दोघींनाहि अगदीं प्रांजलपणानं

सांगतों कीं, तुम्हां दोघींपैकीं कुणाहि एकीनं माघार घेतली, आणि कुणाहि एकीचं म्हणणं शेवटाला गेलं तरी मला त्यांत सारखाच आनंद आहे. ( चुटकी वाजवून ) देवी द्रौपदी, तूं आपलं म्हणणं मागं घे कसं ?

द्रौप०:— मी नाहीं मागं घेणार.

नार०:—देवी सत्यभामे, तूं आपलं म्हणणं मागं घे. ती काय आणि तूं काय एकूण एकच. आपल्याला तंटा मिटण्याशीं काम !

सत्य०:—हें काय ? मी काय म्हणून आपलं म्हणणं मागं घेईन ?

नार०:—पहा आतां तुम्हींच ! तुम्ही दोघीजणी हट्टाला पेटलां आणि मला मात्र कलहप्रिय म्हणतां ! हा जुलूम झाला !

सत्य०:—पण मुळीं हा कलह लावला कुणीं ?

नार०:—कबूल, मी कबूल करितों कीं, कलह मीं लावला. पण हें तुम्हां दोघींनाहि कळतं ना ? मग तुम्ही मिटतं घ्या म्हणजे झाली माझी फजिती !

सत्य०:—वन्स, करूं याच हो यांची फजिती ! तुम्ही चित्ररथाला दिलेलं अभयदान परत घ्या कशा ?

द्रौप०:—असं कसं म्हणतेस बरं वहिनी ! श्रीकृष्णानंच आपली प्रतिज्ञा मागं घ्यावी म्हणजे होईल नारदमुनींची फजिती अगदीं उत्तम !

नार०:—नारायण ! नारायण ! हे परमेश्वरा, जगांत कलह माजवून मी त्रास देतों असा माझ्यावर आरोप आहे ! पण हें पहा तुझीच शपथ घेऊन मी असं सांगतों कीं, चित्ररथ मरो किंवा जिवंत राहो; गालवमुनींच्या अपराध्याला शिक्षा होवो किंवा न होवो; अर्जुनाची प्रतिज्ञा शेवटाला जावो किंवा श्रीकृष्णाची शेवटाला जावो; द्रौपदीच्या पतीला यश येवो किंवा देवी सत्यभामेच्या पतीला यश येवो, कांहीं झालं तरी मला यत्किंचितहि आनंद किंवा दुःख वाटणार नाहीं. मला आनंद झाला तरी सारखा होईल आणि दुःख झालं तरी सारखंच होईल. झालीं तर मला दोन्ही होतील, नाहीं तर मुळींच कांहीं होणार नाहीं ! देवा, तें वाटेल तशी या नवराबायकोनां बुद्धि दे. पण कलहप्रिय म्हणून माझ्यावर विनाकारण जो आरोप आला आहे त्यांतून मला सोडीव एवढंच मागणं आहे ! बरं आहे, सत्यभामे,

द्रौपदी, मी जातों आतां; भगवान् शेषशाईजवळ नित्याचा संगीत स्तोत्र-पाठ म्हणण्याची माझी वेळ झाली. मी जातों आतां. तुमचा तंटा वाटेल तसा तोडून तुम्ही आपल्या मोकळ्या व्हा कशा ? आणि हातांत हात घालून कृष्णार्जुनांकडं जाऊन माझ्या फजीतीचं वर्तमान त्यांना कळवून आनंदित करा कशा ?

[ जातो. ]

सत्य०:—वन्स, पहा हो बाई नारदमुनींचा कसा कावा आहे तो !

द्रौप०:—होय वहिनी, कसे पण बोलत होते कीं, जसे कांहीं ते त्या गांवचेच नव्हत.

सत्य०:—( लाडीगोडीनें ) होय ना ? मग वन्स तुम्ही घ्या ना माघार या कामीं ?

द्रौप०:—होय वहिनी, घेतली असती; पण तिकडनं प्रतिज्ञा करायची झाली ती माझ्याचमुळं बरं का ? तेव्हां तिकडनं प्रतिज्ञेनचं वचन घेऊन आतां जर प्रतिज्ञा मोडायचा आग्रह मी करूं लागलें तर म्हणणं होईल, पहा या बायका आम्हांला अगदीं बोटावरच खेळवायला पहातात आपल्या ! आमच्या शब्दाला जशी काय किंमतच नाहीं ! पण वहिनी, तुझं कांहीं तसं नाहीं. श्रीकृष्णानं प्रतिज्ञा करण्यापूर्वी तुला विचारलं होतंन् का ?

सत्य०:—नाहीं हो वन्स, मुळींच नाहीं ! उलट उदासपणानं मनांत कसला विचार चालला आहे म्हणून समजून घ्यायचा मी कित्ती कित्ती तरी प्रयत्न केला ! पण मला मुळीं दादच लागू दिली नाहीं कशी ती !

द्रौप०:—होय ना वहिनी ? मग कृष्णानं आपली प्रतिज्ञा मोडावी असं सांगण्याचा तुला चांगलाच अधिकार आहे. तूं म्हण कीं, प्रतिज्ञा करतांना मला नुसत्या एका शब्दानं तरी विचारायचं होतं ! म्हणजे तुझं ऐकायला कृष्ण तयार होईल !

सत्य०:—पण, मीं प्रतिज्ञा केली ती मोडण्याकरितां का, असं विचारणं झालं म्हणजे मी बाई काय बोलूं ? ऋषीला दिलेलं वचन बायकोच्या सांगण्यावरून मोडलं असं लोक म्हणतील तें कांहीं इकडं आवडायचं नाहीं! मला माहीत आहे स्वभाव ! पण वन्स, आपण अशा वाद घालीत किती

वेळ बसणार? चला आपण जाऊन तिकडंच कांहीं युक्ति सुचते का विचारूं या ? पण तुम्ही मदत कराल ना तिकडची विनवणी करायला ?

द्रौप०:—वहिनी, हें काय बरं विचारणं ? मी तर मुद्दाम तेवढ्याकरितां आलें आहें. चल, आपण श्रीकृष्णाकडं जाऊं ! [ जातात. ]

---

## प्रवेश चवथा

स्थळ—गालवमुनींचा आश्रम

[ गालवमुनी व नारद बोलत बसले आहेत. ]

नार०:—कां गालवमुनी, मी तुम्हांला त्याच वेळीं नव्हतं सांगितलं कीं कृष्णाच्या हातून ही प्रतिज्ञा पार पडणार नाहीं म्हणून ? आपलं कूळ आपणाला माहीत ! कृष्णावताराच्या प्रतिज्ञा सफळ होत नसतात. तें सत्यप्रतिज्ञत्व, तो एकवचनीपणाचा बाणा, श्रीरामचंद्राबरोबर गेला ! त्रेतायुग केव्हांच संपलं ! हल्लींचं हें द्वापारयुग; आणि तेंहि संपून कलियुग लागण्याच्या बेतांत आलं आहे ! मला वाटतं कलीची छाया या अवतारावरहि पडली !

गाल०:—नाहीं नाहीं ! असं कधींहि होणार नाहीं ! हे सर्व संशय त्याच वेळीं निघाले होते. श्रीकृष्णासारख्यानं प्रतिज्ञा करावी आणि माझ्यासारख्या मनुष्यानं तिच्याविषयीं संशय दाखवावा हें बरं नव्हे. पण रागाच्या आवेशांत भान न राहून मी आणि कौशिक दोघांनींहि एकमेकांकडं पाहून संशय आलासं दाखविलं. पण महानुभाव श्रीकृष्णानं तें ओळखून आपल्या मातोश्रीची शपथ वाहून फिरून प्रतिज्ञेचा उच्चार केला !

नार०:—नाहीं–मी कांहीं तसं म्हणत नाहीं ! प्रतिज्ञा शेवटास जाईलहि कदाचित् ! नेम काय सांगावा ? श्रीकृष्ण कितीहि चंचल मनाचा झाला म्हणून तो मातोश्रीची शपथ घेऊन केलेली प्रतिज्ञा मोडीलच असं नाहीं. पण अजून कांहीं कुठं हालचाल दिसत नाहीं इतकं मात्र खरं.

गाल०:—त्यांत हालचाल ती कसली ? मनांत आणल्यावर चित्ररथाचा शिरच्छेद करायला श्रीकृष्णाला कितीसा वेळ लागणार! एका क्षणाचं काम.

नार०:—म्हणूनच म्हणतों कीं जरा शंका येते. कारण, प्रतिज्ञा झाल्यापासून अकरा प्रहर तर होऊन गेले. एका क्षणाच्या कामाला अकरा प्रहर झाले,म्हणून जरा शंका आली इतकंच. बाकी प्रतिज्ञा शेवटाला जाणारच ! पण गालवा , एक गोष्ट उडत उडत माझ्या कानावर आली आहे. ती ऐकली आहे का तुम्ही ?

गाल०:—ती काय ?

नार०:—मी असं ऐकलं आहे कीं, कालपासून चित्ररथ इंद्रलोकांतून नाहींसा झाला, त्याचा पत्ताच लागत नाहीं इंद्राच्या दूतांनां कुठं !

गाल०:—काय ? चित्ररथ नाहींसा झाला ? आणि त्याचा पत्ता लागत नाहीं ?

नार०:—गालवा, अगदीं खरं आहे हें. पण बरोबरच आहे ! पत्ता लागणार कसा ?

गाल०:—तो कां ? तो ब्रह्माण्डाचं पोट फोडून थोडाच जाणार आहे!

नार०:—कां बरं ? तो एका महारथी वीराच्या पाठीशीं दडला आहे ! आणि तसं खरोखरच असलं तर मग ब्रह्माण्डाच्या पोटांत असला काय आणि पोट फोडून बाहेर गेला काय सारखाच !

गाल०:—काय एका महारथी वीरानं चित्ररथाला पाठीशीं घातला आहे ? एवढं धाडस कुणाचं झालं ? पण एवढं धाडस करून तरी काय फळ ? श्रीकृष्णापुढं टिकेल असा महारथी वीर तरी कोण असणार ?

नार०:—गालवा, दुसरातिसरा कोणी वीर असता तर मीहि तसंच म्हटलं असतं. पण—पण—

गाल०:—पण काय ? नारदा, असं बोलतांना कचरतां कां ?

नार०:—नाहीं म्हणलं, दुसरातिसरा कोणी वीर चित्ररथाला आश्रय देणारा असता तर गोष्ट वेगळी ! पण मला तरी हा सांवळा गोंधळ दिसतो.

गाल०:—तो कसा ?

नार०:—कारण, समजा, एका स्नेह्यानं प्रतिज्ञा केली आणि ती दुस-

त्यानं मोडायचा निश्चय केला तर प्रतिज्ञासिद्धीला मदत होण्यापेक्षां प्रतिज्ञा मोडण्याचाच संभव अधिक !

गाल०:—पण श्रीकृष्णाचा स्नेही असून त्याची प्रतिज्ञा मोडण्याची ईर्षा धरील असा वीर तरी कोण आहे ?

नार०:—कोण ? अहो मध्यम पांडव पार्थ !

गाल०:—काय ? अर्जुनानं चित्ररथाला पाठीशीं घातला ? त्याला कारण ?

नार०:—त्याला कारण बाइलबुद्धेपणा, दुसरं काय ? गालवा, तुम्ही आम्ही आपले ब्रह्मचारी बरे ! तुमच्या आमच्या प्रतिज्ञांच्या मार्गांत विघ्न आणायला ह्या बायका नसतात ! पण कृष्ण काय आणि अर्जुन काय ! बायकांच्या तडाख्यांतून वांचून हे रणांगणापर्यंत पोंचले म्हणजे यांचं शौर्य पाहून घ्यावं. पण घरीं आवडत्या बायकांच्या पुढं हे अगदीं गोंडा घोळीत असतात ! अगदीं दीनपणें मान टाकतात, जशी कांहीं वाघापुढं गायच !

गाल०:—पण द्रौपदीनं या फंदांत पडण्याचं कारण कांहींच कळत नाहीं.

नार०:—छेः छेः ! द्रौपदीनं आपल्या स्वतःच्याच स्फूर्तीनं हें सारं केलं असं मी नाहीं म्हणणार ! पण तिच्या मनांत दुसऱ्या कुणी तरी भरवून दिल्याशिवाय हें झालं नाहीं खास !

गाल०:—मग नारदा तुमची कल्पना तरी या कामांत काय चालते तें सांगा पाहूं.

नार०:—सांगूंच ? पण माझी आपली नुसती कल्पना आहे हो, दुसरं-तिसरं कांहीं नाहीं. वाटली तर खरी माना, नाहीं तर न माना ! कारण, नसते संशय उत्पन्न करून देणारा मी कोण ? लावालावी करण्याचा आरोप माझ्यावर एरवीं लोक करितात तो थोडा नाहीं झाला ! त्यांत भर कशाला?

गाल०:—पण नारदा, तुमची कल्पना तरी सांगाल ना ?

नार०:—माझी कल्पना अशी आहे कीं, श्रीकृष्णानंच द्रौपदीकडून हें कृत्य परस्पर केलं असावं ! एरवीं घरच्या घरीं असा भेद होणं कठिण आहे! पण कांहीं का असेना,मला तें घेऊन काय करायचं आहे? प्रतिज्ञेपासून

अकरा प्रहर झाले तरी चित्ररथ जिवंत आहे याचं कारण मला दुसरं-तिसरं कांहींएक दिसत नाहीं ! आतां चित्ररथ जिवंत राहिला तर माझं काय जातं ? माझं त्यानं असं काय घोडें मारलें आहे ? पण गंधर्व उन्मत्त झाले त्यांना दहशत बसत नाहीं इतकंच काय तें ! चित्ररथ जिवंत राहून श्रीकृष्णाची प्रतिज्ञा फुकट गेली म्हणजे आम्हा ब्राह्मणांना हें गंगातीर वर्ज केलं पाहिजे, आणि पर्वताच्या गुहांतून तोंडाला मोठमोठ्या शिळा लावून घेऊन ब्रह्मकर्म आरंभलं पाहिजे, दुसरं काय ? कारण, आज आमच्या ओंजळींत मद्य येऊन पडलं, उद्यां आणखी कांहीं भलतंच येऊन पडेल; त्याचा काय नेम सांगावा ?

गाल०:—( रागानं ) नारदा, तुमचं म्हणणं अगदीं बरोबर आहे. आतां माझ्या ध्यानांत सर्व कांहीं आलं ! चला नारदा, आपण दोघेंहि मिळून श्रीकृष्णाकडे जाऊं ! आणि देवकीची शपथ घेऊन केलेल्या प्रतिज्ञेची त्याला आठवण देऊं. नारदा, तपश्चर्येच्या पुण्याचा दुरुपयोग करूं नये म्हणून मी त्या वेळीं माघार घेतली ! पण श्रीकृष्ण माझ्यासारख्या निष्कपट तापसाशींसुद्धां जर असं कपट करूं लागेल, तर चित्ररथालाच काय पण श्रीकृष्णासारख्या अवतारी पुरुषालाही जाळून भस्म करण्याचं सामर्थ्य माझ्या तपश्चर्येंत आहे हें मलाहि दाखविलंच पाहिजे !

नार०:—पण मला वाटतं, गालवा, आपण आणखी थोडा वेळ वाट पाहावी हें बरं ! कारण न जाणो श्रीकृष्ण अगदीं आयत्या वेळीं आपली प्रतिज्ञा सिद्धीस नेणार असला तर ? उगीच अन्यायानं त्याच्यावर आपण अविश्वास दाखविला असं होईल. तेव्हां मी पुढें होतों, आणि कृष्णार्जुनांचा प्रेमकलह कोठवर आला आहे याचा अंदाज घेतों. आणि मला कुठंच कांहीं दिसलं नाहीं तर मी तुम्हाला बोलवायला येतों. बारावा प्रहर संपण्याच्या क्षणीं तुम्ही श्रीकृष्णाला काय बोलाल तें थोडंच आहे.

[ जातो. ]

गाल०:—( रागानें ) अरे ! अरे ! आम्हा तापसांचा रक्षणकर्ता या जगांत कोणीच राहिला नाहीं काय? क्षत्रियांनीं आमचं संकट हरण करायचं तें सोडून ते आमच्या अपराध्यांनाच पाठीशीं घालूं लागले आणि क्षत्रियांनाही

शासन करणारे अवतारी पुरुष आपल्या प्रतिज्ञा पाण्यावर अक्षरं काढल्या-सारख्या खोट्या करूं लागले ! तस्मात् हे चारित्र्या, तुला धिक्कार असो !

[ कौशिक आंत येतो. ]

**कौशि०:**—एकलीत का मुनिवर्य एक गंमत तुम्ही ?

**गाल०:**—( रागानें ) कौशिका बोलूं नको तूं या वेळीं कांहीं. मी रागानं देहभान विसरून जाण्याच्या बेतांत आहे. श्रीकृष्णासारख्यानं आपली प्रतिज्ञा मोडायची म्हणजे काय ? आह्मां ऋषिलोकांविषयीं त्याला कांहींच आदरबुद्धि किंवा कळकळ वाटत नाहीं; दुसरं काय? पण मी हें सहन करणार नाहीं. आजवर केलेली तपश्चर्या फुकट गेली तरी हरकत नाहीं. आणखी दहा सहस्र वर्षं लोहपिष्ट भक्षण करून देह दंडीन; पण या कृष्णाची खोड मोडल्याशिवाय राहणार नाहीं !

**कौशि०:**—पण श्रीकृष्णाची खोड मोडायच्या आधीं नारदाची खोड आपणाला मोडायला पाहिजे !

**गाल०:**—ती काय म्हणून ?

**कौशि०:**—कारण, हा सगळा त्याच्याच लावालावीचा प्रकार आहे असं आतांच मला कळून आलं !

**गाल०:**—त्याच्या लावालावीचा प्रकार कसा ? आणि त्यानं लावा-लावी केली असली म्हणून काय झालं? चित्ररथाचा अपराध कांहीं नाहींसा होत नाहीं.

**कौशि०:**—चित्ररथानं अपराध केला त्याला मूळ कारण नारद; श्री-कृष्णाकडे जायला आपणाला सुचविलं तें नारदानं; श्रीकृष्णाकडून प्रतिज्ञा पक्की करविली नारदानं; इंद्रलोकांत जाऊन चित्ररथाला भुलोकावर आणून सोडला नारदानं; देवी द्रौपदीकडून चित्ररथाच्या स्त्रीला अभयवचन देवविलं नारदानं; आणि श्रीकृष्णानं अजून आपली प्रतिज्ञा खरी केली नाहीं ह्मणून आपल्याला चिडवायलाहि नारदच आला होता !

**गाल०:**—पण अशी लावालावी करून नारदाला फायदा ?

**कौशि०:**—नुसती गंमत पहायला सांपडली लोकांची ह्मणजे त्याला

पुरते. या कलहप्रिय नारदाला दुसरातिसरा फायदा कांहींएक लागत नाहीं; पण या त्याच्या लावालावींमुळं केवढा अनर्थ ओढवला आहे !

गाल०:—तो कसा ?

कौशि०:—चित्ररथाच्या स्त्रीला द्रौपदी वचनबद्ध झाली, म्हणून अर्जुनानं त्याचे प्राण रक्षण करण्याची प्रतिज्ञा केली ! आणि श्रीकृष्णाची प्रतिज्ञा आपणापाशीं पूर्वीं झालीच आहे !

गाल०:—पण या सर्व गोष्टींत असलाच तर अर्जुनाचाच दोष आहे. कारण, चित्ररथानं माझा अपराध केला असं माहीत असतांना त्यानं त्याचे प्राण वांचविण्याची प्रतिज्ञा काय म्हणून करावी ?

कौशि०—पण अर्जुनाला कांहींच माहीत नव्हतं त्यांतलं. द्रौपदीनं प्राणदान दिल्यामुळं अर्जुनानं प्रतिज्ञा केली, त्या वेळीं श्रीकृष्णाच्या प्रतिज्ञेची कुणालाच माहिती नव्हती !

गाल०:—पण चित्ररथाच्या अपराधाची काय वाट ? तो अपराध त्याच्या हातून घडलाच कीं नाहीं ? माझं अर्घ्यप्रदान दूषित झालंच कीं नाहीं ? झालं तर ! श्रीकृष्णानं प्रतिज्ञा पार पाडलीच पाहिजे. प्रतिज्ञेचं गुप्त दान अविचारानं दिल्याबद्दल अर्जुनाला मरण आलं तरी मला त्याची चिंता नाहीं. एरवीं या उन्मत्त गंधर्वांना दरारा बसणार नाहीं.

कौशि०:—नाहीं, मुनिराज तें काम पूर्णपणें झालं आहे. श्रीकृष्णाच्या नुसत्या प्रतिज्ञेमुळं गंधर्वांवांचं काय, पण प्रत्यक्ष देवेंद्रालाहि भय वाटून पुरी दहशत बसली आहे. देवेंद्राला श्रीकृष्णाचा निरोप पोंचतांच त्यानं चित्ररथाला कृष्णाच्या स्वाधीन करण्याची एकदम आज्ञा केली.

गाल०:—पण मग चित्ररथ भूलोकावर येऊन द्रौपदीच्या पाठीशीं कसा पडला ?

कौशि०:—देवेंद्राची आज्ञा अमलांत येण्यापूर्वीच नारदानं त्याला गांठून आपल्याबरोबर भूलोकावर आणून द्रौपदीच्या स्वाधीन केला ! चित्ररथ आतां अगदीं गोगलगाय होऊन हात बांधून त्याची स्त्री आणि अनुचर यांच्यासहवर्तमान आपल्याच भेटीला येतो आहे. मला वाटतं आपण त्याच्यावर दया करून कृष्णार्जुनयुद्ध थांबवावं ! नाहींतर जगाचा संहार होण्याचा

प्रसंग आहे महाराज! ज्या जगाच्या कल्याणाकरितां आपली सर्व तपश्चर्या, त्या जगाचा संहार कृष्णार्जुनयुद्धानं झाल्याशिवाय खचित राहणार नाहीं. आपण सदय होऊन चित्ररथाला क्षमा केलीच पाहिजे !

[ गंधर्व, त्याची स्त्री व गालवशिष्य ऋषिकुमार येतात. गंधर्व आणि त्याची स्त्री गालवापुढें लोटांगण घालतात. ]

गंध०:—ऋषिदेवते, माझे प्राण वांचीव ! मी तुला शरण आहें.

गं० स्त्री०:—( रडत ) महाराज, मला सौभाग्यदान द्या. मी आपले उपकार जन्मजन्मान्तरीं विसरणार नाहीं ! आमच्या हातून चूक झाली; पुनः अशी गोष्ट होणार नाहीं !

गंध०:—आमचा अपराध फार मोठा आहे. पण महाराज, आपली दयाबुद्धि इतकी मोठी आहे कीं, आमच्यासारखे हजारों अपराधी आपणा-पुढं आले तरी त्यांना आपण क्षमाच कराल ! महाराज, मद्यप्राशनामुळं आम्हा सर्व गंधर्वकुळाचा नाश होण्याची वेळ आली आहे. पण आमच्या डोळ्यांत आतां चांगलं अंजन पडलं. मद्यप्राशनाचा अपराध आमच्या हातून फिरून यावज्जन्म होणार नाहीं. ही आपली पायांची शपथ !

गाल०:—कायरे, ( ऋषिकुमारांकडे पाहून ) हा गंधर्व कोण चित्र-रथच काय ?

१ ऋ० कु०:—नाहीं महाराज, ज्यानं यक्षद्वीपावर आमचा अपमान केला तो हा गंधर्व; पण इंद्राच्या सेवकांनीं त्याला फार जबर शिक्षा केली ती आम्ही स्वतः पाहिली गुरुमहाराज ! तो फार दीन झाला आहे; गुरुमहाराजांनीं त्याला क्षमा करावी !

२ ऋ० कु०:—सर्व गंधर्व मंडळीला आतां पुरी दहशत बसली आहे, हें मी काल इंद्रलोकांत गेलों तेव्हां प्रत्यक्ष पाहिलं आहे गुरुमहाराज !

गाल०:—ठीक आहे कौशिका, कुणाहि प्राणिमात्राला पीडा व्हावी अशी माझी इच्छा नाहीं. फक्त उन्मत्तपणाचा प्रतिकार व्हावा, प्रत्येकानं आपापली मर्यादा पाळावी, आणि दुसऱ्याचा अपमान करूं नये किंवा त्याच्या सत्कर्मांत व्यत्यय आणूं नये इतकीच माझी इच्छा आहे; दुसरं

कांहीं नाहीं. इंद्रसैनिका, त्याचे पाश मोकळे कर, मी त्याला क्षमा केली आहे. [ इंद्रसैनिक गंधर्वाचे पाश सोडतो. ]

इं० सै०:—गुरुमहाराज, या गंधर्वाप्रमाणं त्याचा अधिपति जो चित्ररथ त्यालाहि क्षमा व्हावी !

[ इतक्यांत द्रौपदी, सत्यभामा, कनकश्री, चित्ररथ व मालती यांसह-वर्तमान येतात. चित्ररथ व मालती कोपऱ्यांत उभीं राहतात. ]

कौशि०:—गुरुमहाराज, ही पाहा सर्वच मंडळी आपल्या पायापाशीं आली आहेत. त्यांत देवी सत्यभामा आणि देवी द्रौपदी याहि आहेत.

गाल०:—देवी द्रौपदी, देवी सत्यभामे, या, तुमचं स्वागत असो ! तुम्हासारख्या महानुभाव सतींच्या आगमनानें माझा हा वन्य आश्रम खरोखर धन्य झाला. कौशिका, अरे यांना बसायला आसनं द्या पाहूं ! (द्रौपदी व सत्यभामा गालवास नमस्कार करून आसनावर बसतात. ) वाहवा ! श्रीकृष्णार्जुनांबरोबर तुम्हीहि वनविहार करण्याला आलां वाटतं ?

द्रौप०:—होय महाराज, आमचा आधीं येण्याचा बेत नव्हता; पण देवी कनकश्रीचं आग्रहाचं निमंत्रण आलं म्हणून यावं लागलं !

कन०:—( पुढें होऊन ) माझ्या विनंतीला मान देऊन उभयतां देवींनीं येणं केलं यामुळं माझी वनभूमि धन्य झाली. पण गुरुमहाराज, मी अशा या थोर व्यक्तींचं स्वागत करण्याचा मनोरथ मनांत धरला नसता तर फार बरं झालं असतं असं मला वाटतं. मी हतभागिनीनं त्यांना व्यर्थ शिणविलं ! ( रडत ) गुरुमहाराज, माझ्या हातून झालेली चूक सुधारायला आपणच समर्थ आहां. माझ्यावरचा आक्षेप निघून न जाईल तर मला गंगानदींत शिरून आत्महत्या करण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. मी चांडाळणीनं एरवीं कधींहि त्यांच्यावर येणार नाहीं असलं संकट मात्र ओढवून आणलं !

द्रौप०:—देवी कनकश्री, रडूं नका, यांत तुमच्याकडं कांहीं दोष नाहीं; तो सर्व माझ्या अविचाराचा परिणाम !

सत्य०:—देवी कनकश्री, तुम्ही कां बरं दुःख करितां ? मनुष्याचं पुष्कळसं दुःख त्याच्या स्वतःमुळंच उत्पन्न होत असतं ! कर्तव्यकर्म करण्याच्या दृढ निश्चयानं आलेलीं संकटं आपल्या यशाची चाड असणाऱ्या प्रत्येकानं

सोसलींच पाहिजेत. यांत दुसऱ्याला दोष लावणं हा अन्याय आहे. तुम्ही दुःख करूं नये !

**कौशि०:**—गुरुमहाराज, उदार मनाच्या अशा या थोर विभूति एकत्र जमल्यामुळं जो तो सर्व दोष आपल्यावरच घेऊं पाहत आहे. पण उदार मनांच्या या गर्दींत खरा दोष ज्याच्याकडं आहे, त्या अपराध्याला मात्र निसटून जायला सवड सांपडते इतकंच वाईट वाटतं.

**गाल०:**—तें काय म्हणून ? खरा अपराधी चित्ररथ गंधर्व आहे. पण त्याच्या शिरच्छेदाची प्रतिज्ञा श्रीकृष्णानं केलीच आहे, व ती त्याच्या हातून अद्यापि पार पडली नाहीं म्हणून त्याची स्मृति जागृत करण्याला मी आतां हाच निघणार होतों. तुम्ही सर्व मंडळी आलां म्हणून थांबलों. मला जाऊं द्या, नारद माझीच वाट पाहत असेल !

**कौशि०:**—गुरुमहाराज, आपण थांबलां तेंच बरोबर केलं; पण खरा अपराधी चित्ररथ असला तरी या कामीं दुसराहि एक अपराधी त्याच्या-बरोबरीचा आहे. नारदानं लावालावी केल्याचं वृत्त गुरुमहाराजांना मी नुकतंच कळविलं होतं. आणि आतां देवी सत्यभामा आणि देवी द्रौपदी आल्या आहेत त्याहि तेंच आपणाला कळवितील !


**गाल०:**—अस्सं ! नारदाच्या लावालावीचं तूं आतांच बोलला होतास खरा ! काय देवी द्रौपदी, हा कौशिक म्हणतो तें खरं आहे काय ?

**द्रौप०:**—( कानाशीं लागून कुजबुजते. ) ( उघड )वहिनींना विचा-रावं म्हणजे आणखी कळेल !

**गाल०:**—( आश्चर्यानें ) अस्सं ! बरं देवी सत्यभामे, तुझं काय म्हणणं आहे ?

**सत्य०:**—( गालवाच्या कानाशीं कुजबुजते. ) ( उघड ) समजलं !

**गाल०:**—(मोठ्यानें हसून) अस्सं ! अरे लबाडा नारदा ! असं केलंस काय तूं ? नुकताच तो माझ्याकडं आला होता खरा; आणि श्रीकृष्णाची प्रतिज्ञा शेवटाला जाणार नाहीं असं मुद्दाम बजावून मला चिडवून निघून गेला ! स्वतः विनोदाच्या आड लपून दुसऱ्याच्या रागालोभाचीं शस्त्रं तिस-



**गालव:**—मीं तुम्हाला क्षमा केली आहे. [ पृ० १२१

त्यावर चालवून गंमत पाहणारा हा विदूषकराज कुठं आहे तो मला आधीं पाहिलाच पाहिजे ! पण कृष्ण आणि अर्जुन कुठं आहेत ?

**कन०:**—उभयतां महाराजांच्या स्वाऱ्या अपापल्या शिबिरांतून सशस्त्र बाहेर पडून गंगानदीकांठच्या एका गहन अरण्यांत शिरल्या अशी बातमी माझ्या दूतानं येऊन मला सांगितली आहे.

**सत्य० व द्रौप०:**—( दोघीहि एकदम दचकून ) खरं कीं काय मग चला आपण त्यांच्याकडंच जाऊं.

**कौशि०:**—तिकडं गुरुमहाराजांसुद्धां सर्वांनींच त्वरेनं गेलं पाहिजे. पण गुरुमहाराज, या चित्ररथाला प्रथम आपण क्षमा करावी आणि त्यालाहि गुरुमहाराजांनीं बरोबर घ्यावा.

[ चित्ररथ व मालती पुढें येऊन गालवाच्या पायां पडतात. ]

**गाल०:**—ऊठ चित्ररथा, मालती ऊठ. मी तुम्हाला क्षमा केली आहे.

**चित्र०:**— महाराज माझ्यासारख्या नीच अपराध्याला आपण क्षमा केली हा आपला केवढा थोरपणा? दया आणि शांति यांच्याविषयीं ब्राह्मण-वर्गाची आज जी त्रिखंड आणि तिही युगांत कीर्ति झालेली आहे ती व्यर्थ नाहीं ! खरोखर माझ्या अपराधाची मला आठवण झाली म्हणजे असं वाटतं कीं लज्जेनं तोंड खालीं घालावं; आणि जन्मभर ज्या ठिकाणीं कोणीहि देव, यक्ष, गंधर्व, किंवा मनुष्य कधीं भेटणार नाहीं अशा अरण्यांत स्वतःच्या पश्चात्तापरूपी अग्नीमध्यें पिचत पडावं ! गुरुमहाराज प्रत्यक्ष देवें-द्राच्या दरबारीं माझी केवढी योग्यता ! माझ्या गायनगुणामुळं देवेंद्राचं माझ्यावर केवढं प्रेम! असं असतां या मद्याच्या व्यसनानं माझी घाण झाली! माझ्या या प्रेमळ स्त्रीनं मला या व्यसनापासून सोडविण्याचा किती तरी प्रयत्न केला ! पण प्रेमाच्या स्त्रीचा उपदेश कुणा व्यसनान्ध पुरुषानं आज-वर ऐकला आहे ? गुरुमहाराज, या माझ्या स्वर्गीय सहचरीच्या उपदेशाचा मी अव्हेर केला इतकंच नाहीं, तर तिच्या प्रेमाच्या आधारावर उभा राहून माझ्या व्यसनांत तिनंहि पडण्याचा जुलूम मी तिच्यावर केला, आणि अशा रीतीनं आपल्या अर्घ्यप्रदानांत मद्याची चूळ थुंकण्याचा अत्याचार तिच्या हातून करविला ! खरोखर मला आपल्या जिवाची खंति वाटूं लागली आहे!

श्रीकृष्ण आणि अर्जुन अशा महात्म्यांचं युद्ध जर माझा शिरच्छेद झाल्यानं थांबत असेल, तर तें थांबवायला मी तयार आहें. मद्यानं निरंतर दूषित झालेलं हें माझं शरीर सत्कारणीं तरी लागेल ! कारण, हा कलह माझ्यामुळंच उत्पन्न झाला आहे !

गाल०:—चित्ररथा, तूं दु:ख करूं नको. तुझ्या खऱ्या पश्चात्तापामुळं तुझे सर्व अपराध क्षमेला पात्र झाले आहेत. तुझा शिरच्छेद करण्याची प्रतिज्ञा श्रीकृष्णानं माझ्याकरितां केली; पण आतां तुला मनापासून पश्चात्ताप झाल्यावर तुझ्यासारख्या दिव्य गायकाच्या गायनामुळं इंद्रलोकाला येणारी शोभा घालविण्याचं काय कारण ?

कौशि०:—गुरुमहाराज, मला वाटतं आतां विलंब न करितां श्रीकृष्ण आणि अर्जुनराज यांच्याकडंच चलावं.

द्रैप०:—मी तेंच म्हणणार होतें.

सत्य०:—हो! नाहीं तर नारदमुनि आणखी कांहीं तरी एखादी नवी गंमत करून ठेवायचे !

गाल०:—चला तर सर्वच मिळून जाऊं.

[ जातात. ]

---

## प्रवेश पांचवा

स्थळ—गंगातीर

[ वनदेवता बोलत येतात, इतक्यांत नारद प्रवेश करितो; पण वनदेवतांना बोलतांना पाहून किंचित थबकून उभा राहतो. ]

१ व० दे०:—ऐकलंस ना ही काय म्हणते तें ?

२ व० दे०:—काय ? काय म्हणते ही ?

१ व० दे०:—ही म्हणते, कृष्णमहाराज आणि पार्थराज यांचं भांडण त्या मेल्या तंबोरीवाल्यानं लावलं.

**नार०:**—अरे बाबा ! माझ्या कळलावेपणाची कीर्ति यांच्यापर्यंत आली वाटतं ? काय या पोरींना राग आला आहे हा ? एका शब्दांत हिनं माझी पुरीच शोभा केली !

**३ व० दे०:**—तंबोरीवाला म्हणजे ग कोण ?

**४ व० दे०:**—अग कृष्णमहाराज आणि पार्थराज आपापल्या स्त्रिया घेऊन इथं आले आणि आपण सगळ्याजणी नाचत आणि गात होतों, तेव्हां आभाळांतनं गात गात आणि तारा वाजवीत खालीं आला तो !

**नार०:**—माझं वर्णन तर इनं अगदीं बरोबर केलंन !

**२ व० दे०:**--ते तर नारदमुनि ! तंबोरीवाला काय म्हणतेस !

**नार०:**—असो; एक तरी वनदेवता माझ्या बाजूची दिसते !

**४ व० दे०:**—अग कसला मेला मुनी तो ? भांडणं आणि कलागती लावणारा ! त्यानंच भांडण लावून कृष्णमहाराजांचं मन उदास केलं आणि आमचा उत्सवसमारंभ बंद पाडला. गंगाकिनाऱ्यावर आपण थोडे का मुनि पाहतों ? पण कसे अगदीं शांत व गरीब असतात ते !

**नार०:**—माझ्या आणि इतर मुनींच्या मधलं अंतर खरंच इतकं का आहे ?

**३ व० दे०:**—होय खरंच. त्यांच्याकडं जाऊन नमस्कार करून घटकाघटका बसावं. पण त्यांच्या तोंडांतनं शब्द म्हणून कसा तो निघायचा नाहीं. नाहीं तर मेला हा तंबोरीवाला ! या मेल्याला स्नान नाहीं, संध्या नाहीं, ध्यान नाहीं, समाधि नाहीं--

**नार०:**--( हंसून ) वेड्या पोरी ! भक्तिमार्गांत स्नानसंध्या लागत नाहीं, हें यांना काय माहीत ?

**२ व० दे०:**--आणि पाहावं तेव्हां नको तिथं आपला हजर !

**नार०:**--वा: ! ज्याला कलागत लावायची असते त्यानं येऊनजाऊन साधायचं काय तर हेंच.

**४ व० दे०:**--आणि नको तें बोलत सुटतो ! कृष्णमहाराजांच्या शिबिरांत मी होतें तिथं हा आपला आहेच !

नार०:—अरे वः ! तिथं झाडंझुडपं होतीं ते सगळे गुप्त हेरच होते कीं काय ?

१ व० दे०:—पार्थराजांच्या शिबिराकडं माझी नेमणूक होती तिथंहि तो होता.

नार०:—काम पडलं म्हणजे सगळ्या ठिकाणींच जावं लागतं त्याला काय करणार ?

३ व० दे०:—द्रौपदीदेवीच्या सेवेला मी होतें, तिथं पाहिलं तरी हा आहेच. आणि बायकामाणसांच्या मंदिराकडं जायचं तर त्याला वेळ अवेळ कांहीं तरी ? हा पहावं तों आपला मल्या पाहाटेला आला आणि देवी द्रौपदीची खुशाल झोंपमोड केलीन् ! काय बाई थट्ट तरी !

नार०:—झोंप मोडल्यानं कार्य केवढं साधलं हें या पोरीला काय कळणार ?

४ व० दे०:—आणि सत्यभामाबाईसाहेबांकडं मी होतें तिथंहि आलाच होता त्यांच्याबरोबर बोलायला !

नार०:—मग त्यांत काय बिघडलं ?

२ व० दे०:—आणि बोलतो तें तरी थोडंथोडकं ?

नार०:—पहा. आतां माझ्या बोलण्यावर स्वाऱ्या घसरल्या वाटतं !

१ व० दे०:—छेः ग ! तडतड लाह्या फुटत असतात जशा कांहीं.

नार०:—मग तुम्हा पोरींना काय ? लाह्या फुटल्या तर उचलून टाकाव्या तोंडांत !

३ व० दे०:—या मेल्याचं तोंड कातड्याचं आहे कीं लोखंडाचं आहे कुणाला ठाऊक !

नार०:—खरं म्हटलं तर कातड्याचं आहे म्हणूनच टिकतं, लोखंडाचं फुटून गेलं असतं.

४ व० दे०:—आणि बोलतो तें तरी कसं अगदीं वर्मी लागण्यासारखं !

नार०:—आणि वर्मी लागण्यासारखं ज्याला बोलायला येत नाहीं त्यानं तोंड तरी कां उघडावं ?

२ व० दे०:—घालूनपाडून बोलण्याचा याचा जसा कांहीं हातखंडाच आहे.

नार०:—मी घालूनपाडून बोलतों ! आणि या इतका वेळ करताहेत तें काय ? बरं पण यांचं म्हणणं तरी काय तें पाहूं. ( नारद पुढें होतो व सर्व वनदेवता दचकून आपापल्या जागीं जाऊन उभ्या राहतात. ) बालवनदेवींनों, अशा भिऊं नका. तुमचं बोलणं मी ऐकलं; पण मी कांहीं तुमच्यावर रागावलों नाहीं. सांगा बरं तुम्हांला माझा का राग आलेला आहे तो ?

[ वनदेवता एकमेकीकडे पाहून ' तूंच पुढं हो, तूंच पुढं हो,' असें म्हणून एकमेकीला खुणावितात; शेवटीं त्यांतील एक धीट वनदेवता पुढें येते. ]

वन०:—त्यांत भीति कसली ? मी सांगतें, तुम्हीं कृष्णार्जुनांचं भांडण लावून देऊन आमच्या समारंभाचा विरस केलात.

नार०:—एवढंच ना ? बरं, कृष्णार्जुनांची मी फिरून मैत्री करून दिली म्हणजे मग तरी तुमचा उत्सवसमारंभ नीट होईल ना ?

वन०:— हो, मग आमचं कांहींएक म्हणणं नाहीं !

नार०:—आणि इतका वेळ मला शिव्या दिल्यात त्याचं काय ? ( वनदेवता विरमून तोंड खालीं घालते. ) मग तुम्ही मला नाचून गाऊन ईश्वरभजन करून दाखविलं पाहिजे ! आहे कबूल ?

वन०:—( उल्हासानें ) हो दाखवूं.

नार०:—चला तर माझ्याबरोबर.

[ जातात. ]

## प्रवेश सहावा.

—*०*—

स्थळ—गंगातीर

[ कृष्ण प्रवेश करितो. ]

कृष्णः—कोण बिनतोड प्रसंग आला पाहा ! अर्जुनाशीं मी युद्ध करायचं ही नुसती कल्पना मनांत आली कीं अंगावर नखशिखान्त शहारे येतात ! काळजाला पीळ पडतो ! आणि 'तूं पार्थसखा श्रीकृष्णच काय?' असे मला मनांतून कोणी तरी प्रश्नावर प्रश्न विचारातं आहे असा भास होतो. पण करणार काय ? अर्जुन जर चित्ररथाला माझ्या स्वाधीन न करील तर युद्धहि केलं पाहिजे. ही सर्व कलागत नारदानं लाविली यांत शंका नाहीं; पण हें खरं असलं तरी तें कळून आतां उपयोग काय? वचन दिल्यानं हातून गोष्ट गेली खरी. आतां तें वचन–ती प्रतिज्ञा–शेवटास नेलीच पाहिजे. मग मला धर्मादिपांडव कांहीं म्हणोत, किंवा पांडवपक्षपाती जग कांहींहि म्हणो ! मला जगाच्या निंदेपेक्षां या वेळीं गालवमुनींच्या मनोवृत्तीकडंच अधिक पाहिलं पाहिजे. अरेरे गरीब बिचारा ब्राह्मण! कुणाचं एक नाहीं दोन नाहीं. स्वतःच्या मोक्षापेक्षांहि जगाच्या कल्याणाकरितां तपश्चर्या करीत गंगातीरावर राहतो; त्याच्या हातांत या नीच गंधर्वानं मद्याची चूळ थुंकावी काय ? गंधर्व इतके उन्मत का झाले ? इंद्र माजला म्हणून. आणि इंद्र कां माजला तर आमचं या कामीं दुर्लक्ष झालं म्हणून. तें कांहीं नाहीं. माझ्यावर सगळ्या जगाचा असा आरोप आहे कीं, मी कोणतीहि गोष्ट संथपणानं घेतों. मला कोणाहि दुःखी प्राण्याविषयीं खरं दुःख वाटत नाहीं; मी मनांत एक असतां बाहेर एक दाखवितों; आणि पांडवपक्षपातापुढं मला जगांतल दुसरंतिसरं कांहींच दिसत नाहीं. ठीक आहे; साऱ्या जगाला खोटं ठरवायला आज ही मला सोन्यासारखी सुसंधिच मिळाली म्हणायची ! या प्रसंगीं पांडवांशीं थोडाबहुत निष्ठुरतेनं वागलों तर जन किंवा मन कोणीच मला नांवं ठेवणार नाहीं.

[ कृष्ण एका बाजूनें जातो व अर्जुन दुसऱ्या बाजूनें प्रवेश करितो. ]

अर्जु०:—काय ही कालाची गति विपरीत आहे पहा ! या अर्जुनाला प्रत्यक्ष श्रीकृष्णाशीं युद्ध करण्याचा प्रसंग यावा ना ! खचित सर्व जग मला कृतघ्न म्हणेल ! पण मी तरी काय करूं ? प्रतिज्ञा मोडून तरी मला कोण चांगलं म्हणेल ? ज्या वेळीं जिव्हेनं प्रतिज्ञेचा शब्द उच्चारला त्या वेळींच माझे हातपाय बांधून भवितव्यतेनं मला आपला बंदिवान केला ती आतां माझे खेळ पाहील तितके थोडेच !

[ कृष्ण प्रवेश करितो. ]

कृष्ण:—पार्था, काय ? समरभूमीवर तूं माझ्या आधींच तयार ?

अर्जु०:—देवा, समरभूमीवर केव्हां तरी यायचं खरं. मग जितकं आधीं तितकं बरंच. कारण, व्यर्थ विचारानं मनाला शीण व्हायचा तो तरी चुकेल.

कृष्ण:—म्हणजे ? चित्ररथाला माझ्या स्वाधीन न करण्याचा तुझा निश्चय कायम झाला ?

अर्जु०:—मी या ठिकाणीं आपल्या भेटीला एकटाच आलों यावरून काय तें समजा !

कृष्ण:—पार्था, तूं करतोस हें कृत्य बरोबर आहे असं तुला वाटतं ?

अर्जु०:—होय देवा; नाहीं तर मी त्याला प्रवृत्तच झालों नसतों !

कृष्ण:—मी गालवमुनींना वचन दिलं, त्यांच्यासमोर प्रतिज्ञा केली, हें तुला माहीत आहेना ना ?

अर्जु०:—होय देवा; पण मी झालों तरी अशाच रीतीनं वचनबद्ध आहें हें आपणालाहि माहीत आहे.

कृष्ण:—पण माझी प्रतिज्ञा प्रथमची आहे; तुझी नंतरची आहे !

अर्जु०:—प्रतिज्ञा ती प्रतिज्ञा ! ती आधींची काय आणि नंतरची काय सारखीच !

कृष्ण:— मी प्रतिज्ञा केली असतां तिच्याविरुद्ध तूं प्रतिज्ञा करावी हें तुला उचित आहे काय ?

अर्जु०:— मी प्रतिज्ञा करितांना आपली मला कळती तर मी केलीच नसती; उलट आपल्या आधीं चित्ररथाचा शिरच्छेद करून आपले

श्रम मी वांचविले असते. पण माझ्या प्रतिज्ञेचा तोंडानं उच्चार झाल्यावर देवा तुमचा संबंध मला कळला !

कृष्ण:—मग यावरूनच उघड होतं की, तुझी प्रतिज्ञा असली तरी ती अविचाराची आहे !

अर्जु०:—पूर्वी अविचार ही माझी एक चूक झाली खरी; पण आतां प्रतिज्ञा मोडणं ही दुसरी चूक तरी मी करणं बरोबर नव्हे. विचारपूर्वक केलेल्या चुकीला चूक न म्हणतां अपराध किंवा अधर्म हेंच नांव योग्य आहे.

कृष्ण:—पार्था, माझ्या प्रतिज्ञेनं मी गालवमुनींना म्हणजे परक्याला बांधला गेलों आहें. तुझी प्रतिज्ञा तुझ्या स्त्रीच्या सांगण्यावरून तूं केलेली आहेस !

अर्जु०:—आपणाप्रमाणंच माझी स्त्री द्रौपदी ही चित्ररथाला म्हणजे परक्याला बांधली गेली आहे नव्हे काय ? शिवाय स्वतःच्या स्त्रीशीं झाला तरी वचनभंग करावा हा कुठचा न्याय !

कृष्ण:—पण माझ्या प्रतिज्ञेचा हेतु तुझ्या प्रतिज्ञेहून अधिक न्यायाचा आहे !

अर्जु०:—देवा, तो कसा ?

कृष्ण:—कारण, घोर अपराधी असा जो चित्ररथ त्याला मी शिक्षा करणार; आणि अशा अपराध्याची शिक्षा चुकविण्याची तूं प्रतिज्ञा करणार. पण हा तूं अन्याय करीत नाहींस काय ?

अर्जु०:—पण ऋषींच्या ओंजळींत मद्याची चूळ थुंकली म्हणून कुणाला झालं तरी देहान्त प्रायश्चित द्यावं हा कुठचा न्याय ? देवा, खरा अविचार आपणच केला आहे. देहान्त सोडून बाकी वाटेल ती शिक्षा आपण चित्ररथाला द्या. आपल्याकरितां मीच ती आपल्या हातानं अमलांत आणतों.

कृष्ण:—पण शिक्षा जबर असली तरी गालवमुनींचा झालेला अपमान विसरतां कामा नये ?

अर्जु०:—शिक्षा जबर हें आपणाला मान्य आहे तर ! अर्थात् न्यायबुद्धीचा कठोरपणा दयेनंच काढून टाकावा लागतो. गालवमुनींचा अपमान

मीं विचारांत घ्यावा ! आणि चित्ररथाच्या स्त्रीची हानि आपण विचारांत घेऊं नये ? गालवमुनींच्या अपमानाची भरपाई चित्ररथानं क्षमा मागितल्यानं होईल. पण चित्ररथाला ठार मारल्यानं त्याच्या दुर्दैवी स्त्रीला जें दुःख जन्मभर होईल त्याची भरपाई कोण कशी करणार ?

कृष्णः—पण चित्ररथाची स्त्री मालती इनं स्वतःहि गालवाच्या हातांत मद्याची एक चूळ थुंकली होती हें तुला कबूल आहे कीं नाहीं ?

अर्जु०ः—पण देवा, तिनं ती गोष्ट केवळ आपल्या पतीच्या आग्रहामुळं—छे जुलमानं—केली. बरं त्यांतूनहि तिचा अपराध स्वतंत्र मानला तरी चित्ररथाप्रमाणं त्याचीहि निष्कृति गालवमुनींची क्षमा मागण्यानं होणारी आहे.

कृष्णः—अपराधाअपराधांत फरक असतो.

अर्जु०ः—पश्चात्तापानं ज्याचं निराकरण होत नाहीं असा अपराधच जगांत नाहीं. क्षमा व दया यांचा तर धर्म असा आहे कीं, अपराध जितका अधिक घोर तितकं क्षमा व दया यांचं तेज आणि यश अधिक मोठं असतं !

कृष्णः—पण अपराध्याला शासन करणं हा या कामीं माझा अधिकार आहे. कारण, गालवमुनि चित्ररथाला शिक्षा व्हावी म्हणून माझ्याकडं आले.

अर्जु०—पण अखेरपर्यंत वाटेल तेव्हां अपराध्याला क्षमा करण्याचा गालवमुनींचा अधिकार त्यामुळं नाहींसा होत नाहीं. आपण गालवमुनींना आणा. आणि त्यांच्या देखत चित्ररथाची स्त्री हजर ठेवून चित्ररथाचा शिरच्छेद करा. माझी खात्री आहे कीं तो करुण प्रसंग पाहून गालवमुनी क्षमाच करितील !

कृष्णः—अर्जुना, तें कांहीं नाहीं; येऊनजाऊन मीं प्रतिज्ञा–विन्मुख व्हावं येवढंच तुला साधायचं आहे असं म्हणेनास ?

अर्जु०ः—नाहीं देवा, खरा स्वाभिमानी पुरुष व्यर्थ आणि निव्वळ अधर्माचारांत कधींहि आनंद मानणार नाहीं ! मग तो स्वतःचा नसून

दुसऱ्याचा कां असेना! पण देवा, आपला प्रतिज्ञाभंग व्हावा ही माझी खरी इच्छा नाहीं, तर माझा स्वतःचा प्रतिज्ञाभंग होऊं नये ही!

कृष्णः—पण तुझी व माझी अशा दोन्ही प्रतिज्ञा शेवटाला जाणं अशक्य आहे!

अर्जु०:— तो विचार करण्याचं मला कारण नाहीं. मी या वेळीं माझ्यापुरतं प्रथम पाहणार!

कृष्णः—पण पार्था, मीं एरवीं नित्य तुझंच हित पाहिलं आहे!

अर्जु०:—मग देवा, या प्रसंगींहि तसं कां पहात नाहीं?

कृष्णः—पार्था, आजपर्यंत तुझे शत्रु तेच माझे शत्रु मीं मानले नाहींत काय?

अर्जु०:— होय देवा; प्रतिज्ञाभंग हा या वेळीं मला माझा फार मोठा शत्रु वाटतो, तो तुमचाहि शत्रु मानून माझं रक्षण करा म्हणजे झालं!

कृष्णः—अर्जुना, तुझे मित्र तेच मीं माझे मित्र आजवर मानले ना?

अर्जु०:— होय देवा; मग प्राणदान आणि अभयदान देऊन मीं आज नवीन जोडलेला मित्र जो चित्ररथ त्यालाहि तुम्ही आपला मित्र कां म्हणत नाहीं?

कृष्णः—माझे उपकार स्मरायचे ते न स्मरून कृतघ्न होऊं पहातोस?

अर्जु०:— मीं खरोखर कृतघ्न असेन तर माझा देह याच क्षणीं पतन पावेल; देवा, मीं कृतज्ञ आहे. पूर्वीचे सर्व उपकार आठवून फिरून तसाच आणखी एक उपकार माझ्यावर करा अशी मी केवळ सविनय याचना करितों.

कृष्णः—अर्जुना, माझ्याकरितां तूं मात्र कांहींच करूं नयेस का?

अर्जु०:—तें काय म्हणून? मी आपणांकरितां हें शीर धडापासून वेगळं करायला तयार आहें! करून दाखवूं याच क्षणीं?

कृष्णः—छेः छेः! पार्था हें काय? पण माझ्याकरितां तूं आपली प्रतिज्ञा एक वेळ मोडायला तयार हो म्हणजे झालं!

अर्जु०:—प्रतिज्ञाभंगापेक्षां मला मरण पुरवलं! देवा, हें भलतंच काय म्हणून मला करायला सांगतां? मला प्रतिज्ञा मोडायची कधींच

संवय नाहीं. आपण प्रतिज्ञा मोडली तरी ती आपणांला शोभेल ! थोरांनां काय वाटेल तें शोभतं ! भारतीय युद्धांत मी हातांत शस्त्र धारण करणार नाहीं अशी प्रतिज्ञा केली असतां, याच पार्थाकरितां, तुम्ही रथचक्र घेऊन भीष्मांवर धांवलां कीं नाहीं ? बरं याच्या उलट पहा. जयद्रथवधाची माझी प्रतिज्ञा मोडायचा अगदीं बेत आला होता; पण तुम्हीं वाटेल तें केलं; सूर्याच्या आड सुदर्शन धरून जयद्रथाला उन्मत्तपणानं पुढं आणविलं; आणि माझी प्रतिज्ञा शेवटाला नेलीच कीं नाहीं ? झालं तर !

कृष्णः—अर्जुना, हा तुझ्याच तोंडून न्याय झाला !

अर्जु०:— तो कसा देवा ?

कृष्णः—मीं जर तुझी प्रतिज्ञा शेवटाला न्यायला मदत केली, तर माझी प्रतिज्ञा शेवटाला न्यायला तूंहि मला आतां मदत केली पाहिजेस !

अर्जु०:—देवा, नुसती आपली प्रतिज्ञा शेवटाला जायची असती तर मीं मदत केली असती; पण ती प्रतिज्ञा शेवटाला न्यायला माझी प्रतिज्ञा मोडावी लागते त्याची वाट ?

कृष्णः—ठीक आहे. हा वाद बोलून संपणारा नाहीं. पार्था, युद्धाला सिद्ध हो ! संभाळ ! [ कृष्णार्जुन लढतात; अर्जुन मूर्छित पडतो. ]

कृष्णः—( धांवून पुढें जातो व अर्जुनास उचलून मांडीवर घेतो. ) अरेरे ! पार्थाला वर्मीं घाव लागलासा वाटतो ! आतां काय करावं ? पार्था, सावध हो सावध हो ! हा पहा तुझा मित्र कृष्ण तुला हाक मारतो आहे ! आग लागो या माझ्या प्रतिज्ञेला ! या प्रतिज्ञेमुळं मी विनाकारण हट्टाला पेटलों ! मला आतां जग काय म्हणेल ?

[ नारद प्रवेश करितो व पडद्याकडे पाहून " या गालवमुने, या " असें मोठ्यानें म्हणतो; तें ऐकून कृष्ण दचकतो. ]

कृष्णः—काय गालवमुनि आले ! आणि चित्ररथाचा वध माझ्या हातून अद्यापि झाला नाहीं ! आतां ते मला काय म्हणतील ?

[ अर्जुनाचें डोकें खालीं ठेवून उठून उभा रहातो. ]

नार०:—श्रीकृष्णा, हें काय ? आणि पार्थ मूर्छित कशानं झाला ?

कृष्ण०:—नारदा, गालवमुनि कुठं आहेत ?

नार०:—ते दुरून आलेसं मला वाटलं म्हणून हांक मारली ! पण तो माझा भ्रम होता ! पण श्रीकृष्णा, पार्थाला मूर्च्छा कशानं आली ?

कृष्ण०:—( फिरून अर्जुनाचें डोकें आपल्या मांडीवर घेतो ) नारदा, काय सांगूं ? हा सर्व माझ्याच अविचाराचा परिणाम !

नार०:—( आश्चर्य दाखवून ) म्हणजे ? मला नाहीं समजलं देवा तुम्हीं काय म्हणालां तें ?

कृष्ण:—मी आपल्या तोंडानं काय सांगूं ? नारदा, माझ्या चक्रायुधानं मी ताडण करून अर्जुनाला मूर्च्छा आणली असं मीं सांगितलं तर तें तुम्हांला खरं तरी वाटेल का ?

नार०:—छेः ! भलतंच कांहीं तरी ! श्रीकृष्णा, तुम्हांला भ्रम तर झाला नाहीं ना ? हें तुम्हीं म्हणतां तरी काय ?

कृष्ण:—नारदा, मी म्हणतों तें अक्षरशः खरं आहे. पार्थाशीं मीं युद्ध केलं !

[ मान खालीं घालून बसतो. ]

नार०:—( मोठमोठ्यानें ) काय ? श्रीकृष्णाचं अर्जुनाशीं युद्ध ? श्रीकृष्णाचं अर्जुनाशीं युद्ध ? अहो, स्वर्गस्थ ब्रह्मादिदेवांनो ऐका; अहो, अष्टदिक्पालांनों ऐका; अहो चराचरविश्वाधिष्ठित देवतांनों ऐका; अहो, अंतरालस्थ यक्षगंधर्वकिन्नरविद्याधरादि उपदेवतांनों ऐका; अहो, भूलोकवासी मानवांनों ऐका; अहो, ध्यानस्थ ऋषिमुनिगणांनों ऐका,-ऐका श्रीकृष्णाच्या तोंडचे शब्द ! श्रीकृष्णानं अर्जुनाशीं युद्ध केलं ! श्रीकृष्णानं अर्जुनाशीं युद्ध केलं—पण श्रीकृष्णा, मीं हें मोठमोठ्यानं जरी ओरडून सांगितलं तरी त्यावर विश्वास कोण ठेवणार ? पण श्रीकृष्णा, तुमचं अर्जुनाशीं युद्ध व्हायला असं कारण तरी काय झालं ?

कृष्ण:—काय सांगूं नारदा ? चित्ररथाला पाठीशीं घालून अर्जुनानं मला प्रतिज्ञाविन्मुख करण्याच्या बेताला आणलं म्हणून मला त्याचा राग आला ! पण आतां मी काय करूं ?

नार०:—अरे ! पण हे गालवमुनि आतां खरोखरच आले इकडं !

कृष्ण:—( दचकून अर्जुनाचें डोकें खालीं ठेवून उभा रहातो ) ठीक

झालं; पार्थाची आडकाठी माझ्या मार्गांत न उरल्यामुळं आतां मला चित्ररथवध करून प्रतिज्ञा पूर्ण करितां येईल आणि गालवमुनींचं समाधान होईल! ( गालव व कौशिक प्रवेश करितात. कृष्ण गालवास वंदन करितो. ) मुनिवर्य, आपण कांहींएक काळजी करूं नका. चित्ररथवधाची प्रतिज्ञा पूर्ण करण्याला आतां मला विलंब नाहीं !

अर्जु०:—( सावध होऊन त्वेषानें ) नाहीं ! मी चित्ररथाला कधींहि श्रीकृष्णाच्या स्वाधीन करणार नाहीं !

गाल०:—अरेरे ! प्रतिज्ञेचा अभिमान विकोपाला गेला ना ? श्रीकृष्णा, राहूं दे. तुझ्या प्रतिज्ञेतून मी तुला मुक्त केलं आहे.

नार०:—मुनिराज, आपण मुक्त केलं; पण तेवढ्यानं काम भागत नाहीं ना ? श्रीकृष्णानं आपल्या उभयता मातांची शपथ घेऊन प्रतिज्ञा केली आहे ना !

कृष्ण:— होय नारदा, या बाबतींत मला गालवमुनींचंहि ऐकायचं नाहीं ! अर्जुना, कुठं आहे तो चित्ररथ ? आण माझ्या स्वाधीन तर ! नाहींतर फिरून युद्धाला उभा रहा !

अर्जु०:—हा पहा मी फिरून युद्धाला तयार आहे !

[ सत्यभामा, द्रौपदी चित्ररथ वगैरे सर्व मंडळी येतात. ]

नार०:—( पुढें होऊन ) हां ! श्रीकृष्णा, हा चित्ररथ आला पहा.

[ कृष्ण चित्ररथाच्या अंगावर धांवून जातो तों अर्जुन धनुष्यबाण घेऊन मध्यें पडतो. ]

नार०:— ( मोठमोठ्यानं हंसून ) नारायण ! नारायण ! द्रौपदी, बोल आतां कृष्णविजय कसा काय आहे तो ! हा श्रीकृष्ण आणि हा अर्जुन— एका आत्म्याचीं हीं दोन शकलं ! असं असतां अभिमानानं आणि आत्मप्रीतिनं कशीं निकरावर आलीं आहेत पहा ! बस्स झालं ! माझं काम संपलं! सर्व जगानं काय पहायचं तें पाहिलं. गालवा व्हा तुम्ही पुढं. ही कलागत आतां थांबविलीच पाहिजे.

गाल०:—श्रीकृष्णा, अर्जुना, हात आवरा, तुम्हांला माझी शपथ आहे चित्ररथ पश्चात्तापामुळं मेल्याहून मेल्यासारखा झाला आहे. देवा, तुझ्या प्रति-

ज्ञेच्या सफळतेनं जें कार्य व्हायचं तेंच जर नुसत्या प्रतिज्ञेच्या उच्चारानं झालं तर युद्धाचं कारण कुठं काय राहिलं ? चित्ररथा, ये, श्रीकृष्णाच्या पायां पड.

नार०:—आणि माझ्या तरी मनांत कृष्णार्जुनांचं प्रत्यक्ष युद्ध व्हावं असं थोडंच होतं ! ते युद्ध करायला तयार झाले एवढ्यानं माझं काम झालं ! अर्जुना ये, तुझी आणि श्रीकृष्णाची भेट मला करूं दे.

सत्य०:—एकूण हें सगळ भांडण नारदमुनींनी लावलं हेंच खरं ना ?

नार०:—होय सत्यभामे, श्रीकृष्णाचं अर्जुनावरचं प्रेम त्याच्या आत्मप्रीतीला हार जातं कीं नाहीं मला पहायचंच होतं, तें मी पाहिलं; आणि मौज ही कीं श्रीकृष्ण, अर्जुन, द्रौपदी वगैरे तुम्ही सर्वांनीं या कामीं मला हातभार लावला. मी तुमचा फार आभारी आहें.

द्रौप०:—नारदा, आतां तुम्ही म्हणाल तेवढं थोडं आहे.

गाल०:—नारदा, यांनीं कसा हातभार लावला ?

नार०:—ऐका. गालवा, गंधर्वराजाकडून तुमची कुचेष्टा करवावी म्हणून मी गंगेवर गेलों तों त्याच्या आधींच चित्ररथाची तुमच्या हातांत थूळ थुंकायची तयारी होती. गालवा, तुम्हांला घेऊन श्रीकृष्णाकडं गेलों तों कृष्णाला प्रतिज्ञा करायचं बळ कधीं नव्हे तें आलं. द्रौपदीनं तर फारच मदत केली. अवचितपर्वाची गोष्ट मी एरवी तिला सांगतों तर तिनं माझी थट्टाच केली असती. पण माझं नशीब मोठं. मीं तिजवळ पर्वाची गोष्ट काढतांच ती माझ्या मागून आली, आणि नको नको म्हणत असतां मालतीला तिनं प्राणदान देऊन टाकलं. आणि अर्जुन तर काय ? द्रौपदीचं तोंड सुकलेलं पहातांच आपण काय करितों याचा विचार न करितां त्यानं तिला वचनं देऊन टाकलं. तात्पर्य तुम्हां सर्वांचा उदारपणा माझ्या चांगलाच पथ्यावर पडला. बोल द्रौपदी, आतां ' आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति' हें उपनिषद-वाक्यच खरं आहे कीं नाहीं तें ? शिवाय माझी कलहप्रियता परोपकारबुद्धीचीच असते हेंहि ठरलं कीं नाहीं ? कारण, गंधर्वांचा मद उतरून जसा त्यांचा फायदा झाला, तसाच गंगातीरवासी ऋषींचीं धर्मकृत्यं यापुढं निर्विघ्न झाल्यानं गालवादि मुनींचाहि फायदा झाला. नाहीं म्हणायला मी या वनदेवतांचा मात्र खरा अपराधी आहें.



द्रौपदीः—नारदा, आतां तुम्ही म्हणाल तेवढं थोडं आहे. [ पृ० १३४.

कृष्णः—तो कसा ?

नार०:—कारण, त्या बिचाऱ्यांचा उत्सवसमारंभ मात्र मीं नासला. वनदेवताकुमरींनों, या पुढं या, आणि मला वचन दिल्याप्रमाणं आतां श्रीकृष्णस्तुतीचं भजन करून सर्वांना आनंद द्या.

[ वनदेवता नृत्यगायन करितात. पडदा पडतो. ]

समाप्त

---